
अनुत्तर यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षि
वर्षं तद् भारतं नाम भारती यत्र संततिः ॥

हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व



लेखक-
ज. द. जोगळेकर

हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व

लेखक

जयवंत दत्तात्रेय जोगळेकर

अेल्अेल्.बी.

प्रथमावृत्ति

शके ७–३–१८७२
क्रु.

(६ जून १९५०)

मूल्य तीन रुपये

प्रकाशक आणि मुद्रक
कृ. वा. मराठे
श्रीरामविजय मुद्रणालय, बडोदें.

हिंदुजातीस गौरवाप्रत नेणाऱ्या

हौतात्म्यांस

卐

आभार

★

हा प्रबंध लिहितांना त्याचप्रमाणें आज प्रसिद्ध करितांनाही अनेक मित्रांनीं साहाय्य केलें. त्यावांचून हें काम पैलतडीला जाणें माझ्या शक्तीबाहेरचें होतें. सर्वांचा नामनिर्देश लहानशा आभारांत शक्य नाहीं आणि साहाय्य करणारांनीं त्या हेतूनें तें केलेलेंही नाहीं. तरीपण माझे प्रमुख साहाय्यक-मित्र श्री. हरिभाऊ देसाई यांचे आभार मानल्याविना मी पुढें जाऊंच शकत नाहीं.

केसरी मराठा ग्रंथालय, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचें 'वाडिया ग्रंथालय' आणि बडोद्याचें 'मध्यवर्ती ग्रंथालय' ह्यांचा संदर्भ-ग्रंथांसाठीं फार उपयोग झाला. तदर्थ वरील तिन्ही संस्थांच्या ग्रंथपालांचा मी आभारी आहे. ज्या ज्या लेखकांच्या वा प्रकाशकांच्या अनुज्ञेवांचून त्यांच्या ग्रंथांतील उतारे घेतले आहेत त्या सर्वांची प्रथम क्षमा आणि मग आभार मानतों. येथील श्रीरामविजय मुद्रणालयानें हा प्रबंध सत्वर नि व्यवस्थित छापला आणि प्रकाशिला म्हणून श्री. कृष्णराव मराठे यांचे, आणि शेवटीं मलपृष्ठावरील सूचक चित्र सुंदर काढून देणारे श्री. खळे नि त्याचा ठसठशीत ठसा करणारे श्री. विद्वांस यांचे आभार मानतों.

—ज. द. जोगळेकर

भूमिका

★

१९४२ च्या सप्टेंबरांतील ही गोष्ट आहे. ४२ च्या चळवळीचा पहिला भर बहुतेक ओसरला होता. चोहोंबाजूंस युद्धाच्या ज्वाळा भडकलेल्या होत्या. कोणत्या क्षणीं त्या हिंदुस्थानास ग्रासतील याची निश्चिति नव्हती. सर्वसामान्य लोकांत महायुद्धासंबंधीं, नि तदनुषंगें भारतीय राजकीय परिस्थिति नि पक्षोपक्षीय राजकारण यांविषयीं सतत चर्चा चालत असे.

अशा धामधुमीचे काळांत, एकदां माझ्याबरोबरीच्या एका महाविद्यालयीन विद्यार्थ्याशीं, हिंदुमहासभेच्या विचारप्रणालीवर माझी चर्चा झाली. चर्चेतील मतभिन्नतेचें मूळकारण एकच होतें. 'हिंदुस्थानांत हिंदुसमाज हा राष्ट्र आहे' हा सिद्धांत त्या माझ्या समवयस्कास कांहीं केल्या पटेना! माझ्या अल्पज्ञानावरच हा सिद्धांत कसा बरोबर आहे हें त्यास पटविण्याचा मी आटोकाट प्रयत्न केला. परंतु तो प्रयत्न विफल गेला. तथापि, तेव्हांपासून माझ्या मनांत विचारचक्र सुरू झालें. भावनेस आणि बुद्धीस पटणारा हा सिद्धांत आपल्या प्रतिपक्षीयास कां पटूं नये हें कोडें मला सुटेना. वर्तमानपत्रें आणि भाषणें यांमधून हिंदुत्वावर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांना उत्तर देण्याइतकें हिंदुत्वावरील वाङ्मय हाताशीं उपलब्ध नसल्यानें, मनांतील गोंधळास सीमा उरली नाहीं. अंतीं मी एक निश्चय केला कीं, 'हिंदुस्थानांत हिंदु हेच राष्ट्र आहेत' हा सिद्धांत, कांहीं दिवसांपुरता, मनांतून पार पुसून टाकावयाचा आणि हिंदुस्थानांत कोणता समाज राष्ट्र ठरतो हें निश्चित करण्यासाठीं स्वतंत्र अभ्यास करावयाचा.

तदनुसार मी इतिहास, राज्यशास्त्र, राष्ट्रवाद आणि मार्क्सवाद यां वरील महत्त्वाचे ग्रंथ वाचले. परंतु ह्या अभ्यासान्तींही सावरकरांनी प्रतिपादिलेल्या सिद्धांतावरच मी पूर्ववत् येऊन ठेपलों. पुढें या सिद्धांतावर मी अनेकांशीं चर्चाही केली. अभ्यासांत संकलित झालेली माहिती जशी चर्चेच्या वेळेस फार उपयुक्त झाली, तसेंच चर्चेनें त्या माहितीवर नवीन प्रकाश पडून अस्पष्ट असलेल्या गोष्टी स्पष्ट झाल्या.

पुढें, सुमारें दोन वर्षांपूर्वी, संकलित माहितीच्या आधारें, एक प्रबंध लिहावा असें मला वाटूं लागलें. तथापि सावरकरांचा 'हिंदुत्व' हा अप्रतिम प्रबंध असतांना पुनः तत्सदृश विषयावर आणखी कांहीं लिहिणें हें एक औद्धत्य होईल असें वाटे! परंतु संकलित झालेली माहिती संगतवार मांडून मुद्रित करण्यास मी उद्युक्त झालों त्याची कारणें अशीं :

(१) सावरकरांचा 'हिंदुत्व' ग्रंथ वाटतो तितका सोपा नसून त्यांतील प्रमेयें वरवर वाचून समजत नाहींत. तेव्हा सोप्या पुस्तकाची आवश्यकता.

(२) हिंदुत्वावर घेण्यांत येणाऱ्या सर्व आक्षेपांचें निराकरण नि इतरही राष्ट्रवादांचें समालोचन करणाऱ्या पुस्तकाची आवश्यकता.

(३) सामान्य वाचकास चटकन् समजावें यासाठीं विधानांच्या जोडीला भरपूर पुरावा असणाऱ्या पुस्तकाची आवश्यकता.

वरील तिन्ही कारणें दृष्टीपुढें ठेवूनच मी प्रबंधाची मांडणी केली आहे. प्रत्येक विधान करितांना, आणि प्रत्येक आक्षेपाचें निराकरण करितांना भरपूर पुरावा दिला आहे. पूर्वग्रह आणि भावना यांचा स्पर्श प्रबंधास शक्य तों न व्हावा यासाठीं, प्रबंधाच्या नामकरणापासूनच मी काळजी घेतली आहे. या बाबतींत मी किती यशस्वी झालों आहे हें

मला टाऊक नाहीं. म्हणूनच, पूर्वग्रहाचा कोणास वास आलाच तर त्यास माझा निरुपाय आहे. ह्या प्रबंधांत पुरावा म्हणून दिलेले सर्व उतारे त्या त्या विषयावरील अधिकारी लेखकांच्या ग्रंथांतून घेतलेले आहेत.

ह्या प्रबंधांत ग्रथित झालेली माहिती वाचकांनीं, थोडी थोडी अशी, कुठेना कुठें तरी वाचलीहि असेल. परंतु तीच संकलित करून संगतवार मांडली असतां काय नि केवढा प्रकाश पडतो तें ह्या प्रबंधावरून दिसेल. हेंच ह्याचें वैशिष्ट्य ! संकलित माहितीची संगतवार मांडणी सोडल्यास प्रबंधांत नवीन असें कांहीं नाहीं. सामान्य वाचकांस इतकी सर्व माहिती गोळा करणें इतर दैनंदिन कार्यव्यग्रतेमुळें शक्य नसतें. तें तेवढें मीं केलें इतकाच विशेष !

—लेखक

अनुक्रमणिका

हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व

प्रकरण १ लें

पाश्चिमात्य राष्ट्रवाद्

☆

'हिंदूराष्ट्रवाद' हा शब्द कानीं पडतांच सर्वसामान्य माणूस दचकावा इतका द्वेषी नि तिखट प्रचार ह्या शब्दाच्या बाबतींत विरोधकांकडून झालेला आहे. हिंदूराष्ट्रवादाचे विरोधक प्रचार करतात तो असा: —

हिंदुत्वाला उचलून धरणें हा जातीयवादाचा, अराष्ट्रीय दृष्टीचा नि प्रतिगामित्वाचा पुरस्कार आहे. हिंदूराष्ट्राची घोषणा ही मध्ययुगीन अर्थात् जुनाट असून तिचा उगम धार्मिक प्रवृत्तींत आहे. तसेंच हिंदूराष्ट्रवाद हा मुस्लिम लीगच्या विचारप्रणालीची प्रतिक्रिया आहे, आणि त्यामुळेंच तो असहिष्णु वृत्तीचा पुरावा आहे. हिंदुत्वाची विचारधारा ही निधर्मी शासनाच्या विचारप्रणालीशीं प्रतिकूल आहे

अशा प्रचारांत व्यक्तविली जाणारी विचारसरणी सत्य आहे असें गृहित धरण्यापूर्वी हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व निश्चित झालें पाहिजे. कारण 'हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व तें हें' असें जोंवर निःसंदिग्धपणें निश्चित झालें नाहीं तोंवर आपणांस कोणत्याही राष्ट्रवादावर तो जातीय, अराष्ट्रीय वा प्रतिगामी असल्याचा आरोप ठेवतां येणार नाहीं. कारण हिंदुस्थानांतील

राष्ट्रवादाविषयींच्या प्रचलित विचारधारा तर्कशुद्ध अशा ऐतिहासिक नि तौलनिक दृष्टीनें परीक्षिल्यावांचून कोणत्याही राष्ट्रवादावर कुठलाही आक्षेप घेणें हें अन्याय्य आहे. परंतु एकदां हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व शास्त्रीय पद्धतीनें निश्चित केलें गेलें म्हणजे मग, तो अधिकृत राष्ट्रवाद वगळून राष्ट्रवादाच्या इतर सर्व विचारधारा-मग ती हिंदूराष्ट्रवादाची असो, हिंदीराष्ट्रवादाची असो, किंवा दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रवादाची असो–आपोआपच अशास्त्रीय म्हणून चुकीच्या ठरतील. परंतु हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व सिद्ध करण्याच्याही आधीं राष्ट्र नि राष्ट्रीयत्व या संज्ञांचे सर्व संमत अर्थ समजावून घेणें आवश्यक आहे. कारण 'राष्ट्र' या कल्पनेचीं जीं सामान्य अथवा सर्वमान्य अशीं लक्षणें असतील तीं हिंदुस्थानांतील लोकसमुदायांस लावूनच येथील राष्ट्रीयत्व ठरवावें लागेल.

गेल्या शतकांत हिंदुस्थान सुशिक्षित झाला तो इंग्रजी भाषेच्या द्वारेंच. त्यामुळें त्याच्या मनावर पाश्चिमात्य विचारांचा परिणाम साहजिकच झाला. अशास्थितींत हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या राष्ट्र नि राज्य-शासन या प्रामुख्यानें राज्यशास्त्रीय कल्पनांवरही पाश्चिमात्य विचारांचा प्रभाव पडणें क्रमप्राप्तच होतें. अर्थातच 'हिंदुस्थान राष्ट्र आहे काय ? या प्रश्नाची चर्चाही त्या गोष्टीस अपवाद कोठून असणार ? मात्र अशा चर्चेंत घडतें तें हें कीं, पाश्चिमात्य राज्यशास्त्र हें गेल्या तीन शतकांत पश्चिम गोलार्धात झालेल्या अनेक क्रांत्यांतून उद्भवलें; आणि पाश्चिमात्य राष्ट्रांची सद्यःस्थिति बारकाईनें तपासली तर आपल्या कल्पनेहून फारच निराळी वस्तुस्थिति तेथें असलेली आढळते; ह्या अवश्य ध्यानांत घ्याव-याच्या बाबींकडे बहुधा बहुतेकांचे दुर्लक्षच होतें.

तेव्हां निदान प्रस्तुत विषयाच्या अभ्यासांत हा दोष राहूं नये यासाठीं राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व यावरील पाश्चिमात्य अधिकारी लेखकांचे विचार वरील दोन बाबी दृष्टीआड न होऊं देतां अभ्यासिणें आवश्यक

आहे. तसें केल्यानें आपल्या 'राष्ट्र'विषयक विचारांवर लख्ख प्रकाश पडेल, त्या संबंधीच्या शंकाकुशंका दूर होऊन पूर्वग्रह झिझाटले जातील, आणि विशुद्ध विचारास वाव मिळून हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व सिद्ध करणें सुकर होईल. राष्ट्र, राष्ट्रीयत्व नि राष्ट्रवाद यांची परिपूर्ण कल्पना सौकर्यानें यावी यास्तव ह्या प्रकरणांतील विवेचनाची मांडणी अशी केली आहे :—

(१) राष्ट्रवादावरील पाश्चिमात्य विचारवंतांचीं मतें.
(२) पाश्चिमात्य राष्ट्रांचा उदय केव्हां नि कसा झाला.
(३) राष्ट्राला राष्ट्रपणा देणारे कांहीं महत्त्वाचे घटकावयव.
(४) राष्ट्र नी राष्ट्रीयत्व यांच्या कांहीं प्रसिद्ध व्याख्या.
(५) तदनुसार पाश्चिमात्य राष्ट्रांच्या उभारणीची पाहणी.
(६) या सर्वांवरून हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ठरविण्यास उपयोगी पडणाऱ्या लक्षणांविषयीं निगमन.

इतक्या प्रास्ताविकानंतर आपण आतां थोडक्यांत पाश्चिमात्य राष्ट्रकल्पनेचा इतिहास पाहूं.

१ राष्ट्रवादावरील पाश्चिमात्य विचारवंतांचीं मतें

डॉ. ओके स्मिथ[1] म्हणतो :— "आधुनिक युगांतील राष्ट्रभावनेचें जिव्हाळ्याचें, तीव्र नी प्रभावी स्वरूप पाहिलें म्हणजे राष्ट्रभावना हा मानवाचा मूळ, आदिकालीन उपजत स्वभाव नसून मंद, विकसनशील अशी ती एक मानवी भावना आहे, हें म्हणणें सहजासहजीं विश्वसनीय वाटत नाहीं. या मानवी भावनेवर असंख्य घडामोडींचा परिणाम होत असल्यानें त्या जशा तिचा विकास खुंटवूं शकतात, मार्ग बदलूं शकतात, किंवा तीस नामशेषही करूं शकतात, तद्वतच तिच्या विकासाला त्या

१ डॉ. स्मिथः रेस अँन्ड् नॅशनॅलिटि, पृ. १५९.

साह्यभूतही होऊं शकतात, तिला वळण देऊं शकतात आणि त्या भावनेस पवित्र देशभक्तींत परिणत करूं शकतात."

दुसऱ्या एकाचें म्हणणें असें :—"आपल्या इच्छेविरुद्ध युद्ध घडवून आणण्याचें कर्तृत्व राष्ट्रावादाकडे जातें. ह्या तत्त्वज्ञानाची आयुर्मर्यादा संपलेली नाहीं, हें एक कटु सत्य आहे; आणि त्याचा एक जिव्हाळ्याचा प्रश्न म्हणून विचार करणें आवश्यक आहे. मानवी जविनांतील अनेक शक्तींप्रमाणें ही भावना कांहीं भौतिक अथवा यांत्रिक नाहीं; तर ती जिवंत समाजाची व्यक्तिगत जाणीव आहे. ह्या जाणिवेस बेटासारखा, नदीच्या आखातासारखा, अथवा डोंगराळ प्रदेशासारखा निश्चित चतुःसीमा असलेला एक देश; एक संप्रदाय; तसेंच जिच्यामध्यें वाङ्मयनिर्मिति झाली आहे अशी एक भाषा; आणि ह्या सर्वांहूनही अत्यंत सूक्ष्म परंतु परिणामकारक अशी शक्ति म्हणजेच समान परंपरा, अथवा भूतकालिन स्मृतीचा वारसा ह्या घटकांपासून प्रेरणा मिळते.

हर्टस्[1] म्हणतो :—" कोणत्याही राजकीय तत्वज्ञानापेक्षां राष्ट्रवादाची प्रेरक शक्ति अधिक प्रभावी ठरली आहे. राष्ट्रवादामुळें महान् राज्यक्रांत्या नी युद्धें झालीं, आणि त्याच्या धक्क्यानें मोठमोठीं साम्राज्यें सुद्धां नामशेष होऊन जगाचा आलेख (नकाशा) पालटला गेला. त्याच्या ओघास आर्थिक हितसंबंध, नीतितत्वें किंवा धर्म यांपैकीं कशानेंही बांध घातला गेला नाहीं. किंबहुना त्याच्या धक्क्यानें आपली भौतिक संस्कृति एखाद्या खोल गर्तेंत पडण्याची वेळ आली आहे."

ह्या वर दिलेल्या उताऱ्यांवरून 'राष्ट्रवाद' ह्या तत्वज्ञानाचें सामर्थ्य किती आहे याची कल्पना येण्याजोगी आहे. अशा ह्या बलशाली कल्पनेचा उद्भव कुठल्या भूभागावर नी कोणत्या काळीं झाला तें आतां पाहूं.

१ फ्रेडरिक हर्टस् : नॅशनॅलिटि इन् हिस्टरि ऍंड् पॉलिटिक्स् पृ. १

२ पाश्चिमात्य राष्ट्रांचा उदय केव्हां नि कसा झाला

जोसेफ[१] म्हणतो :—"स्पॅनिश द्वीपकल्पांत स्वराष्ट्राच्या अखंडत्वासाठीं जेव्हां स्पॅनिश लोक नेपोलियनविरुद्ध युद्धास उभे टाकले, तेव्हां शुद्ध राष्ट्रीयत्वाचीं बीजें प्रथम अंकुरलीं, असें दिसतें."

मूर[२] म्हणतो :—"राष्ट्रीयत्वाची कल्पना ही तर फारच आधुनिक आहे. फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी कोणाही राजकारणी पुरुषानें अथवा राज्यशास्त्रज्ञानें राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाचें प्रतिपादन कोठेंही केलें नव्हतें. आणि कदाचित् दुसऱ्या कोणीं तें प्रतिपादिलें असतें तर तें प्रमाणभूत म्हणून स्वीकारलेंही गेलें नसतें."

प्रो. हेज्[३] म्हणतो :—"आधुनिक राष्ट्रवादाचा उगम युरोपमध्यें अठराव्या शतकांत झाला. हें शतक क्रांतिगर्भ होतें. लिखित इतिहासाच्या कोणत्याही वेळीं झालें नसेल इतकें आत्मसंशोधन आणि विश्लेषण या शतकांत झालें."

प्रो. हॅन्स् कोहेन[४] म्हणतो :—"अठराव्या शतकापासून युरोपमध्यें राष्ट्रवादानें धर्माला खो देऊन मानवी मनावर सत्ता गाजविण्याचा मक्ता आपणाकडे घेतला आहे." आणि आपल्या ह्याच मताची पुनरुक्ति त्यानें Idea of Nationalism ह्या आपल्या नवीन ग्रंथांत केली आहे.

आल्फ्रेड् कॉबमन्[५] म्हणतो :—"राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रवाद हे शब्द आधुनिक अर्थानें, कांहीं अपवाद सोडल्यास, एकोणिसाव्या शतकापूर्वी क्वचित् योजिले जात."

---

१ बर्नार्ड जोसेफ : नॅशनॅलिटि ऍंड् इटस् प्रॉब्लेम्स्, पृ. १७९
२ रॅम्से मूर : नॅशनॅलिझम् अँड् इंटर नॅशनॅलिझम् पृ. ३७
३ प्रो हेज् : इव्होल्युशन ऑफ् मॉडर्न नॅशनॅलिझम्, पृ. ८–९
४ प्रो. हॅन्स् कोहेन : नॅशनॅलिझम् इन् फार ईस्ट्, पृ. ८
५ ऑल्फ्रेड् कॉबन् : डिक्टेटरशिप् इटस् हिस्टरि अँड् थिअरि, पृ. १६३

रॉयल् इन्स्टिटयूट्नें प्रकाशिलेल्या ग्रथांत[1] असें म्हटलें आहे कीं :— "राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व ह्या कल्पनांचा प्रादुर्भाव जरी फार प्राचीन-काळीं झालेला दिसला, तरी एक राजनैतिक शक्ति म्हणून राष्ट्रवाद हा फ्रेंच राज्यक्रांति नी तिनें निर्मिलेल्या परिस्थितीचा परिपाक आहे."

राष्ट्र आणि राष्ट्रवाद यांच्या प्रादुर्भवाच्या काळासंबंधीं पाश्चिमात्य तज्ञांचीं मतें वरीलप्रमाणें आहेत. त्या सर्वांचा आपाततः विचार केला तर आपणांस असें निर्धास्तपणें म्हणतां येईल कीं, आधुनिक राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानाचा उद्भव हा गेल्या दोन शतकांमध्येंच झालेला आहे. आतां राष्ट्र निर्माण करणाऱ्या घटकांचा अभ्यास करूं.

३ राष्ट्राला राष्ट्रपणा देणारे कांहीं महत्त्वाचे घटक

वंश :—

या विषयीं जोसेफ म्हणतो :—"वंशाची जाणीव ही मानवांवर नी राष्ट्रांवर निःसंशय फार मोठा परिणाम करते. ज्या कांहीं ठिकाणीं वंशशास्त्रज्ञाला कुठल्याही प्रकारचें सगोत्रत्व आढळत नाहीं, तेथें ही एकवंशाची जाणीव आपलें कार्य करिते; कारण तिच्या सजातीयत्वाच्या भावनेनें ममत्वबुद्धि जागृत होते. कांहीं वेळां राष्ट्रांतील राष्ट्रिकांचा 'आपण एक-वंशीय आहोंत' असा विश्वास असणें–मग सत्य सृष्टींत तसें असो वा नसो–हाच, अंशतः, राष्ट्रनिर्मितीचा एक घटक ठरतो." (पृ. ४७)

स्मिथ म्हणतो :—"म्हणून येथें असें मत प्रतिपादिलें आहे कीं, एक राष्ट्र-निर्माता घटक या दृष्टीनें वंशाला (वंशैक्य) किती महत्त्व द्यावयाचें ही गोष्ट निव्वळ ज्याच्या त्याच्या मानण्यावर अवलंबून आहे. (तथापि) वंशैक्याच्या भावनेला राष्ट्रीय जीवनांत जें महत्त्वाचें स्थान

१ रॉयल् इन्स्टिटयूट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स् : नॅशनॅलिझम्, पृ. ३१

प्राप्त झालें आहे, तें कांहीं ती भावना राष्ट्र-जीवनाचा एक शास्त्रीय घटक आहे ह्या बाह्य कारणांमुळें नव्हे, तर (राष्ट्रीय) इतिहास, वाङ्मय नी परंपरा यांतील नानाविध विचारांतुन ती उद्भवते यामुळेंच होय. एक आदर्श कल्पना असलेली वंशविषयक भावना ही राष्ट्राचें व्यक्तिमत्व घडविणाऱ्या सर्वंकश परंपरेचाच एक अंश असते." (पृ. ५०-५१)

भाषा :—

याविषयीं जोसेफचें म्हणणें असें :—"राष्ट्रीयत्वाचें मनास चटकन् दिसणारें अंग म्हणजे भाषा. दोन राष्ट्रांतील भिन्नपणा दर्शविणारा भाषे-सारखा दुसरा कोणताच घटक नाहीं." (पृ. ५४)

प्रो. मूर म्हणतो :—"भिन्न वंशांना एकत्वाची जाणीव करून देणारें भाषेसारखें खरोखरच दुसरें साधन नाहीं. एक भाषा आणि त्यामुळें निर्माण झालेली विचारांची एकरूपता, ही अनेक स्थळीं राष्ट्रघडणींतील महत्त्वाची शक्ति ठरली आहे." (पृ. ४३)

प्रो. हेज् म्हणतो :—फ्रेंच राज्यक्रांतीमधील आद्य जॅकोबिन्स हे जरी आपल्या शिक्षणविषयक कल्पना कृतींत उतरविण्यांत तितकेसे तत्पर दिसले नाहींत, तरी राष्ट्रीयत्वाचा पाया म्हणून भाषेचें महत्त्व ओळखतांच त्यांनीं फ्रान्समधील सर्व जनतेला फ्रेंच भाषाच बोलावयाला लाविलें. फ्रान्स हा एकभाषिक देश नाहीं हें ऐतिहासिक सत्य त्यांच्या संमुख होतें. कारण फ्रान्समध्यें अनेक बोली होत्या एवढेंच नव्हे, तर बऱ्याच ठिकाणीं परकीय भाषाही बोलण्यांत येत होत्या. परंतु फ्रेंच क्रांतिकारकांनीं देशांतील सर्व बोली नि परभाषा नामशेष करून त्यांऐवजीं प्रत्येक फ्रेंच नागरिकानें फ्रेंच भाषा शिकलीच पाहिजे आणि तीच उपयोगिली पाहिजे असें ठरविलें. आणि त्यायोगें भाषिक अल्पसंख्यत्व नामशेष करून, नि प्रधान राष्ट्रीयत्व उन्नत करून त्याचा पायाही त्यांनीं विशाल केला. (पृ. ६४)

धर्म :—

बर्नार्ड् जोसेफ् म्हणतो :—" राष्ट्रीयत्वाच्या प्राचीनतम प्रासादाची उभारणी मुख्यतः धर्मावर होत असे. प्राचीन राष्ट्रिकांचें सामाजिक जीवन हें धार्मिक रूढि, वहिवाटी आणि संस्कार यांवर आधारलेलें होतें." (पृ. ७१)

हर्टस् म्हणतो :—"राष्ट्रपुरुषाच्या निर्मितींत धर्माचा पगडा हा आजही एक महत्त्वाचा घटक आहे. आणि कांहीं वेळां तर भाषैक्याचा बंध सुद्धां तो दूर सारतो." (पृ. ११९)

सिज्विक् म्हणतो :—" संस्कृतीच्या इतिहासांतील कांहीं टप्प्यांमध्यें 'धार्मिक श्रद्धा' ही राष्ट्र-निर्माती शक्ति ठरली असून तिनें राष्ट्रांराष्ट्रांत भेद्ही निर्माण केले आहेत." (पृ. २२३)

मूर म्हणतो :—" धर्मैक्य हें कधीं कधीं राष्ट्रघडणीचा एक घटक म्हणून समजण्यांत येतें; आणि धर्म हा जेथें राष्ट्राच्या घडणींतील महत्त्वाचा घटक ठरला अशीं उदाहरणें खरोखर आहेतही." (पृ. ४४)

भूमि :—

बर्नार्ड जोसेफ म्हणतो :—" राष्ट्रीयत्वाच्या घटकांत अत्यंत अगत्याचा असून, ज्याची चटकन् जाणीव होईल असा घटक म्हणजे मातृभूमि हा होय." (पृ. १०१)

मूर म्हणतो :—" निश्चित चतुःसीमा आणि स्वतःचें असें कांहीं वैशिष्ट्य यांनीं युक्त अशा भूभागावरील वास्तव्य हा राष्ट्रनिर्मितींतील एक घटक समजला जातो. आणि निर्विवादपणें राष्ट्र म्हणून मान्यता पावलेल्यांना भौगोलिक एकता लाभलेली आहे असें दिसतें. आणि त्यांना झालेली राष्ट्र-पदाची प्राप्ति ही अंशतः भौगोलिक एकतेमुळेंच होय." (पृ. ४४)

परंपरा :—

बर्नार्ड् जोसेफ् म्हणतो :—" हजारों वर्षांपासून जडलेल्या संवयी आणि लाभलेलें ज्ञान यांचा परिपाक अशी जी परंपरा तिचा राष्ट्रीयत्वावर मोठ्या प्रमाणावर परिणाम होणें स्वाभाविक आहे." (पृ. १०३)

मूर म्हणतो :—" हें अगदीं संभवनीय आहे. कीं, राष्ट्र घडविणाऱ्या घटकांत ज्याचें अस्तित्व अपरिहार्य असतें असा घटक म्हणजे समान परंपरा हा होय. (कारण) तो सर्वांत अधिक कार्यक्षम असतो. एकत्र भोगलेल्या दुःखांची नी संपादिलेल्या विजयांची कवनें नी दंतकथा, राष्ट्राचें ध्येय नी वैशिष्टय यांचें प्रतीक असलेल्या थोर विभूतींची आदरणीय अभिधानें, आणि पवित्र नी राष्ट्रीयदृष्ट्या पूज्य अशीं तीर्थस्थानें या सर्वांची स्मृति म्हणजेच राष्ट्राची समान परंपरा होय." (पृ. ४८)

छळणूक :—

बर्नार्ड जोसेफ म्हणतो :—" राष्ट्रघडणींत जे घटक असतात आणि जे तिला साह्यभूत होतात अशांत छळ हा एक महत्त्वाचा घटक आहे." (पृ. १५१)

याचविषयीं झिमरन् म्हणतो :—" युरोपांत निर्माण झालेल्या राष्ट्रीयत्वाच्या विकारी नी तीव्र आकांक्षेस राजकीय छळ बऱ्याच अंशीं कारणीभूत झाला आहे." (बर्नार्ड जोसेफ, पृ. १५२)

प्रो. पिलस्बुरी म्हणतो :—" राष्ट्रीयत्वाची प्रगति जोरानें होण्यास विरोध कारणीभूत होतो. आणि तिच्या अनुच्छेदनाच्या प्रयत्नामुळें उलट तिचा विकास अथवा नवावतारच होतो." (बर्नार्ड जोसेफ, पृ. १५६)

जी. पी. गूश् म्हणतो:—ज्या वेळीं देशावर परकीय आक्रमण होतें अथवा एकादी दैवी आपत्ति कोसळते, तेव्हांच स्वतःला स्वदेशाशीं

संबद्ध करणाऱ्या बंधांची मनुष्याला जाणीव होते." (बर्नार्ड जोसेफ पृ. १५७)

युद्ध :—

हर्टस् म्हणतो :—"सर्व राष्ट्रांमध्यें एक-राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा प्रचार व प्रसार केवळ युद्धामुळेंच झाला." (पृ. १८४)

प्रो. पिल्सबुरी म्हणतो :—"राष्ट्राच्या निर्मितीस आणि ऐक्यास साह्य करणाऱ्या अनेक घटकांपैकीं 'समायिक द्वेष' हा एक घटक आहे. इतिहासाच्या अभ्यासावरून हें स्पष्टपणें दिसतें कीं, सर्व बलाढ्य राष्ट्रांचा महायुद्धामुळें आणि अनेक वर्षांच्या परस्पर वैरामुळें राष्ट्र म्हणून जन्म झालेला आहे." (फ्रेडरिक हर्टस् : पृ. ३७)

प्रो. मूर म्हणतो :—संघर्षांतून राष्ट्र निर्माण होतें, हा एक अटळ सिद्धांत आहे." (पृ. ५६)

दळणवळणाचीं साधणें :—

फ्रीडमन्[1] लिहितो :—"आगगाडीनें आधुनिक राष्ट्रनिर्मितीस फारच मोठी मदत केली आहे."

जोसेफ् म्हणतो :—"राष्ट्रनिर्मितीमध्यें औद्योगिक क्रांतीचा भाग फारच मोठा आहे. ह्या औद्योगिक क्रांतीचा उगम अठरावें शतक संपण्या-पूर्वी प्रथम इंग्लंडमध्यें झाला. आणि पुढें १९ व्या शतकांत ही क्रांति इतर देशांमध्यें प्रसरण पावली. दळणवळणाच्या साधनांच्या वाढीमुळें आणि वृत्तप्रसारास वर्तमानपत्रांच्या झालेल्या साह्यामुळें प्रत्येक देशाच्या राष्ट्रिकांमध्यें समान दृष्टिकोन नी समान हितसंबंध निर्माण झाले. आणि

१ फ्रीडमन्-दि क्राइसेस् ऑफ् दि नॅशनल स्टेट. पृ. १४८

परिणामतः स्वराष्ट्रीयत्वाची जाणीव प्रखर झाली. वृत्तपत्रें निघाल्यानें देशभक्तीस आणि राष्ट्रविषयक उत्साहास प्रोत्साहन मिळालें." (पृ. १८३)

राजपद :—

हर्टस् म्हणतो :—"राष्ट्रीय शासनांची निर्मिति ही बहुशः राजे नि त्यांच्या सरदारांनीं केली. परंतु हें करीत असतांना, असें कांहीं घडेल याची मात्र यांपैकीं कोणालाच कल्पना नव्हती." (पृ. २०८)

ओके स्मिथ म्हणतो :—"राजाच्या हातीं राजकीय शक्ति आणि राज्यकारभाराची सत्ता केंद्रित होणें याचाच अर्थ राष्ट्रनिर्मितींतील तीन महत्त्वाच्या अंगांपैकीं राष्ट्रीयत्वाच्या विकासाचें चिन्ह व घटक असणाऱ्या अशा एका अंगाची स्थापना होणें हा होय. एक राजा हा एक कायदा आणि त्यामागून येणारी एक लोकसभा यांचा अग्रदूतच आहे." (पृ. १६९)

मूर म्हणतो :—"राजाच्या सिंहासनाभोंवतीं आणि त्याच्या आधिपत्याखालींच राष्ट्रीय शासनसंस्थेचा प्रथम उगम झाला. एकादा समाज दीर्घकाळपावेतों एखाद्या राजाच्या सुप्रतिष्ठित नी सुव्यवस्थित सत्तेखालीं असल्यास राष्ट्रनिर्मितीस ती गोष्ट साह्यभूतच होते. तशांतच त्यां राज्यांत जर नागरिकांना आपल्या जीवनाचाच एक भाग म्हणून मान्य करितां येईल अशी सर्वसाधारण नी न्याय्य अशी न्यायदानपद्धति रूढ केली गेली, तर तें अधिकच पोषक ठरतें. नॉर्मन् नी अँजेव्हिअन् राजांची अरेरावी, नि त्यांनीं निर्मिलेली नामी न्यायदानपद्धति यांमुळेंच विस्कळित इंग्लिश समाजाचें राष्ट्रीयत्वाची जाणीव असलेल्या समाजांत रूपांतर झालें. फिलिफ् ऑगस्टस्पासून पुढील सर्व राजांच्या अरेरावीमुळेंच फ्रान्स देशाला राष्ट्र-पदाची प्राप्ति झाली. तसेंच पांचवा चार्लस् आणि दुसरा फिलिफ्

यांच्या अरेरावीरूपी ऐरणीवरच स्पेनचें राष्ट्रीयत्व घडविलें गेलें." (पृ. ४६)

असो; राष्ट्रीयत्व अथवा राष्ट्रवाद यावर अनेक ग्रंथ आहेत. त्यांतील कांहीं लेखकांच्या ग्रंथांतील राष्ट्र निर्माण करणाऱ्या घटकांवरील उताऱ्यांचा अनुवाद (शक्यतों शब्दशः) वर केला. आतां राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व ह्या शब्दांच्या कांहीं महत्त्वाच्या व्याख्या पाहूं.

४ राष्ट्र नि राष्ट्रीयत्व यांच्या कांहीं प्रसिद्ध व्याख्या

वेब्स्टरच्या कोशांत 'राष्ट्र' शब्दाचा अर्थ 'वंश', रीतिभाति आणि भाषा, यायोगें इतरांपासून विभिन्नता नी विशिष्टतागुणानें निराळे असलेले लोक' असा दिला आहे.

फाउलर् आपल्या कोशांत म्हणतो :—"वंश, भाषा, इतिहास नी राजकीय संस्था आदिक गोष्टींनीं इतरांहून विभिन्नत्वानें निराळे असणारे लोक म्हणजे 'राष्ट्र' होय."

प्रो. हॉलकोंब्र म्हणतो :—"स्वदेशाविषयीं ममत्वभावना व स्वदेशीयांविषयीं संयुक्तारूपी एकत्व-भावना ही राष्ट्रीयता होय. पूर्व गौरव नि वैभव अथवा पूर्वसंकटें नि सुखभोग ह्यांच्या परंपरागत स्मृतीपासून ही भावना उद्भवते."

बर्गस् म्हणतो :—"एकरूप भाषा आणि वाङ्मयासारख्या चालीरीति नि नीतिअनीतीच्या समान कल्पना असणार आणि भौगोलिक दृष्टीनें अविभक्त असलेल्या एका देशांत रहाणारे लोक यांच्या समवायाला 'राष्ट्र' वा 'जनपद' म्हणावें."

ब्लंट्स्ली म्हणतो :—"एकजातीयता, वृत्यैकता आणि भावनासाम्य यांच्या आनुवंशिक प्रवाहानें नि विशेषतः भाषा नि रीति ह्यांच्याद्वारा

बनलेली संस्कृतिसमानता ह्यांच्यायोगें समाजांतील निरनिराळ्या थरांचे आणि व्यवसायांचे लोक एकतासूत्रानें बद्ध होतात. त्या एकरूप झालेल्या मनुष्यसमूहाला 'राष्ट्र' असें म्हणतात. ही राष्ट्रीयता राज्यशासनसंस्थेची अपेक्षा न ठेवतांही इतर परकीयांपासून त्या मनुष्यसमूहाला स्पष्टतेनें नि वेगळेपणानें विशिष्ट रूप देऊं शकते."

गटेल् म्हणतो :—"जाति, भाषा, धर्म, परंपरा आणि इतिहास यांच्या एकतासंबंधामुळें लोकसमाजाला जी एकता मिळालेली असते तिला 'राष्ट्रीयता' म्हणतात. हे घटक ह्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीला एक-राष्ट्रीयतेच्या भावनेशीं निगडित करून ठेवतात."

श्री. काळे म्हणतात :—"जातीय, दैशिक, धार्मिक आणि भाषा-विषयक एकतेनें निबद्ध असलेल्या व्यक्तींच्या समुदायाला वा समाजाला 'राष्ट्र' असें म्हणतात."

ह्या वरील सर्व व्याख्या 'राष्ट्रमीमांसा' ह्या श्री. बाबाराव सावरकरांच्या[१] ग्रंथांतून घेतलेल्या आहेत.

स्टॅलिन्[२] म्हणतो :—"ऐतिहासिक उत्क्रांतीनें निर्माण झालेला आणि स्थायी अशा एकाच भाषेनें, भूमीनें, आर्थिक जीवनानें आणि आध्यात्मिक जीवन प्रतिबिंबविणाऱ्या संस्कृतीनें, अशा सर्व अंगांनीं युक्त असलेला मानवी गट म्हणजेच राष्ट्र होय."

५ पाश्चिमात्य राष्ट्रांच्या उभारणीची पाहणी

राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व यांच्या वरीलप्रमाणें कांहीं महत्त्वाच्या व्याख्या आहेत. या व्याख्यांचा साकल्यानें विचार केला तर असें दिसतें कीं, राष्ट्र

---

१ दुर्गातनय (ग. दा. सावरकर) : राष्ट्रमीमांसा, पृ. २–४

२ जोसेफ् स्टॅलिन् : मार्क्सिझम् अँड् दि क्वेश्चन ऑफ नॅशनॅलिटीज् : पृ. ६

अथवा राष्ट्रीयत्व निर्माण करणाऱ्या घटकांविषयीं व्याख्याकारांत मतैक्य नाहीं. जो तो व्याख्याकार आपापल्या दृष्टिकोनाप्रमाणें ह्या संज्ञांच्या व्याख्या करितो, आणि आपणांस आवश्यक वाटणाऱ्या घटकांवर भर देतो. दुसरें असें कीं, हे लेखक युरोपीय असल्यानें त्यांची दृष्टि युरोप आणि अमेरिका यांपलीकडे सहसा जातच नाहीं. त्यांतही समग्र युरोपाऐवजीं युरोपांतील केवळ पश्चिमेकडील राष्ट्रांचाच (Western nations) तेवढा विचार त्यांच्या हातून होतो. त्यांच्या विचारांना अशाप्रकारें लगाम बसल्यानें युरोप अथवा अमेरिकेच्या बाहेर दुसरे समाज आहेत, त्यांनाही स्वतःचा इतिहास, परंपरा, संस्कृति आहे, हें या वैचारिकांकडून ध्यानांत घेतलें जात नाहीं; आणि घेतलें गेलींच तरी तें वरवरच. अशा प्रकारें दृष्टि विकृत होण्यास एक ऐतिहासिक कारणपरंपरा आहे. सुमारें तीन शतकांपूर्वी प्रथम इंग्लंडमध्यें परिणामकारक असे वैज्ञानिक शोध लागले. त्यांतला सर्वांत महत्त्वाचा शोध वाफेचा. कारण वाफेमुळें यंत्रें सुरू झालीं. उद्योगधंद्यांत यंत्रयुग सुरू होऊन, तोंवर प्रचलित असलेल्या उद्योग-धंद्यांच्या जुनाट पद्धतीस सुरुंग लागला. अधिकाधिक लाभ कसा मिळेल याकडें व्यापारी वर्गाचें लक्ष लागलें. त्या लाभाच्या आड स्वदेशांतील समाजरचना येते असें दिसतांच ती पालटविली गेली. यामुळें एक सामाजिक स्थित्यंतर झालें. नव विचार, नवीन निर्बंध (कायदे), नवीन समाजरचना, नवीन वर्ग या स्थित्यंतरानें आणले. आगगाडीसारख्या दळणवळणाच्या नवीन साधनांनी नि वर्तमानपत्रांनी अंतर आणि वेळ यांचा दीर्घपणा नाहींसा केला. यानें समाजाची दृष्टि विशाल झाली. व्यापारास मोकळीक मिळावी यासाठीं युद्धें झालीं. युद्धांत विजय होण्या-साठीं समाजांतील एकत्वाची जाणीव प्रखर करणें आवश्यक वाटूं लागलें. आणि त्यामुळें त्या दिशेनें प्रयत्नही झाले. हे प्रयत्न नुकत्याच झालेल्या सामाजिक स्थित्यंतरामुळें यशस्वी झाले. औद्योगिक क्रांति इंग्लंडमध्यें प्रथम झाल्यानें सर्वांआधीं त्या ठिकाणीं एकत्वाची मूळ भावना अधिक

प्रखर झाली. इंग्लडच्या पावलांवर पाऊल टेवून इतर देशांनीं पण स्वसमजांत एकत्वाची भावना तीव्र करण्याचे यशस्वी प्रयत्न केले. हा सर्व यंत्रयुगाचा परिणाम आहे ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष करणें योग्य होणार नाहीं. या परिस्थितीचा युरोपीय मनावर दृढ संस्कार झाला असल्यानें युरोपीय विचारांच्या व्याप्तीला नकळत पायबंद बसतो, आणि होतें असें. कीं, राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व यांची सार्वकालिक, सार्वदेशीय आणि सर्वंकष अशी व्याख्या होऊं शकत नाहीं. अशा अवस्थेंत युरोपेतर, आणि जेथें यांत्रिक संस्कृति संपूर्ण पसरलेली नाहीं अशा समाजांनीं 'आम्हीं पण राष्ट्र आहोंत' असें म्हटल्यास त्याचा निकष कोणता ?

दुसरें असें कीं, 'राष्ट्र' पदाची प्राप्ति हा केवळ युरोपीय देशांचाच वारसा नाहीं, किंवा ईश्वराचे लाडके लेक म्हणून त्यांना प्राप्त झालेली ही कांहीं दैवी देणगी नाहीं. सर्वसामान्यपणें अथवा लौकिक अर्थानें सांगावयाचें तर असें म्हणतां येईल कीं, **समाजांतील ऐक्य भावनेची ज्वलंत जाणीव म्हणजेच आधुनिक राष्ट्रीयत्व.** वैज्ञानिक शोध पाश्चिमात्य देशांत प्रथम लागून जें सामाजिक स्थित्यंतर झालें त्यामुळें तेथील समाजांतील ऐक्य भावना दोन शतकें आधीं चेतविली गेली इतकेंच !

जातांजातां हें ही ध्यानांत ठेवलें पाहिजें कीं, राष्ट्र-भावना सांप्रत जरी प्रखर दिसत असली तरी, आज राष्ट्र म्हणून संबोधिल्या जाणाऱ्या युरोपीय समाजांना राष्ट्रपदाची प्राप्ति यापूर्वींच झालेली आहे. तसेंच आज जे जे समाज राष्ट्र म्हणून उभे ठाकलेले दिसतात त्या सर्वांना एकाच ऐतिहासिक क्षणीं राष्ट्रपदाची प्राप्ति झालेली नाहीं. युरोपच्या इतिहासाच्या अभ्यासानें ह्या विधानाची सत्यता चटकन् पटते. युरोपांतील राष्ट्र म्हणून मान्यता पावलेल्या प्रत्येक समाजास भिन्नकाळीं, भिन्न कारणांनीं आणि भिन्न ऐतिहासिक परिस्थितींत राष्ट्र हें पद लाभलेलें आहे. यामुळेंच वर उद्धृत केलेल्या अथवा इतर अशाच व्याख्यांच्या

निकषावर कुठल्याही, आणि त्यांतही आशियाई देशांतील समाजांच्या 'आम्हीं पण राष्ट्र आहोंत' या आग्रहाचें न्याय्यत्व ठरविणें योग्य होणार नाहीं. युरोपांतील राष्ट्रांचा राष्ट्र-पद-प्राप्तीचा काळ एकच कसा नाहीं, तें पुढील उदाहरणांवरून ध्यानांत येईल.

सोळाव्या शतकांत इंग्लडास राष्ट्रपद-प्राप्ति झाली. त्यानंतर कांहीं काळानें फ्रान्स राष्ट्र ठरलें. इटली १८६० मध्यें राष्ट्र-पदीं चढलें; तर जर्मनीला १८७० नें राष्ट्ररूपांत पाहिलें. १९१९ मध्यें हंगेरी, पोलंड इत्यादींना राष्ट्रीयत्व लाभलें; तर १८३२ मध्यें ग्रीस, नी १९०८ मध्यें बल्गेरिया राष्ट्ररूपांत अवतरलें.

याप्रमाणें भिन्नकाळीं नि भिन्न भिन्न कारणांमुळें राष्ट्रें निर्माण झालीं आहेत, ह्या विधानाची सत्यता त्या त्या राष्ट्रांच्या इतिहासाभ्यासानें चटकन् पटते; आणि म्हणूनच अमुक एक देश ह्या ह्या कारणांमुळें राष्ट्र-पदास पोहोंचला, म्हणून तींच कारणें दुसऱ्या देशासही राष्ट्रपद मिळवून देतील असें नाहीं. तसेंच, तीं कारणें राष्ट्रनिर्मितीस अपरिहार्य आहेत, अशीही अपेक्षा करतां येत नाहीं; कारण तीं निरपवादपणें आढळतीलच असेंही नाहीं; आणि यामुळेंच तर राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व यांची सार्व-कालिक नि सर्वंकष अशी व्याख्या घडवितां येत नाहीं. याच बाबी-संबंधीं मूर म्हणतो, " **राष्ट्र ठरविण्याचें निश्चित असें एकमेव गमक अस्तित्वांत नाहीं ही गोष्ट आपणांस मान्य केलीच पाहिजे.** एखाद्या समाजाचें 'आम्ही राष्ट्र आहोंत' असें ठाम मत असल्यास, तें चुकीचें असो, वा कांहीं अंशीं निराधार असो, तेंच प्राय: त्याच्या राष्ट्रीयत्वाचें गमक होऊं शकेल. राष्ट्रपदाला पोहोचण्यासाठीं भौगोलिक ऐक्य, अथवा वंश, भाषा, धर्म यांचें सादृश्य, अथवा सामाजिक चालीरितींची समा-नता, अथवा आर्थिक हितैक्य यांपैकीं कुठलाही घटक अपरिहार्य नाहीं. समान परंपरा ही इतर कुठल्याही घटकाहून ऐक्य-भावनेस अधिक

साह्य देते. पण तीही अपरिहार्य आहे असें नाहीं. यामुळेंच अविच्छिन्न अशी राष्ट्रीय समान परंपरा नसलेल्या अशा इतर सामाजिक गटांनाहि राष्ट्रांत भागीदारी मिळणें अशक्य नाहीं. अर्थात् 'आम्हीं राष्ट्र आहोंत' असें ज्यांचें म्हणणें असेल त्या समाजांतील व्यक्तींत आत्मीयता-बंधरूपी उपरोक्त अनेक घटकांपैकीं कांहीं घटक असणें आवश्यक आहे. परंतु त्यापैकीं कुठलाच घटक अपरिहार्य नाहीं. अशा स्थितींत कोणत्याही विशिष्ट समाजाचा 'आम्हीं राष्ट्र आहोंत' हा अभियोग न्याय्य आहे कीं नाहीं, हें कसें ठरवावयाचें? या प्रश्नाचें सिद्धांताग्रही लोकांचें ज्यायोगें समाधान होईल असें निर्णायक उत्तर व्याख्यारूपानें देणें शक्य नाहीं. राष्ट्रवादाच्या कल्पनेचा इतिहास असें उद्घोषितो कीं, ज्या त्या राष्ट्रास आपला राष्ट्रपदावरचा अधिकार सिद्ध करावा लागला आहे; आणि तसें करितांना रूढी नी विजयश्री यांचें पाठबळ लाधलेल्या विरोधी शक्तींशीं त्यास झुंज घ्यावी लागली आहे." (पृ. ५४-५५)

इथवर केलेल्या विवेचनावरून असें म्हणतां येईल कीं, राष्ट्र कीं राष्ट्रीयत्व यांची सार्वकालिक नि सर्वकष अशीं निश्चित गमकें मिळणें दुरापास्त आहे. हें विधान राष्ट्रवाद या विषयावरील बऱ्याच लेखकांना मान्य आहे. तथापि सर्वसामान्य वाचकवर्गास वरील विधानाची सत्यता सहज पटावी म्हणून पुढें कांहीं उदाहरणें उद्धृत केलीं आहेत.

प्रथम भौगोलिक एकता घेऊं :—

मूर म्हणतो :—"भौगोलिक एकता ही राष्ट्रनिर्मितीस आवश्यक आहेच असें नाहीं. कारण आपणांस ग्रीक लोकांसारखे अनेक स्थळीं विखुरलेले असूनही एकत्वाची भावना तीव्र असलेले लोक राष्ट्र म्हणून उभे असलेले आढळतात. पोलिश लोकांचीहि स्थिति तशीच आहे. त्यांना निश्चित मर्यादांनीं युक्त असा भूभाग लाभलेला नाहीं. जर्मनी नि फ्रान्स यांना विभागणारी भूरेखा अनिश्चित आहे. उलट हंगेरीस भौगोलिक

एकता लाभूनही हंगेरियनांत राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण झालेली नाहीं." (पृ. ३८)

आतां 'एक वंश' हा घटक घेऊं :—

राष्ट्रांतील जनता एकवंशीय असलीच पाहिजे ही वस्तु विज्ञानास असंमत आहे. इतिहासाच्या अभ्यासावरूनही असें आढळतें कीं, प्रत्येक राष्ट्रांत भिन्न भिन्न वंशांची सरमिसळ झालेली आहे. म्हणूनच राष्ट्राच्या निर्मितीस वंशैक्य अपरिहार्य नसतें. डॉ. ओके स्मिथ यानें आपल्या 'रेस अँड् नॅशनॅलिटी' या ग्रंथांत हें अत्यंत उद्बोधकपणें मांडलें आहे.

ज्यू समाज हा इतरांपासून शेंकडों वर्षें निराळा राहात असल्यामुळें त्यास आपला वंश इतर समाजांपासून पृथक् नि शुद्ध ठेवतां आला, असें सामान्यपणें मानलें जातें. परंतु मानवजातिशास्त्राला (Anthropology) हें मत संमत नाहीं. हें शास्त्र म्हणतें कीं, ज्यू समाज एकवंशीय नाहीं; उलट ज्यूंच्या रक्तांत दक्षिण नि पूर्व युरोप, आणि नॉर्डिक नि पौर्वात्य देश यांतील रक्तांचा संकर झालेला आहे.

पोर्तुगीज रक्ताचा निग्रो रक्ताशीं संकर झालेला आहे. स्पेनमध्यें स्पॅनिश रक्ताचा मूरिश रक्ताशीं, तद्वतच न्यूझिलंडमधील मेओरिस् रक्ताचा युरोपीय रक्ताशीं संकर झालेला आहे. अमेरिका हें तर भिन्न वंशांच्या संकराचें सर्वोत्तम उदाहरण आहे. आधुनिक इटालि रोमन टयुटॉन्स, एट्रयुस्कन्स, ग्रीक, अरब इत्यादि जमातींच्या रक्तसंकरांतूनच निर्मिलें गेलें. फ्रान्समध्येंही गॉल, रोमन, ब्रिटन्स, ट्युटन्स, इत्यादि लोकांचा संकर झालेला आहे. इंग्लंड, जर्मनि, रशिया या देशांत सुद्धां रक्तसंकर झाला नाहीं असें नाहीं. रशियन महाकवि पुष्किन नि विख्यात लेखक ड्यूमा द्वय यांच्या रक्तांत युरोपीय नि निग्रो रक्तांचा संकर झालेला आहे. डॉस्टोव्हस्की, टॉलस्टॉय आणि गॉर्कि ह्या रशियन लेखकांचा

तोंडवळा मंगोलियन आहे. वरील सर्व उदाहरणें हेंच दर्शवितात कीं राष्ट्रनिर्मितीस 'वंशैक्य' अनिवार्य नाहीं.

आतां 'एक भाषा' हा घटक घ्या :—

एका भाषेमुळें जर राष्ट्रनिर्मिति होत असती तर, दक्षिण नि मध्य अमेरिकेंत स्पॅनिश भाषेचें वर्चस्व असूनही तेथील लोकांना स्पेनविषयीं ममत्व वाटावयाला हवें. परंतु तशी वस्तुस्थिति नाहीं. इग्लंड नि अमेरिका एकभाषी असूनही त्यांचें एक राष्ट्र बनलें नाहीं. उलट स्कॉटलंड हें एक राष्ट्र असूनही त्यांतील कांही लोक गॅलिक भाषा बोलतात तर कांहीं इंग्रजी. स्वित्झर्लंडमधील जनता फ्रेंच, जर्मन नि इटॅलियन भाषा बोलते; तरी तें एक राष्ट्र आहे. बेल्जियममधील लोक फ्लेमिश, फ्रेंच नि जर्मन भाषा बोलतात. आयर्लंडांत आयरिश नि इंग्लिश भाषा बोलल्या जातात. कॅनडांतील लोक इंग्लिशमध्यें बोलतात तसेंच फ्रेंचमध्येंही बोलतात. स्वीडिश् भाषा ही फिनलंडमध्यें पण बोलली जाते. दक्षिण आफ्रिका नि वेल्स यांतही एकाहून अधिक भाषा बोलल्या जातात. तेव्हां, 'एक भाषा' हा राष्ट्रांना राष्ट्रपणा देणारा अत्यंत बलशाली घटक असला तरी तो अपरिहार्य नाहीं. तसेंच तेवढा एकच घटक असूनही कार्यभाग होत नाहीं.

'एक धर्म' हा घटक आतां घ्या :—

मूर म्हणतो : —" धार्मिक एकता हा एक राष्ट्र-घटक समजला जातो. किंबहुना धर्मभिन्नता ही राष्ट्रीयत्वास विघातक ठरते असें म्हणणेंच अधिक सयुक्तिक. डच नि बेल्जियन लोकांना एका शासनसंस्थेखालीं राहणें अशक्य झालें तें त्यांच्यांतील धार्मिक भिन्नतेमुळेंच! तसें पाहिलें तर, भाषा नि वंश या बाबतींत बेल्जियनांमध्यें जितकी अंतर्गत विभिन्नता होती, तितकी कांहीं त्यांच्यांतील कांहीं लोक आणि डच यांच्यांत नव्हती.

आयर्लंड आणि पोलंड या दोन्ही देशांत धर्मभिन्नता ही राष्ट्रैक्याच्या आड आली आहे. उलट जर्मनी अर्धा प्रॉटेस्टंट नि अर्धा कॅथॉलिक आहे. परंतु यामुळें कांहीं जर्मनींतील जनतेंत फुटीर वृत्ति निर्माण झाली नाहीं. आणि इंग्लंडला तर रिफॉर्मेशनच्या काळापासून धार्मिक ऐक्य ठाऊकच नाहीं. (पृ. ४४)

"तसेंच क्रोटस् नि सर्बस् ह्या दोन्ही गटांची भाषा जवळ जवळ एकच आहे. परंतु त्यांतील पहिला कॅथॉलिक नि दुसरा ऑर्थोडॉक्स आहे. त्यामुळें त्यांच्यांत सांस्कृतिक विभिन्नता उद्भवून त्याचा शेवट त्यांचीं दोन भिन्न राष्ट्रें होण्यांत झाला." (हर्टस्: पृ. ११९) तेव्हां एकंदरींत विचार करितां 'एक धर्म' हा घटक राष्ट्र निर्माण करण्यासाठीं आवश्यकच आहे असें नाहीं.

धर्म, वंश आणि भाषा या तिन्ही गोष्टी पोर्तुगीज नि स्पॅनिश् समाजांत बव्हंशीं समान होत्या. तरीही स्पेन नि पोर्तुगाल हीं दोन राष्ट्रें पृथक् झालीं. याविषयीं सिडने हर्बर्ट म्हणतो—"एकमेकांच्या शेजारीं असूनही एकमेकांपासून भिन्न असणारीं आयबेरियन् द्वीपकल्पांतील स्पेन नि पोर्तुगाल हीं राष्ट्रें, ओमेन म्हणतो त्याप्रमाणें, 'आधुनिक इतिहासांतील न सुटणारीं कोडीं आहेत.' कारण वंशदृष्ट्या पाहिलें तर दोन्ही समाज एकाच रक्ताचे आहेत. अर्थात् पोर्तुगालमध्यें आधुनिक काळांत निग्रोंमुळें झालेला रक्तसंकर आपण सोडून देऊं. एक भाषा या घटकाच्या अनुरोधानें पाहिलें तर प्राचीन कॅस्टिलियन् भाषेपासून कॅटलन् भाषा जितकी पृथक् आहे तीहून पोर्तुगीज कांहीं अधिक पृथक् नाहीं. धर्म पाहावा तर या दोन्ही समाजांचा एकच आहे. सुमारें ६० वर्षें एकाच शासनसंस्थेखालीं हीं दोन्हीं राष्ट्रें होतीं. इतकें असूनही या दोघांनाही आपण पृथक् राष्ट्रें आहोंत असें वाटतें; नि ही गोष्ट त्या उभय समाजांच्या भाषांतील कांहीं म्हणींवरून स्पष्ट होते. (पृ. २२) बर्नार्ड जोसेफनेंही असेंच मत व्यक्त-विलें आहे.

असाच कांहींसा प्रकार स्कँडिनेव्हिअन् देशांसंबंधीही दिसतो. याविषयीं नॅशनॅलिझम् या ग्रंथांत (पृ. २२–२३) असें म्हटलें आहे कीं, "तिन्ही स्कॅन्डिनेव्हिअन् देशांतील लोकांची उत्पत्ति एकाच वंशापासून झालेली दिसते. आणि सुमारें खिस्तवर्ष १००० पावेतों ते सर्वजण, भाषेचे प्रादेशिक पोटभेद दुर्लक्षिल्यास, एकच भाषा बोलत असत. नॉर्वे नि स्वीडन् यांना पर्वतश्रेणीनें विभागिलें असून त्या उभयतांना समुद्रानें डेन्मार्कपासून वेगळें केलेलें आहे. असें असल्यानें, नि भिन्न भौतिक कारणांमुळें नि जलवायू (हवामान) मुळें तेथील समाजांच्या आचारविचारांची धाटणी वेगवेगळी झाली. स्कॅन्डिनेव्हियन् राष्ट्रीयत्वास ही गोष्ट नुसती मारक ठरली इतकेंच नव्हे तर, त्यामुळें अत्यंत प्राचीन काळापासून प्रत्येकाचा पृथक् अहंकार जागृत केला गेला.

इतिहासांतील 'व्हिकिंग' ह्या काळखंडापासूनच नॉर्वेजियन् लोकांना आपण डॅनिश् लोकांपासून भिन्न आहोंत, असें वाटूं लागलें होतें. हीं तिन्ही राष्ट्रें पवित्र रोमन साम्राज्यापासून दूर असल्यामुळें आणि वर सांगितलेल्या भौतिक कारणांमुळें त्यांच्यांत आपापल्या भिन्न राष्ट्रीयत्वाची जाणीव दृढ झाली होती; आणि तीही फ्रान्स नी इंग्लंड यांची राष्ट्रभावना जागृत होण्यापूर्वींच ! भरपूर पुराव्यावरून हें सिद्ध करितां येईल कीं, प्रत्येकाची आपण स्वतंत्र राष्ट्र असल्याची भावना खि. व. १०३० मध्येंच इतकी तीव्र झाली होती कीं, नॉर्वे नी डेन्मार्क यांना एका शासनसंस्थेच्या आधिपत्याखालीं आणण्याचा कोणताही प्रयत्न अयशस्वी झाला असता. ही नॉर्वेजियन् राष्ट्रीयत्वाची धगधगणारी भावना १८१४ मध्यें अगदीं उचंबळली होती. परंतु दंडशक्तीमुळें त्यांना स्वीडनशीं एकत्व मान्य करावें लागलें. परंतु हें करीत असतांना लोकसभेच्या सभासदांनीं आपल्या राष्ट्रासाठीं निराळी राज्यघटना मिळविली; नी केवळ राजा काय तो एक, इतकेंच दोन्ही देशांपुरतें ऐक्यदर्शक चिन्ह त्यांनीं मर्यादित केलें. तरी पण अशी भागिदारीही उभयपक्षांस असमाधान-

कारकच वाटत होती; कारण उभय समाजांच्या परंपरांत आणि सामाजिक रचनेंत भेद होते. वरवर असलेलें हें ऐक्य दृढतर करण्याच्या स्वीडन्च्या प्रयत्नानें नॉर्वेजियनांचें राष्ट्रीयत्व मात्र चेतविलें गेलें! आणि १९०५ मध्यें सर्व संबंध तोडून नॉर्वे स्वतंत्र देश म्हणून उभा राहिला. आणि स्वीडिश् लोकांनींही संघटित लोकांविरुद्ध शस्त्र न उचलण्याचा निर्णय घेऊन इतक्या वर्षांचा (ऐक्यप्रयत्नांचा) ग्रंथ गुंडाळून ठेवला.”

६ हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ठरविण्याच्या लक्षणांविषयीं निगमन

ह्या सर्व विवेचनावरून जी एक गोष्ट सूर्यप्रकाशाइतकी स्पष्ट होते ती अशी: राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व यांचीं सर्व देशांना निरपवादपणें लागू करितां येतील अशीं गमकें आढळत नाहींत. एका देशाच्या इतिहासावरून तेथील समाजास एकत्व देणारा जो अथवा जे घटक असतात, तो वा तेच घटक दुसऱ्या कुठल्याही देशांतील समाजांस एकत्व देण्यास आवश्यक दिसत नाहींत. यामुळें अमुक एक घटक राष्ट्र निर्माण करण्यास आवश्यक आहे, असें कोणीं विधान केल्यास त्याच्या अभावींही कांहीं समाज राष्ट्र म्हणून नांदतांना दिसतात. तेव्हां याचा निष्कर्ष इतकाच कीं, सर्व राष्ट्रांना लागू पडेल अशी राष्ट्र या संज्ञेची व्याख्या करणें शक्य दिसत नाहीं.

ज्या समाजाचा असा मनोमन विश्वास असेल कीं आपण एक राष्ट्र आहोंत, त्यानें आपल्या इतिहासाचा अभ्यास करून स्वसमाजांतील लोकांस एकत्व देणारी कारणपरंपरा पाहावी. ही कारणपरंपराच त्या समाजाचा राष्ट्रपदावर अधिकार स्थापन करण्याचा निर्दोष पुरावा होय. समाजाला एकत्वाची जाणीव करून देणारी कारणपरंपरा हीच त्याच्या राष्ट्रीयत्वाचें लक्षण. प्रत्येक राष्ट्राच्या ऐतिहासिक अवस्थेप्रमाणें हीं लक्षणें

भिन्न असू शकतात. कोणत्याही प्रकारें अस्खलनीय विधान करण्याचा धाडसी यत्न न करितां आपणांस असें म्हणतां येईल कीं, **प्रदीर्घ काळापासून एखाद्या समाजांत ऐक्यभावना नांदत असेल तर, ऐक्याचे ते बंध सांप्रत जरी शिथिल अवस्थेंत आढळले तरी, त्या समाजास स्वतःला राष्ट्र म्हणवून घेण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.**

येथेंच वरील विधेयाच्या अनुषंगानें जी दुसरी वस्तु ध्यानांत ठेविली पाहिजे ती अशी. प्रखर ऐक्यभावना केवळ पाश्चिमात्य राष्ट्रांत आढळते; अतएव तींच काय तीं राष्ट्रें आहेत असें मानण्याचें कारण नाहीं. कां कीं बहुतेक पाश्चात्य देशांत आज आढळणारी एकत्वाची तीव्र भावना चालू युगांतीलच आहे. आणि वर म्हटल्याप्रमाणें यांत्रिक संस्कृतीचा तो परिणाम आहे. ती पुरातन निश्चित नाहीं. आज आढळणारी ऐक्य भावनेंतील तीव्रता पूर्वीपासूनच त्या समाजांत असती तर, ज्या अमेरिकेचा एक वैभवशाली राष्ट्र म्हणून आज एवढा उदोउदो होत आहे, त्या अमेरिकेंत गेल्या शतकांत अंतर्गत यादवी झालीच नसती! तसेंच एक प्रखर राष्ट्र म्हणून ज्या जर्मनीनें नांवलौकिक मिळविला त्या जर्मनीस सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी जी एकत्वाची इच्छा होती तिला मूर्त स्वरूप देण्यासाठीं बिस्मार्कची आवश्यकताच लागली नसती! आणि त्यांतही बिस्मार्कनें ज्या मार्गानें एकीकरण घडवून आणलें, त्या मार्गाविषयीं जर्मन जनता उदासीनच होती! नैतिक दृष्ट्या हीन समजल्या गेलेल्या उपायांनींच जर्मनीस ऐक्य मिळालें. युद्ध, तरवार, रक्त आणि विश्वासघात यांच्या साह्यानेंच बिस्मार्कनें जर्मनीस एकत्व दिलें. काहूर नसता तर इटलीस राष्ट्रपदाची प्राप्ति झाली असती कीं काय याविषयीं शंका आहे, असे उद्गार इटलीविषयीं इतिहासकार काढतात.

या सर्व विवेचनावरून आपणांस असें निर्विवादपणें म्हणतां येईल कीं, प्रदीर्घ काळापासून जर एखाद्या समाजांत एकत्वाची भावना नांदत असेल

तर, त्यास आधुनिक काळीं राष्ट्र या संज्ञेस पात्र होण्यास कांहींच आडकाठी नाहीं. समाजाच्या ह्या एकत्वाच्या भावनेस आधुनिक यंत्रयुगांतील वृत्तपत्रें, रेडिओ, चित्रपट, आगगाड्या, विमानें इत्यादि दळणवळणाच्या अद्यावत् साधनांनीं केव्हांही प्रखर करितां येईल. असो.

आपल्यासारख्या सामान्य लोकांच्या मनांत राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व याविषयींच्या कुठल्या ना कुठल्या तरी कल्पनेनें घर केलेलें असतें. आतां-पावेतों दिलेली उपरोक्त माहिती त्यावर लख्ख प्रकाश टाकील; आणि हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ठरवितांना पाश्चात्य राष्ट्रें अथवा पाश्चात्य विचार-धारा किती प्रमाणांत मानदंड म्हणून स्वीकारावयाच्या हें आपणांस आतां सहज ठरवितां येईल. वरील माहितीचा उपयोग असा कीं, आपण पाश्चात्य राष्ट्रें जरी थोड्या प्रमाणांत आदर्श मानिलीं तरी त्यांस अस्खलनीय मान-दंड खचित समजतां येणार नाहीं.

आतां हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व निश्चित करितांना, 'ज्या समाजांत एक-त्वाची जाणीव प्रदीर्घ काळापासून नांदत असेल, तो समाज राष्ट्र होय,' ह्या वरील सिद्धांताचा आपण उपयोग करूं. आज हिन्दुस्थानांत हिन्दु, मुसलमान, पारशी, खिश्चन, ज्यू असे नांव घेण्यांजोगे समाज आहेत. ह्यांतील प्रत्येकाची संस्कृति इतरांहून बरीच भिन्न आहे इतकेंच नाहीं तर, ती तशी भिन्न रहावी असा प्रत्येक जण यत्न करीत आहे. ह्याचा परिणाम असा कीं, हिन्दुस्थानांत निवसिणाऱ्या सर्व लोकांचा मिळून एकरसी, एकसंधी असा हिन्दी समाज मानण्याऐवजीं आपणांस अनेक समाज मानावे लागतात. असे भिन्न लोकसमुदाय हिन्दुस्थानांत असतांना, मग कोणत्या लोकसमुदायास हिन्दुस्थानांतील 'राष्ट्र' मानावयाचें, ह्या प्रश्नाचें उत्तर सापेक्षतेनें द्यावें लागेल.

हिन्दुस्थानांतील भिन्न लोकसमुदायांचा भारतीय शासन-संस्थेचे नागरिक म्हणून येथें निवास करण्याचा अधिकार मान्य

करूनही, हिंदुस्थानांतील अनेक समाजांपैकीं जो समाज निवासभूमि, ऐक्यभाव, लोकसंख्या आणि संस्कृति यांचा विचार करितां, इतरांहून प्रधान ठरेल तो समाज राष्ट्र आहे, हें निगमन स्वीकृत करावें लागतें.

याप्रमाणें पाहतां हिंदुस्थानांतील हिंदु समाजाचा येथें निवसिणाऱ्या इतर समाजांपेक्षां हिंदुस्थानावर प्रधान अधिकार आहे. प्राचीन काळापासून हिंदुस्थान ही हिंदूंची निवासभूमि आहे. इतरांपेक्षां हिंदूंची लोकसंख्या येथें अधिक आहे. फार प्रदीर्घ काळापासून हिंदु म्हणून त्यांच्यांत ऐक्यभाव आहे. ह्या भूमीवर स्व-संस्कृतीचा ठसा त्यांनीं उमटविला आहे. आणि ह्या भूमीस स्वजातीचें नांव देण्यांत हिंदु यशस्वी झाले आहेत. ह्या सर्व कारणांमुळें हिंदु समाजास हिन्दुस्थानांत इतरांच्या मानानें प्राधान्य आपोआपच प्राप्त झालें आहे. अतएव हिन्दुस्थानांत हिन्दु हेच राष्ट्र ठरतात. आणि म्हणूनच हिन्दुत्व हेंच हिन्दुस्थानचें राष्ट्रीयत्व होतें. हा सिद्धांत कसा सत्य आणि न्याय्य आहे हें हिन्दुस्थानांतील राष्ट्रवादांच्या विचारधारांचा आपण जसजसा अभ्यास करूं तसतसें आपणांस अधिकाधिक पटेल. तेव्हां आतां आपण त्या विचारधारांच्या समालोचनाकडे वळूं.

प्रकरण २ रें

★

हिंदी राष्ट्रवाद

पहिल्या प्रकरणान्तीं म्हटल्याप्रमाणें, हिंदुस्थानांत हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व आहे, या आपल्या निगमनाचें न्याय्यत्व समजण्यासाठीं हिंदुस्थानांतील राष्ट्रवादाच्या प्रधान विचारधारांचें समालोचन आपण या आणि पुढील प्रकरणांत करूं. गेल्या पाउणशें वर्षांच्या अवधींत राष्ट्रवादाच्या तीन विचार-प्रणालिका येथें प्रचलित असलेल्या आढळतात. हिंदी राष्ट्रवाद, हिंदूराष्ट्रवाद आणि द्विराष्ट्रवाद ह्या त्या प्रणालिका होत. यांपैकीं हिंदी राष्ट्रवादाचा विचार आपण प्रथम करूं.

१८५७ मध्यें इंग्लिश राजसत्तेविरुद्ध क्रांतियुद्ध करण्यांत आलें. पण तो प्रयत्न अयशस्वी झाला, आणि इंग्लिश राजवटीनें हिंदुस्थानांत आपला पाय जोरानें रोवला. क्रांतिशमनासाठीं जे भीषण उपाय योजण्यांत आले त्यानें हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या मनांवर भितीचा पगडा बसला, आणि पुढील बरीच वर्षें हिंदुस्थानांत स्मशान-शांतता पसरली. गेल्या शतकाचा अंत होण्यापूर्वी दोन दशकें सनदशीर चळवळीस आरंभ झाला. हिंदी समाजास हळूहळू राजकीय अधिकारांची प्राप्ति झाली पाहिजे, असें ह्या चळवळीचे पुरस्कर्ते प्रतिपादन करूं लागले. ही अधिकारप्राप्तीची चळवळ सनदशीर मार्गानेंच यशस्वी होईल असा त्यांचा विश्वास होता. ह्या राजकीय मागणीस वाटाण्याच्या अक्षता लावतांना सरकारकडून निमित्त पुढें करण्यांत येई तें असें: हिंदी जनतेला स्वराज्याचे अधिकार देण्याची

आमची पण इच्छा आहे. पण, असे अधिकार संघटित समाजच मागूं शकतो; नि मग त्याची मागणी अमान्य होत नाहीं. कारण आपल्या संघटितपणामुळें मिळालेले अधिकार संभाळण्यास तो समर्थ असतो. संघटि-पणाचा हिंदुस्थानांतील लोकांत आज अभाव आहे, आणि जोंपावेतों त्यांच्यांत तो निर्माण होत नाहीं तोंपावेतों स्वराज्यदानाचा प्रश्नच संभवत नाहीं!

या कोटिक्रमास उत्तर देण्याच्या प्रयत्नांत हिंदी राष्ट्रवादाचा उद्भव झाला.

हिंदी राष्ट्रवादाचें तत्त्वज्ञान उभें करणाऱ्यांच्या मनावर राज्यशास्त्रा-वरील इंग्लिश ग्रंथांच्या अभ्यासाचा आणि युरोपांतील दुरून दिसणाऱ्या परिस्थितीचा परिणाम झाला होता. त्यामुळें, जर्मनी ज्याप्रमाणें जर्मन लोकांचा आहे, इंग्लंड ज्याप्रमाणें इंग्लिश लोकांचें आहे, त्याचप्रमाणें हिंदुस्थानही हिंदी लोकांचा आहे, असा अभियोग (दावा) मांडण्यास त्या-वेळच्या नेमस्ताग्रणींनीं आरंभ केला. ह्या तत्त्वज्ञानावर अधिकृत असे ग्रंथ—पट्टाभी सीताराम अय्या यांचा ग्रंथ वगळल्यास—जवळ जवळ नाहींतच. त्यामुळें या राष्ट्रवादाची रूपरेषा समजण्यासाठीं, त्यावरील न्या. रानडे यांचे विचार उद्धृत करितों. रानडे[1] म्हणतात–"उद्यांच्या हिंदी राष्ट्रांत कुठल्याही प्रकारच्या वंश, धर्म वा वर्णभेदाला स्थान असणार नाहीं. इतर कोणत्याही गोष्टीस महत्त्व न देतां आम्हीं सर्व स्वतःला प्रथम हिंदी समजतों, आणि चिरकाल असेंच समजणार. इतके दिवस हें ज्ञान आम्हांस न झाल्यामुळें आम्हीं एक संघटित हिंदी राष्ट्र निर्माण करूं शकलों नाहीं". रानड्यांच्या ह्या उद्गारांत आपणांस हिंदी राष्ट्रवादाचें सार आढळतें. थेट न्या. रानडे यांचेपासून तें आजच्या भारताचे महामंत्रि नेहरू यांच्यापर्यंत हीच विचारप्रणाली चालू आहे. नेहरूंच्या भाषणांतून तर ही विचारसरणी सतत मांडलेली असते.

१ न. र. फाटकः न्या. रानडे यांचें चरित्र, पृ. ५९१

ह्या राष्ट्रवादाचा विशेष म्हणजे प्रादेशिक एकतेवर त्यांत दिला गेलेला भर. म्हणूनच हा राष्ट्रवाद 'प्रादेशिक राष्ट्रवाद' या नांवानेंही संबोधिला जातो. असो. स्वराज्याच्या एकमुखी मागणीसाठीं भिन्न भिन्न लोक-समुदायांच्या एकीची आवश्यकता होती. इंग्लडांतील राष्ट्र-भावनेचा आदर्श डोळ्यासमोर असल्यानें, आणि इंग्लिश राजवट चालू असल्यानें त्यावेळीं प्रादेशिक कल्पनेस अधिक महत्त्व प्राप्त व्हावें यांत आश्चर्य नाहीं. हिंदी लोकांस एकत्व देणारे घटक म्हणून ब्रिटिश शासनाविरुद्ध असलेले समाईक द्वेष आणि वैर, एक निवासस्थान, समान आर्थिक हितसंबंध, एकच रम्य भविष्यकाळ यांवर भर देण्यांत येऊन हिंदी-राष्ट्रवादाचें तत्त्वज्ञान निर्मिलें गेलें. 'हिन्दूंचा हिन्दुस्थान' ही शेंकडों वर्षांपासून चालत आलेली विचारसरणी दूर सारून, तत्कालीन पुढाऱ्यांनीं हिंदी राष्ट्रवादाची नवीन बैठक घातली; आणि पुढील शिकवणीस आरंभ केला :—हिन्दुस्थानांतील सर्व जनता हिंदी असून प्रत्येकानें अतःपर आपणांस हिंदी समजलें पाहिजे. हिन्दुस्थान हा हिन्दुस्थानांत निवसिणाऱ्या सर्व लोकांचा आहे; आणि म्हणूनच ह्या देशभूमीवर सर्वांनीं प्रेम केलें पाहिजें इतकेंच नाहीं तर, ह्या भूमीस गौरवाप्रत नेण्याचा प्रयत्न हिन्दुस्थानच्या प्रत्येक नागरिकानें निष्ठेनें केला पाहिजे.

हिन्दुस्थानच्या त्या वेळच्या राजकीय परिस्थितींत या अभिनव विचाराला विरोध करण्याची कोणांतच शक्ति नव्हती. ही अभिनव विचारधारा हें राजकीय स्वातंत्र्य मिळविणाऱ्या चळवळीच्या हातांतील साधन समजलें गेल्यामुळें कोणी तिला विरोध करणें तेव्हां शक्यही नव्हतें.

'राष्ट्रीयत्व ही निराळी वस्तु आहे, नि म्हणूनच तिचा विचार निराळ्या रितीनें झाला पाहिजे; स्वातंत्र्याचा आणि राष्ट्रीयत्वाचा घोंटाळा करणें योग्य नाहीं,' हा विचार सावरकरांनीं प्रथम मांडला. पण तो विषय येथें प्रस्तुत नाहीं.

असो. हिंदी-राष्ट्रवाद या अभिनव कल्पनेचा सतत प्रचार झाल्यानें एकरसी, एकसंधी हिंदी समाजपुरुष उभा असल्याची भुलावू परिस्थिति निर्माण झाली. अर्थात् 'हिंदी राष्ट्र' ही कल्पना जर फलद्रूप होती, तर सोन्याहून पिवळें झालें असतें ! कारण तसें पाहिलें तर, 'हिंदी राष्ट्र' या विचाराशीं कोणाही विवेकी व्यक्तीचा विरोध कसा असणार ?

अशा प्रकारें काँग्रेसच्या नेतृत्वाखालीं राजकीय चळवळ चालली होती. ह्या चळवळीचा पाया 'जाति–धर्म–निरपेक्ष हिंदी–राष्ट्र' हाच होता. ह्या चळवळीमुळें कांहीं राजकीय मागण्या मान्य होणार असें दिसतांच, मुसलमानांना आपण अल्पसंख्य आहोंत याची जाणीव झाली. आणि मग आपण अल्पसंख्य असल्यामुळें संरक्षण आणि विशेष सूट मागण्याचा आपणांस अधिकार आहे असा मुसलमानांचा ग्रह होऊन तसा प्रचार त्यांनीं आरंभिला. विभक्त-मतदार-संघाची मागणी करण्यांत येऊन १९०५ मध्यें मुस्लिम लीगची स्थापनाही झाली. या नवीन घटनेनें भारतान्त-र्गत राजकीय विचारांत नवीन अडथळा उभा केला. कारण आतांपावेतों प्रचलित असलेली विचारधारा हिंदी-राष्ट्राची होती. आतां तद्विरुद्ध विचार मांडण्यास मुसलमानांनीं आरंभ केला. आम्हीं मुसलमान निराळे आहोंत, म्हणजे अल्पसंख्य आहोंत, याचा स्पष्ट अर्थ 'आम्हीं हिंदी नाहीं' असाच झाला. मुसलमानांची पृथक्पणाची आणि अल्पसंख्यकत्वाची भावना, 'हिंदी राष्ट्र' या कल्पनेशीं मूलतः विरोधी आहे. मुसलमान अल्पसंख्य आहेत, म्हणूनच त्यांना विशेष अधिकार आणि संरक्षण मिळालेंच पाहिजे, असें १९०९ मध्यें ब्रिटिश सरकारकडून टी. आर्. बुचनन यांनीं सांगितले. १९१६ मध्यें काँग्रेसनें लीगशीं जो लखनौ-करार केला त्यामध्यें मुसलमानांचा अल्पसंख्य असल्याचा अभियोग उघडपणें मान्य करण्यांत आला. परंतु अशाप्रकारें मुसलमान अल्पसंख्य आहेत हा अभियोग मान्य करितांना, हिंदी राष्ट्रवाद अयशस्वी आणि विकलांग झाला आहे ही गोष्ट दृष्टिआड झाली. समान संकटानें राष्ट्र निर्माण होऊं शकतें,

तसेंच आर्थिक हितैक्य हें सर्वांहून अधिक संघटन साधूं शकतें, ह्या दोन्हीही गोष्टी मुसलमानी वृत्तीनें खोट्या ठरविल्या. अशी ही मुसलमानी वृत्तीच हिंदी राष्ट्रास मारक ठरली.

आतां हिंदी राष्ट्रवाद स्वयंसिद्ध आणि तर्कशुद्ध कसा नाहीं हें पाहावयाचें. परंतु या विवेचनास हात घालण्यापूर्वी हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांतील सर्व जनता हिंदी या विचाराशीं कोणाही सुज्ञ माणसाचा विरोध नाहीं. असो. ज्याप्रमाणें हिंदुराष्ट्रवादाच्या दृष्टीनें गुजराथी, मराठी, बंगाली, मद्रासी हे सरसकट जसे हिंदु, तद्वतच हिंदी राष्ट्रवादाच्या दृष्टीनें हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन हे सर्व हिंदी. ह्यामुळेंच हिंदूराष्ट्रवादांत सिंधी, ब्राह्मण, मराठा ह्या फुटीर कल्पनांना जसें स्थान नाहीं, तसेंच हिंदीराष्ट्रवादांत हा हिंदु, हा मुसलमान, हा ख्रिश्चन ह्या भेदांना अवकाश नाहीं. याचा अर्थ असा: "अखंड हिंदुस्थानांत कुठल्याही प्रकारचा द्वैतभाव नसलेला असा एकरसी, एकसंधी हिंदी समाज मानणें हाच हिंदी राष्ट्रवाद होय." असा हा राष्ट्रवाद स्वयंसिद्ध कां मानावयाचा नाहीं? कारण असें:— हिंदी-राष्ट्र या कल्पनेंत एकरसी, एकजिनसी समाजधारणा आहे असें गृहित धरण्यांत येत असल्यानें, तेथें अल्पसंख्यकत्वाला स्थान रहात नाहीं. अखंड हिंदुस्थानांत भिन्न भिन्न लोक समुदाय हे 'हिंदी' या एकाच नांवांत समाविष्ट होऊं शकत असल्यानें अल्पसंख्य असें कोणी उरतां कामा नये; पण वस्तुस्थिति तशी नव्हती.

दुसरें असें कीं, हिंदी राष्ट्रवादाची कल्पना अखंड हिंदशीं निगडित असल्यामुळें हिंदुस्थानचे भारत आणि पाकिस्तान असे पडलेले खंड हिंदीराष्ट्रवादाची विफलता विदारकतेनें दाखवितात.

मुसलमानांच्या अल्पसंख्यकत्वाला ब्रिटिश राजवटीनें मान्यता मिळाली होती असेंही म्हणण्याचें आतां कारण नाहीं. कारण खंडित हिन्दु-

स्थानच्या राज्य-घटनेच्या आराखड्यांतही[1] अल्प-संख्यांक जमातींचें अस्तित्व दर्शविणारीं चिन्हें होतीं.

स्वीकृत राज्यघटनेंत ते विभाग पुढें आरगळण्यांत आले. पण त्यांत एक चतुराई करण्यांत आली. मुसलमानांचें पहिल्यापासून जें प्रतिपादन होतें कीं भाषा, लिपी आणि संस्कृति या दृष्टीनें मुसलमान हे इतरांपासून निराळे आहेत, त्या प्रतिपादनास स्वीकृत घटनेंतील विभाग २९ नें, मुसलमान नि इतर जमातींचें उघड नांव न घेतां, मान्यता देण्यांत आली आहे. विभक्त-मतदार संघ राज्यघटनेंतून काढून टाकण्यांत आल्यामुळें पुन्हां एकदां 'हिंदीराष्ट्र' या कल्पनेस जोर मिळाला. पण तो तितकाच ! कारण त्या कल्पनेची विफलता अत्यंत हिडिसपणें नि भीषणतेनें दिसावी यासाठींच कीं काय, बंगालची कथा रक्तानें लिहिली गेली ! यानंतर परवां दिल्ली-करार झाला. ह्या करारानें पुनश्च खंडित हिंदुस्थानांत मुसलमान अल्पसंख्य झाले. हिंदीराष्ट्रकल्पनेशीं विसंगत असणाऱ्या वरील कारणांची सोपान परंपरा आपल्यासमोर असतांना हिंदीराष्ट्रवाद स्वयंसिद्ध कसा मानावयाचा ?

नुकतेंच जयप्रकाश नारायण यांनीं स्वतःच्या भूमिकेविषयीं एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यामध्यें ते म्हणतात[2]–"हिन्दुस्थान आणि पाकिस्तान हे दोन देश एकराष्ट्रीयत्वासारखा प्रश्न निरनिराळ्या भूमिकेवरून सोडवूं लागले. कॉंग्रेसनें देशविच्छेदन जरी स्वीकारलें तरी तिनें द्विराष्ट्रवादाला मान्यता कधींच दिली नाहीं. दोन्ही जमातींना समान अशा हिंदी राष्ट्रीयत्वावर तिचा विश्वास होता. दोन विनाशकारक गोष्टींपैकीं कमी विनाशकारक म्हणून विच्छेदन तिनें स्वीकारलें होतें. कारण

---

१ राज्य घटना-आराखडाः विभाग २९२-२९९

२ दि संडे न्यूज् ऑफ् इंडियाः दि. ७ मे. १९५०.

तसें केलें नसतें तर, अनन्त अशा जातीय कलहाची अधिक विनाशकारक घटना हिंदसमोर उभी होती. लहानसा जातीय हिन्दु गट वगळला तर हिंद एक-राष्ट्रीयत्वाच्या—हिंदी राष्ट्रीयत्वाच्या—श्रद्धेयावर राजकीय पथ आक्रमूं लागला."

समग्र हिंद हा जर खरोखरच एकराष्ट्रीयत्वाच्या–हिंदीराष्ट्रीयत्वाच्या–श्रद्धेयावर आपला राजकीय जीवनक्रम आक्रमूं लागला होता, तर मग दिल्ली-करारांतील हिंदुस्थानांतील अल्पसंख्यीयांच्या बडदास्तीची आवश्यकता काय होती? एक निवासभूमि, समान आर्थिक हितें, आणि एकत्र रम्य भविष्यकाळ यांपेक्षां संस्कृति, भाषा, लिपि आणि धर्म यांचीच ओढ अधिक ठरली, असें दिल्ली–करारानें सिद्ध होत नाहीं काय? मुसलमान अल्पसंख्य आहेत असें म्हणून त्यांचे धार्मिक आणि सांस्कृतिक अधिकार मान्य केल्यानें, एकरसी हिंदी समाज अस्तित्वांत नाहीं याची गर्भित मान्यता दिल्ली करारानें दिली आहे.

पाकिस्तानचे ख्यातनाम पुरस्कर्ते डॉ. आंबेडकर ह्यांच्या मतें हिंदुस्थान पूर्वी कधींच एकजिनसी राष्ट्र नव्हता. पाकिस्तानच्या मागणीचा त्यांचा पाठपुरावा त्यांच्या ह्या मतांतूनच निघाला. आतां हिंदुस्थान पूर्वी कधींच एकजिनसी राष्ट्र नव्हता हें त्यांचें मत जरी विवाद्य असलें तरी, चर्चेपुरतें येथें तें बरोबर आहे असें गृहीत धरूं. बरें; पाकिस्तान निर्मितीनें तरी एकजिनसी राष्ट्र उभें होतें कां? आंबेडकरांना पाकिस्तान निर्मितीनें जातीय प्रश्न सुटेल आणि एकजिनसी समाजधारणा होईल असें कांहीं वाटत नाहीं. तो प्रश्न सोडविण्याचा मार्ग त्यांना लोकसंख्येच्या स्थलांतरांत आढळला. ते म्हणतात.[१] "हिंदुस्थानांत एकजिनसी राष्ट्र घडवावयाचें असेल तर, 'लोकसंख्येचें स्थलांतर' व्हायलाच हवें. जोंपर्यंत असें स्थलांतर होत नाहीं तोंपर्यंत पाकिस्तान निर्माण होऊनही बहुसंख्य-अल्पसंख्य हा

१ डॉ. आंबेडकरः पाकिस्थान पृ. १११.

प्रश्न खंडित हिंदुस्थानांतही उरतोच. आणि त्याच्या पोटांत विभिन्नता राहते. वरील विधानाची अत्यंत सूक्ष्म चिकित्सा केली तर त्यांतून निगमन निघतें तें असें :—(१) अखंड हिंन्दुस्थानांत एक-रसी हिंदी-राष्ट्राची शक्यता नव्हती, म्हणूनच आंबेडकरांनीं पाकिस्तानच्या मागणीचा पाठपुरावा केला. (२) आणि तेवढ्यानेंही त्यांना उरलेल्या खंडित हिन्दुस्थानांत एकसंधी हिंदी राष्ट्र होईल अशी शक्यता न दिसल्यानें, त्यांनीं लोकसंख्येचें स्थलांतर सुचविलें.

आतां आंबेडकरांना खंडित हिन्दुस्थानांतही लोकसंख्येच्या स्थलांतरा-वांचून एकजिनसी राष्ट्र निर्माण होणें शक्य नाहीं असें जें वाटतें त्याचें कारण असें असावें. आंबेडकरांना अशी शंका वाटत असावी कीं, हिन्दुस्थानची पहिली फाळणी ज्यामुळें झाली तींच कारणें खंडित हिन्दुस्थानांतही हिंदी राष्ट्रवादास मारक ठरतील. अर्थात् पहिल्या फाळणीची कल्पना ज्यांना नाहीं त्यांना वरील विचारांशीं सहमत होणें जरासें कठीणही जाईल. कारण, पाकिस्तान निर्मिति झाल्यापासून, खंडित हिन्दुस्थानांतील लीगचे नेते 'आतां आम्हीं हिन्दुस्थानशीं एकनिष्ठ राहूं. तसेंच पाकिस्तान आणि हिन्दुस्थान ह्यांचें उद्यां युद्ध झालें तर हिन्दु-स्थानच्या वतीनें आम्ही पाकिस्तानासमोर युद्धास उभे ठाकूं' अशीं अभिवचनें देत आहेत. परंतु हीं अभिवचनें देण्याची आवश्यकता कां असावी ? हीं अभिवचनें ऐकलीं म्हणजे पहिला प्रश्न असा उभा राहतो कीं, पाकिस्तानच्या निर्मितीसाठीं काल प्राणपणानें झटणारे हे पाकिस्तानी पुढारी, उद्यां भारत-पाकिस्तान युद्ध जुंपल्यास भारताच्याच बाजूला उभे राहून त्याशीं एकनिष्ठ रहाण्याची ईर्षा बाळगतात, तर पाकिस्तान निर्मितीच्या युद्धाचे वेळींच आपला कौल त्यांनीं हिन्दुस्थानचे बाजूनें कां दिला नाहीं ? चर्चेपुरतें क्षणभर असें धरून चालूं कीं, उत्तर हिन्दुस्थानांतील मुसलमानांनीं पाकिस्तानच्या मागणीस पाठिंबा दिला तो

क्षम्य होता. कारण पाकिस्तान-निर्मितीनें त्यांना स्वतःसाठीं निराळा भूभाग मिळत होता. परंतु उत्तर प्रदेश, मुंबई, मद्रास ह्या ठिकाणीं रहाणाऱ्या मुसलमानांना पाकिस्तान झाल्यानें काय लाभ होणार होता? त्यांचें जीवन हिन्दुस्थानांतच व्यतीत होणार होतें; त्यांचें दैव याच भूमीशीं निगडित होतें. तेव्हां आपल्या निवासस्थानापासून जें पाकिस्तान शेंकडों मैल दूर होतें त्याच्या निर्मितीच्या चळवळीस पाठिंबा देण्याचें ह्या मुसलमानांना कोणतें कारण होतें? तें कारण म्हणजे भारताचें संपूर्ण इस्लामीकरण करण्यासाठीं सुसंरक्षित नि स्वसत्तांकित अशा भूभागाची (पाकिस्तानची) आवश्यकता होती हें होय. अशा इस्लामी राजसत्ता असलेल्या भूभागावरून भारताचें इस्लामीकरण करणें सोपें जाईल असें मुसलमानांना वाटे. हिन्दुस्थानचें विच्छेदन कां आणि कसें करावें या विषयावर उपलब्ध असलेल्या अनेक ग्रंथांपैकीं पंजाबीचा एक ग्रंथ आहे. हिन्दुस्थानच्या विभाजनाच्या ज्या कांहीं योजना मांडण्यांत आल्या होत्या त्यांतील अब्दुल लतीफच्या योजनेवर विचार करितांना हा ग्रंथकार[1] म्हणतो, "सय्यदसाहेबांची योजना ही हिन्दु विभागांतून मुसलमानांचें स्थलांतर सुचविते. परंतु इस्लामच्या पुढील प्रसारास मारक ठरत असल्यानें ती विचारार्ह नाहीं". याचविषयीं सविस्तर चर्चा करतांना पंजाबी म्हणतो, "इस्लामच्या प्रसाराच्या दृष्टीनें हिन्दु नि मुसलमान हे एकमेकांत मिसळलेले रहाणेंच आवश्यक होतें. परंतु ते याप्रकारें एकमेकांत मिसळण्यानें परकीय संस्कृतीचा आणि धर्माचा इस्लामीयांवर जो परिणाम होणार होता त्यापासून दूर राहण्यासाठीं हिंदुस्थानापासून राजकीय नी सामाजिक दृष्ट्या निराळा भूभाग आवश्यक होता. अशा स्वतंत्र भूमीवरून हिन्दुस्थानांतील इस्लामी बीजाच्या विकसनाला अधिक साहाय्य झालें असतें. अशाप्रकारचा मुस्लिम-शासित स्वतंत्र भूभाग आजही मुसलमानांना स्वसंरक्षणार्थ

१ पंजाबीः कॉनफेडरसी ऑफ् इंडिया. पृ. ७

आवश्यक आहे." (पृ. १२४) ह्या उताऱ्यावरून मुसलमानी वृत्तीचा आणि आकांक्षांचा बोध होतो.

हिंदुस्थानांत हिंदी राष्ट्र निर्माण करण्यास हिंदुस्थानांतील इतर लोकांइतकेच आपणही साहाय्य करूं ही ईर्षा न बाळगतां, हिंदुस्थानचें इस्लामीस्तान कसें होईल ही इच्छा मुसलमानांचें मनांत अहर्निश असते. आणि हीच तेवढी हिंदी राष्ट्रवादाच्या विचारधारेस मारक ठरते. ह्यामुळेंच आंबेडकरांनीं लोकसंख्येच्या स्थलांतराची सूचना केली असावी.

हिंदीपणाशीं प्रतिकूल असलेल्या मुसलमानी राष्ट्रवादाचें समालोचन पुढच्या प्रकरणांत केलें आहे. पण पुढील एका उताऱ्यावरून हिंदीराष्ट्रवाद अयशस्वी कां होतो या गोष्टीचें अधिक स्पष्टीकरण होईल.

सर अब्दुर रहीम[१] एकदां असें म्हणाले कीं, "अफगाणिस्तान, इराण, मध्य एशिया या देशांत अथवा चिनी मुसलमान, अरब वा तुर्की लोक यांच्यांत आमच्या हिंदी मुसलमानांपैकीं कोणीही गेला तर त्यास आपण स्वगृहीं आल्यासारखें वाटतें. तेथील रीतिभाति आम्हांस परकीय वाटत नाहींत; परंतु हिंदुस्थानांत आमच्या गावांतल्या हिन्दुवस्तींतील एकाद्या घरांत आम्हीं गेलों तर, आम्हांस सामाजिक दृष्ट्या आपण परकीय संस्कृतींत आलों आहोंत असें वाटतें."

जे स्वदेशीं स्वतःला परकीय समजतात आणि परदेशांतील जनतेला स्वकीय मानतात ते एकराष्ट्रीयत्वांत—हिंदी राष्ट्रीयत्वांत—कसे भागी होणार ?

---

१ जॉन कमिंग : पोलिटिकल इंडिया, पृ. १०४

प्रकरण ३ रें

★

इस्लामी राष्ट्रवाद

मागील प्रकरणीं हिंदी राष्ट्रवादाचें समालोचन केलें. आतां हिन्दु-राष्ट्रवादाचें परिशीलन करण्यापूर्वीं हिन्दुस्थानांत फार प्रचलित झालेल्या इस्लामी राष्ट्रवादाचा धावता आढावा घेऊं. पाकिस्तान निर्माण झाल्यानें एका अर्थीं हा राष्ट्रवाद यशस्वी झाला आहे. परंतु तो कां नि कसा यशस्वी झाला याची सविस्तर चर्चा येथें आवश्यक नाहीं. हिन्दुस्थानचें राष्ट्रीयत्व ठरवितांना हिन्दुस्थानांत विशेष प्रचलित असलेल्या राष्ट्रवादाच्या विचारधारा पहावयाच्या असल्यानें आणि इस्लामी राष्ट्रवाद ही एक महत्त्वाची विचारधारा ठरल्यानेंच तिचें समालोचन पुढें केलें आहे, हें विशेष ध्यानांत ठेवलें म्हणजे झालें.

इस्लामी राष्ट्रवादाच्या समालोचनाचा आरंभ आपणांस जगताकडे पाहण्याच्या मुसलमानी दृष्टिकोनापासून केला पाहिजे. मुसलमानी धर्माप्रमाणें जगताचे 'दार-उल्-इस्लाम' आणि 'दार-उल्-हरब' असे दोन भाग पडतात. ज्या भूभागावर मुसलमान राज्य करितात तो दार-उल्-इस्लाम; आणि जेथें त्यांचें राज्य नसून केवळ वास्तव्य असतें तो दार-उल्-हरब. जगताकडे पाहण्याचा मुसलमानी दृष्टिकोन हा असा आहे. मुसलमानांच्या दृष्टीनें हिन्दुस्थान हा दार-उल्-हरब आहे.

प्राचीन काळांत हिन्दुस्थानावर मुसलमानांनीं शेंकडों स्वाऱ्या केल्या आणि अनेक राज्येंही स्थापिलीं. हा सर्व खटाटोप केवळ संपत्ति मिळ-

विण्यासाठींच होता असें कांहीं इतिहासाच्या अभ्यासावरून दिसत नाहीं. संपत्तीची लूटफाट हा मुसलमानांच्या स्वाऱ्यांचा दिखाऊ हेतु झाला. खरा हेतु हिन्दु धर्म, हिन्दु जाति ह्यांना नामशेष करून हिन्दुस्थानचें इस्लामीकरण करणें हा होता !

सगळ्या जगताला इस्लामी करण्यास प्रवृत्त झालेल्या मुसलमानांना हिंदुस्थान हा शब्द कर्कश वाटे; आणि म्हणूनच या ना त्या मार्गानें भूपृष्ठावरून हिंदुस्थान या नांवाचें कसें उच्चाटन होईल याची चिंता त्यांना अहर्निश असे. हिंदुस्थानांतील जनता इस्लामी झाली कीं मग आपोआपच हिंदुस्थान हा शब्द स्मृतिशेष होईल ह्या भावनेनें मुसलमानांनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या सुरुं केल्या. महंमदाच्या स्वाऱ्यांविषयीं उटबी नांवाचा इतिहासकार[१] लिहितो. 'त्यानें मंदिरें नष्टविलीं. नगरें पादाक्रांत केलीं. धर्मनिष्ठ अशा लोकांस ठार केलें. मूर्तिपूजकांना नामशेष केलें आणि इस्लामची प्रतिष्ठापना केली. स्वदेशीं परतल्यावर इस्लामार्थ संपादिलेल्या विजयाचें इतिवृत्त त्यानें प्रकट करविलें. आणि हिंदुस्थानाशीं प्रतिवर्षी एक धर्मयुद्ध झुंजावयाचें अशी त्यानें 'कसम खाल्ली.'

तैमूरनें[२] आपल्या आठवणींत हिन्दुस्थानावर स्वारी करण्याचें कारण दिलें आहे. तो म्हणतो, "हिंदुस्थानावर स्वाऱ्या करण्यांत अधर्मियांशीं युद्ध करणें आणि जे इस्लामी नाहींत त्यांना महंमदाच्या आज्ञेनुसार इस्लामची दीक्षा देणें, तसेंच त्या भूमींत अधर्मियांचा नि अनेकेश्वरी मतांचा जो भ्रष्टाकार चालला होता त्यापासून त्या भूमीस पावन करणें आणि शेवटीं तेथील मंदिरें नि मूर्ती उध्वस्त करणें, हा माझा हेतु होता."

हिंदु आणि मुसलमान यांच्या परस्पर संबंधाविषयीं अल्लाउद्दीनानें आपल्या काझीस एकदां विचारल्यावरून काझीनें उत्तर केलें कीं "हिंदु जनतेस गुलामगिरींत ठेवणें हें आपलें धार्मिक कर्तव्य आहे; कारण

---

१ नि २ आंबेडकर, पृ. ५०

आपल्या प्रेषिताचे ते कट्टर शत्रु आहेत. आणि आपल्या प्रेषिताची आपणांस अशी आज्ञा आहे कीं, अशांना इस्लामची दीक्षा द्या; अथवा ते अशक्य असेल तर त्यांना ठार मारा आणि त्यांची धनदौलत लुटा नि त्यांना गुलाम करा." (आंबेडकर, पृ. ५७)

याप्रमाणें हिंदुस्थान आणि हिंदुसमाज यांविषयीं मुसलमानांचे मनांत असलेल्या विचारांचें इतिहासकालीन स्वरूप पाहिल्यावर आतां इस्लामी राष्ट्रवादाचा विचार करूं.

पंजाबीच्या एका उताऱ्यावरून इस्लामी राष्ट्रवादाची पूर्ण कल्पना येते. तो उतारा असा :—

"राष्ट्रवादाची इस्लामी कल्पना प्रचलित पाश्चिमात्य कल्पनेहून अगदीं भिन्न आहे. जीविताच्या अंतिम उद्देशाविषयीं आणि विश्वाच्या रचनेविषयीं कांहीं निश्चित कल्पना, एकाच ऐतिहासिक परंपरेविषयीं आत्मीयत्व आणि निवासस्थान कुठेंही असलें तरी, मुसलमान तेवढे सगळे इस्लामच्या प्रेषितानें निर्मिलेल्या समाजाचे घटक असल्यानें त्या सर्वांचें आपापसांत बंधुत्वाचे नातें असून ते सर्व एकाच ईश्वराचे सेवक आहेत अशी मुस्लीम बंधुत्वाची जाणीव या सर्वांवर इस्लामी राष्ट्रवादाची उभारणी झालेली आहे. राष्ट्रीयत्वाची ही कल्पना वांशिक वैशिष्ट्यांतून अथवा श्रेष्ठत्वांतून निर्माण होत नाहीं आणि तिचा उगम भौगोलिकही नाहीं. मूलतः वंश अथवा भूमि या बंधांच्या ती अतीत आहे. हा इस्लामचा बंधुभाव इस्लामी संस्कृतीनें जास्त सबल होतो...इस्लामी संस्कृति ही इस्लामच्या जीविताविषयींच्या दृष्टिकोनांतून निर्माण झालेली आहे. आणि ती एक विशिष्ट व्यक्तिमत्व असलेला मानव निर्माण करिते. असा हा मानव केवळ इस्लामी संस्कृतींतच राहूं शकतो. इस्लामचा हा छाप सर्व मुसलमानांवर आढळतो आणि त्याच्या साह्यानें त्यांना इस्लामेतर लोकांपासून सहज पृथक् करितां येतें.

रशिया, जर्मनी, इंग्लंड या देशांत निवास करीत असले तरी ज्यू हे जसे एक राष्ट्र आहेत, त्याचप्रमाणें सर्व जगभर पसरला असला तरी मुसलमान समाज हाही एकच राष्ट्र (millat) आहे. इस्लामी राष्ट्रीयत्वाला प्रादेशिक अथवा वांशिक मर्यादा नसल्यानें मुसलमान मनुष्य, मग तो कुठेंही रहात असो, वा कुठल्याही वंशाचा असो, तो वंशभक्तीपासून नि देशभक्तीपासून मुक्त असतो. त्याच्या निरनिराळ्या शासनसंस्था ह्या केवळ राज्यकारभाराच्या सोयीसाठीं आहेत. या सर्व कारणांमुळें हिंदू किंवा इतर मुसलमानेतर आणि विशेष म्हणजे अल्-ही-किताब सुद्धां नसलेले असे मुसलमानेतर यांचेसह मुसलमानांचें एखादें राष्ट्र असावें ही कल्पना मुसलमानी मनास अगदीं परकीय आहे."[१]

मुस्लिम राष्ट्रीयत्वाची यथार्थ कल्पना येण्यासाठीं हा उतारा निःसंशय उत्कृष्ट आहे. ह्यामुळें मुसलनानांच्या अहिन्दी दृष्टिकोनावर लख्ख प्रकाश पडतो. हा उतारा इतका स्वयंपूर्ण आहे कीं, तो वाचल्यावर अधिक पुराव्याची आवश्यकता उरतच नाहीं. ह्या उताऱ्याचा मथितार्थ असा कीं, मुसलमानांची राष्ट्रवादाची कल्पना पाश्चिमात्य अथवा पौर्वात्य यांपैकीं कोणतीही नसून ती निव्वळ इस्लामची आहे. तिचा भूमीशीं, संस्कृतीशीं, वा वंशाशीं जराही संबंध नाहीं. केवळ इस्लाममध्येंच तिचा उगम नी लय आहे. यामुळेंच जें जें इस्लामी नाहीं त्याच्याशीं इस्लामी राष्ट्रवादाचा स्नेह होऊंच शकत नाहीं. याचाच अर्थ मुसलमानांचा कोणत्याही परिस्थितींत हिंदी अथवा हिंदू यांपैकीं कोणत्याही राष्ट्रवादाशीं विरोध येणें अटळ आहे. आणि म्हणूनच मुसलमान हे जोंवर मुसलमान आहेत तोंवर, ते हिंदी अथवा हिंदू यांपैकीं कोणत्याही राष्ट्रवादाच्या कक्षेंत बसू शकत नाहींत. आणि यांपैकीं कोणत्याही एका राष्ट्रवादाचा त्यांनी अंगिकार करण्याचा प्रयत्न करणें याचा अर्थ इस्लाम-

१ पंजाबी : कॉन्फेडरसी ऑफ् इंडिया, पृ. ७१

त्याग हा होय. अशा प्रकारच्या इस्लाम-त्यागास मुसलमान तयार होतील कीं काय, हा प्रश्न अत्यंत चिंत्य आहे. असो.

वर उद्धृत केलेल्या पंजाबीच्या उताऱ्यावरून इस्लामी राष्ट्रवादाची संपूर्ण कल्पना येईल असें वाटतें. याच ठिकाणीं इस्लामी राष्ट्रवादाच्या अनुषंगानें एका गोष्टीचें स्पष्टीकरण करणें योग्य वाटतें. बॅ. सावरकरांच्या हिंदूमहासभेच्या कर्णावती–अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणांतील एका उताऱ्यांत, कांहींच्या मतें, द्विराष्ट्रवादाचा निर्देश आहे. त्या उताऱ्यानें मोठमोठ्या विचारवंतांच्या मनांतही विचारांचा गोंधळ उडविला. अशा विचारवतांपैकीं डॉ. आंबेडकर हे एक आहेत. डॉ. आंबेडकरांनीं आपल्या 'थॉटस् ऑन् पाकिस्तान' या ग्रंथांत पृ. १३७ वर उतारा दिला आहे; आणि त्यावर टीकाही केली आहे. ती टीका पाहिली म्हणजे मग त्या उताऱ्यानें विचारवंतांच्या मनांतही कसा गोंधळ उडविला गेला, हें समजतें. सावरकरांच्या भाषणांतील तो उतारा असा आहे.

[१] "कित्येक बालिश राजकारणी लोक हिंदुस्थान हें पूर्वींच विसंवाद-रहित बनून गेलेलें राष्ट्र आहे, किंवा तशी नुसती इच्छा करतांच तें तसें होणार आहे, असें मानण्यांत भयंकर चूक करीत असतात. हे आमचे सद्हेतुप्रेरित पण विचारहीन मित्र आपलीं स्वप्नें सत्यच समजून चालत असतात. ह्याच कारणानें जातीय गुंताड्यानें तें गोंधळून जातात आणि त्या गुंताड्याचें कारण जातीय संघटनांच्या माथीं मारतात. परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं, जातीय म्हणून म्हटले जाणारे प्रश्न हा हिंदू आणि मुसलमान यांच्यामधील सांस्कृतिक, धार्मिक नि राष्ट्रीय विरोधाचा शतकानुशतकें चालत आलेला केवळ वारसा आहे. योग्य काल येतांच तुम्ही ते प्रश्न सोडवूं शकाल; पण त्यांचें अस्तित्वच मुळांत नाकारून तुम्ही ते दडपून टाकूं शकणार नाहीं. कोणत्याही खोलवर मुरलेल्या रोगा-

१ शिखरे : बॅरिस्टर सावरकरांचीं भाषणें, पृ. २८–२९

कडे दुर्लक्ष करण्यापेक्षां त्याचें निदान करून, अवश्य ती परिचर्या करणेंच अधिक सुरक्षितपणाचें असतें. असेल त्या अप्रिय अशाही वस्तुस्थितीला आपण छातीठोकपणें तोंड देऊं या.

हिंदुस्थान हें एकता पावलेलें व विसंवादरहित राष्ट्र आहे असें आज तरी मानतां येत नाहीं. तर उलट हिंदुस्थानांत हिंदू आणि मुसलमान अशीं मुख्यत: दोन राष्ट्रें विद्यमान आहेत."

ह्या उताऱ्यानें विचारवंतांच्या मनांत नुसता गोंधळ उडविला इतकेंच नव्हे तर, कांहींची तर असें म्हणण्यापर्यंत धांव गेली कीं, द्विराष्ट्रवादाची कल्पना मुसलमानांना सावरकरांपासूनच मिळाली. ह्या विधानाचा चालू विषयाशीं संबंध नसला तरीही, सावरकरांच्या विचारांच्या स्पष्टीकरणानें अनायासें मुसलमानी राष्ट्रवाद समजण्यासही अधिक साह्य होत असल्यानें ह्या चर्चेचा उल्लेख केला आहे. असो. आतां त्या उताऱ्यांत सावरकरांनीं द्विराष्ट्र सांगितलें आहे कीं काय तें पाहिलें पाहिजे. पाश्चिमात्यांच्या राष्ट्रीयत्वाच्या व्याख्येप्रमाणें एक वंश, एक संस्कृति, एक भाषा इत्यादि घटकांवर मुसलमानी राष्ट्र आधारलेलें आहे असें सावरकरांचें विधान मुळींच नाहीं. सावरकरांचीं विधानें आहेत दोन. पहिलें असें कीं, ज्याप्रमाणें काँग्रेसनेते समजतात त्याप्रमाणें हिंदुस्थानांत हिंदु नी मुसलमान ह्या ज्या भिन्न जमाती आहेत त्यांनीं एकरसी हिंदी समाजाच्या निर्मितीसाठीं आपल्या भिन्न संस्कृतींच्या व्यक्तिमत्वाचा त्याग केलेला नाहीं. किंबहुना हिंदी अथवा हिंदु यांपैकीं कुठल्याही राष्ट्रीयत्वास विघातक ठरेल अशी परकेपणाची जाणीव मुसलमानी समाजांत अजूनही आहे. तसेंच हिंदू नी मुसलमान ह्या समाजांमधील परकीय भाव, नी कांहीं अंशीं परस्परांविषयींचा द्वेष कांहीं चुकून अथवा सहज निर्माण झालेला नाहीं. उलट तो शेंकडों वर्षांच्या युध्यमानतेचा वारसा आहे. ही द्वेषाची नी परकेपणाची जाणीव सोडून देण्याचा समंजस प्रयत्न मुसलमान करीत नसल्यानें, ज्यामध्यें एकजिनसी नी

एकसंधी समाजाची कल्पना असून जेथें अल्पसंख्यांकांच्या भूमिकेस स्थान नाहीं असें हिंदी-राष्ट्र हिंदुस्थानामध्यें निर्माण झालेलें नाहीं. परंतु त्याऐवजीं हिंदु नी मुसलमान हे दोन्ही समाज आपापल्या पृथक् राष्ट्रवादाची उपासना अजूनही करीत आहेत; असें सावरकरांचें दुसरें विधान आहे. ह्या दोन्ही समाजांची राष्ट्रीयत्वाची कल्पना भिन्न आहे. मुसलमानांचें राष्ट्रीयत्व काय आहे याची कल्पना पंजाबीच्या वर दिलेल्या उताऱ्यावरून येतेच. जगभर कुठेंही असलेले मुसलमान राष्ट्र आहेत असें मुस्लिम राष्ट्रवाद मानतो आणि त्यामुळें हिंदुस्थानांत मुसलमान अल्पसंख्य असले तरी मिलतच्या कल्पनेनुसार ते राष्ट्र आहेत, इतकेंच सावरकरांचें निगमन आहे.

हिंदू-मुसलमानांतील भेद ब्रिटिश राजनीतीनें निर्माण केलेला आहे, हें विधान आपणांस चिरपरिचित आहे. ह्या विधानांत थोडासा सत्यांश आहेही. परंतु हिंदुमुसलमानांत मुळांत विरोध नव्हताच, नि आज जो विरोध दिसतो तो केवळ ब्रिटिश राजनीतीनेंच निर्माण केलेला आहे, असें कोणी म्हटल्यास तें सर्वांशीं स्वीकारतां येत नाहीं. कारण आपणांस हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, सर्वसामान्य मुसलमान हा 'मिलत' च्या विचारांतून मुक्त होत नाहीं. त्यामुळें ज्या भूमीवर तो राहात असतो त्या ठिकाणीं राहाणाऱ्या मुसलमानेतर समाजांपासून आपलें व्यक्तिमत्व पृथक् ठेवण्याचा तो सहजच नी नित्य प्रयत्न करितो. त्याच्या मनांतील मिलतची जाणीव त्यास भूमिनिष्ठेपासून दूर ठेवते. ह्या विधानाच्या पुष्टयर्थ पुढील उदाहरणें मननीय वाटतील. त्यांतील पहिलीं दोन हीं ज्या ठिकाणीं ब्रिटिश राजनीतिचा कावा हिंदुस्थानातल्याइतका बद्धमूल झाला नव्हता अशा हिंदुस्थानेतर देशांचीं आहेत.

डॉ. स्मिथने[1] आपल्या ग्रंथांत वॅलेस नांवाच्या लेखकाचा उतारा

१ डॉ. ओके स्मिथ : रेस अँड् नॅशनॅलिटि, पृ. ७७–७८

दिला आहे. तो लेखक म्हणतो, "रशियामध्यें टार्टर्स हे कधींही स्थायी झाले नाहीत, नि तेथील जनतेमध्यें मिसळूनहि गेले नाहींत. जोपर्यंत त्यांच्यावर अर्धवट बौद्धधर्माचा अथवा मूर्तिपूजेचा पगडा होता तोंपर्यंत, त्यांच्यांतील कांहीं सरदार–वर्गाचें ख्रिश्चनीकरण शक्य झालें. आणि त्याप्रमाणें रशियन सरदारांनीं त्यांना आपल्यांत मिळवूनही घेतलें. परंतु सामान्य जनतेनें ज्याक्षणीं इस्लाम स्वीकारला त्या क्षणापासून त्यांना रशियन करून घेण्याची चळवळ मागें पडली."

"चिनी मुसलमान हा चिनी मुसलमानेतरांसारखाच वेश करतो. दोन्हीही समाजांची भोजनपद्धति एकच आहे. दोघेही एकच भाषा बोलतात. परंतु पितृभूमि म्हणून अजून तुर्कस्तानाकडेच चिनी मुसलमानांची दृष्टि वळते आणि पॅन हॅनिझमच्या ऐवजीं पॅन इस्लाम हेंच त्यांचें ध्येय असतें" असे उद्गार एडगर स्नो[1] ह्यानें चिनी मुसलमानांविषयीं काढले आहेत.

पुढील दोन उदाहरणें हिंदुस्थानालगतच्या देशांतील असून निश्चित बोधक असल्यानें येथें दिलीं आहेत.

(१) "उत्तर किनाऱ्यावरील आराकानी[2] मुसलमानांची 'मुजाहिद' नांवाची संस्था असून मुसलमानांचा एक स्वतंत्रच प्रांत करावा अशी चळवळ ती करीत आहे. अक्याबमध्यें मुसलमान तीन लक्ष असून बुद्धसंप्रदायी एक लक्ष आहेत. लोकसंख्येच्या प्रमाणांत विभाग करावयाचे म्हटल्यास तेथील मुसलमानांना भाग मोटा मिळतो. अक्याबमधील मुस्लिम-विभाग पूर्व पाकिस्तानाशीं जोडला जावा यासाठीं १९४५ मध्यें तेथें मोठी चळवळ झाली होती."

---

१ एडगर स्नो : रेड स्टार ओव्हर चायना, पृ. २१७

२ संडे न्यूज् ऑफ इंडिया : १३-११-४९

(२) नेपाळांत[१] छत्तीस ठिकाणीं मुसलमान बहुसंख्य आहेत. त्या गांवांनीं, तेथील काँग्रेसच्या हाताला हात लावून, राजसत्ता उलथवून टाकण्याची उत्सुकता प्रकट केली आहे. राजसत्ता नष्ट झाल्यावर मुसलमानांना नेपाळमध्यें एक स्वतंत्र भाग तोडून हवा आहे."

वस्तुतः एकाच भूभागांत जन्म झाला असल्यानें, त्या भागांतील इतरांप्रमाणें मुसलमानही तेथेंच लहानाचा मोटा होऊन पैगंबरवासीही तेथेंच होणार असतो. तथापि त्याच भूमीवरील दुसऱ्या समाजांपासून आपला पृथक् निवास टेवण्याची, नी धर्म भिन्न या सबबीवर त्यांच्याशीं फटकून वागून विरोधी भूमिका स्वीकारण्याची वृत्ति मुसलमानांमध्यें कां निर्माण होते, याचें विवेचन वर इस्लामी राष्ट्रवादामध्यें झालेंच आहे. परंतु हॅन्स कोहेननें[२] दिलेला आगाखानांच्या भाषणांतील उतारा वाचला म्हणजे मुसलमानांत पृथक् मनोवृत्ति निर्माण करणाऱ्या इस्लामी विचारांचें स्वरूप स्वच्छ दिसतें. तो उतारा असा : —

"हिंदुस्थानांतील मुसलमानांना इंग्रजांनीं दिलेल्या शिक्षणामुळें त्यांच्यांत राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा प्रादुर्भाव झाला आहे. तरीहि त्यांच्या मनोविकारांना हिमालयाचीं उत्तुंग शिखरें किंवा भारतीय सागर मर्यादा घालूं शकत नाहींत. त्यांच्यांत नी इतर देशांतील मुसलमानांत नैसर्गिक ऐक्य असतें. वंश अथवा देश यांच्या मर्यादा ह्या ऐक्याच्या आड येऊं शकत नाहींत कारण हें ऐक्य केवळ सांप्रदायिक श्रद्धेवर अवलंबून नाहीं. कुराणच नव्हे तर अरबी इतिहास आणि तत्त्वज्ञान, पर्शियाचें अतुलनीय काव्य, तसेंच इजिप्त, स्पेन नी मोरोक्को ह्या देशांतील काल्पनिक गोष्टी नी दंतकथा ह्या सर्वांच्या वैभवशाली परंपरेचे ते वारसदार आहेत. ह्या अक्षय झऱ्याचें जीवन मुसलमान प्राशन करीत असल्यानें, मुसलमान

१ केसरी : २-५-५० 'मूळ स्वभाव कसा जाणार ?'

२ प्रो. हॅन्स कोहेन : नॅशनॅलिझम् इन फार ईस्ट, पृ. ४७

हे तुर्की, परशियन, अरबी वा हिंदुस्थानी कोणीही असोत, आणि त्यांच्यावर पाश्चिमात्य शिक्षणाचा संस्कार झालेला असो वा नसो, विचार, भावना नी भाषा यांच्या समान बंधांनीं ते निगडित झालेले असतात. अशा प्रकारें निर्माण झालेला बंधुभाव धार्मिक श्रद्धेंतच गुरफटलेला नसतो. उलट मुसलमानांतील संशयवादी नि निरीश्वरवादी यांसही तुर्कस्तान अथवा पर्शिया यांवर कोसळलेल्या आपत्तींचा धक्का एखाद्या सनातनी मुल्लाला बसावा इतका मोठा बसतो."

अशी आहे ही इस्लामी मनोवृत्ति! आणि यामुळेंच हिंदी राष्ट्रीयत्वास ती विघातक ठरते. देशभक्ति नि वंशभक्ति यांपासून ती मुक्त असल्यामुळें, ज्याक्षणीं एका देशांतील जनतेचा अन्य देशीय मुसलमानांशीं विरोध येतो त्यावेळीं, पहिल्या देशांतील मुसलमान हे स्वदेशांतील मुसलमानेतरांऐवजीं परदेशस्थ मुसलमानांचीच कड घेतात हें अत्यंत आपत्कालीं सिद्ध झालेलें आहे. उदाहरणार्थ:

[1]सिंधच्या दाहीर राजाच्या हाताखालीं ५०० अरबांची एक टोळी होती. तिचा नायक 'अलाफी' नामक अरब होता. दाहिरानें त्याला महंमद कासिमाविरुद्ध लढण्याची आज्ञा केली असतां त्यानें उलट उत्तर दिलें कीं, "आम्हीं मुसलमान असल्यामुळें इस्लामच्या सैन्याविरुद्ध लढण्यासाठीं आमची तरवार म्यानांतुन बाहेर निघणार नाहीं." तसेंच तालिकोटच्या लढाईंत विजयनगरच्या रामरायाच्या सैन्यांत मुसलमानी पथकें होतीं. त्यांनीं तर आयत्या वेळीं शत्रूस मिळून ज्याचें अन्न खाल्लें होतें त्याला सपशेल तोंडघशीं पाडलें.

[2]पानिपतच्या युद्धाच्या वेळींही सर्व हिंदी मुसलमानांचें साह्य उत्कृष्ट रीतीनें मिळाल्यामुळेंच अब्दालीस जोर आला होता!

---

१ द. के. केळकर : संस्कृति संगम, पृ. ३१२

२ सरदेसाई : मराठी रियासत, भाग ३, पृ. १२१

आतां हिंदुस्थानांतील मुसलमान—मग तो कोणत्याहि पक्षाचा असो—तो राष्ट्रीय वृत्तीचा कसा नसतो आणि त्याची दृष्टि केवळ स्व-समाजाचेंच हित पाहण्याकडे कशी असते हें दर्शविणारें पुढील उतारे मननीय आहेत. (१) [१] "...चर्चेत ज्या दोन मुद्यांवर एकमत झालें ते असे होतेः हिंदुस्थानांतील मुसलमानांना मध्यवर्ती विधिमंडळांत ३२ टके प्रतिनिधित्व मिळावें आणि सिंध हा मुंबईपासून निराळा काढून त्याचा नवीन गव्हर्नराचा प्रांत करावा. या प्रांतांतील हिंदूंना, तेथें ते अल्पसंख्य म्हणून संरक्षण मिळावें. मात्र मध्यवर्ती सरकारकडून या प्रांतास आर्थिक साह्य दिलें जाऊं नये...दुर्दैवानें ही गोष्ट (आधींच) बाहेर फुटली आणि इकडे कलकत्त्यांत ऐक्य-परिषदेचें हें अधिवेशन चालू असतांनाच तिकडे लंडनमध्यें सॅम्युअल होअर यांनीं अशी प्रकटपणें घोषणा केली कीं, 'मुसलमानांना विधिमंडळांत ३३⅓ टके प्रतिनिधित्व देण्याचें, आणि सिंध प्रांत स्वतंत्र करून त्यास मध्यसरकारकडून आर्थिक साह्य देण्याचें बादशहाच्या सरकारनें ठरविलें आहे. मात्र ह्या सिंध प्रांतीय हिंदूंना संरक्षण मिळणार नाहीं." अर्थात् याचा परिणाम असा झाला कीं, कलकत्त्यांतील ती सभा एकाएकीं संपली, कारण त्यांतील एका (मुसलमान) जमातीस असल्या ऐक्य-परिषदेपासून आतां कांहींच लभ्यांश उरला नव्हता!" सबंध हिंदुस्थानच्या राष्ट्रीय प्रगतीपेक्षां केवळ स्वसमाजाचें हित मुसलमानांना अधिक महत्त्वाचें कसें वाटतें तें वरील उताऱ्यावरून दिसतें.

(२) गांधी-वध-अभियोगांत श्री. मुरारजी देसाई यांच्या उलट तपासणींत पुढील प्रश्नोत्तरें झालीं:

नयज्ञ (वकील) ओक—'श्री. देसाई, आपण 'राष्ट्रीय मुसलमान' याची व्याख्या कराल कां?'

---

१ सी. वाय्. चिंतामणी: इंडियन् पॉलिटिक्स् सिन्स दि म्यूटिनि, पृ. १२४

न्यायाधीश—हा प्रश्न अप्रस्तुत आहे.

ओक—ठीक. तो प्रश्न मी निराळ्या स्वरूपांत विचारितों. देसाई महाशय, लीगेतर मुसलमान 'राष्ट्रीय' आहेत कां?

श्री. देसाई—नाहींत.

यावरून लीगवाले काय किंवा लीगबाहेरील काय, सर्वच मुसलमान अराष्ट्रीय कसे आहेत हें दिसतें. आमच्या ह्या विधानास श्री. वल्लभभाई पटेल यांच्या पुढील उद्गारांनी बळकटी येते.

(३) एकदां एका व्याख्यानांत सरदार पटेल[1] म्हणाले—"नऊ महिन्यांच्या मध्यवर्ती मंत्रिपदाच्या अनुभवानें आमचा भ्रमनिरास झाला. मला असें आढळून आलें कीं, वरिष्ठांत वरिष्ठ मुस्लिम अधिकाऱ्यापासून तों कनिष्ठांत कनिष्ठ द्वारपालापर्यंत, कांहीं थोडे अपवाद सोडून, सर्व मुसलमान लीगवाले आहेत."

वरील उदाहरणांवरून हें ध्यानांत येईल कीं, मुसलमान हा नेहमीं मुसलमानच राहतो, कारण त्याच्या मनावर असलेली 'मिलत'ची पकड कधींच दूर होत नाहीं. सतत प्रचारामुळें मुसलमानी मनावरील इस्लामी राष्ट्रवादाची पकड उलट अधिक घट्ट झाली; आणि त्यांतही तिला राजकीय परिस्थितीचें साह्य मिळाल्यामुळें हिंदुस्थानचे खंड पडून पाकिस्तान निर्माण झालें! असो.

मुसलमानांच्या पाकिस्तान-मागणीचीं जीं कारणें डॉ. आंबेडकर यांनीं नि इतरांनीं दिलीं आहेत त्यांपैकीं दोन कारणें अशीं:—मुसलमानांचा अनुभव असा आहे कीं, हिंदू लोक हे आपल्या संख्याधिक्याच्या जोरावर मुसलमानांना एकाद्या परकीय देशांतील नागरिकांप्रमाणें वागवितात; आणि त्यांच्यावर बलात्कार करितात.

---

१ केसरी : ८ जुलै ४७ 'चूक खरी उमगली काय ?'

आतां हिंदूंची मुसलमानांकडे पाहण्याची दृष्टि ते म्हणतात तशी खरोखरच असती, नी त्यांच्यावर खरोखरच हिंदूंकडून बलात्कार होत असता तर पाकिस्तानची मागणी करण्यासाठीं मुसलमान असा एकही उरला नसता ! किंबहुना हिंदुस्थानांतील मुसलमानांची वर्षानुवर्षे वाढत्या प्रमाणावर असलेली लोकसख्या ही त्यांच्या वरील विधानांचें वैयर्थ्य सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

मुसलमानांना हिंदूंनी परक्यासारखें वागविलें हा आपला आरोप जिना कधींही सिद्ध करूं शकले नाहींत. याविषयीं रेजिनॉल्ड कूपलंड[1] म्हणतात :—

"निःपक्षपाती संशोधकास अभ्यासान्तीं असें आढळेल कीं, जे आरोप कॉंग्रेसवर करण्यांत आलेले होते ते सर्व फुगविलेले असून ते मुळींच महत्त्वाचे नव्हते. जीं कांहीं गाऱ्हाणीं होतीं त्यांच्या मुळाशीं कॉंग्रेसमधील कांहीं अविचारी लोकांचा मूर्खपणा होता. कॉंग्रेस बुद्धिपुरस्सर मुस्लिमविरोधी कार्य करीत होती हें म्हणणें कधींहि सिद्ध झालेलें नाहीं." कॉंग्रेस मुस्लिविरोधी कार्य करीत नव्हती इतकेंच नव्हे तर, हिंदी राष्ट्रवादाची आपली भूमिका यशस्वी करण्यासाठीं तिनें मुसलमानांना वळविण्याचाच अव्याहत प्रयत्न केला. पण स्वतः जिनांनीच[2] म्हटल्याप्रमाणें "एखाद्या देशांतील मुसलमान स्वदेशांत राहणाऱ्या मुसलमानेतरांपेक्षां किती तरी पटीनें अधिक सहानुभूति परदेशांत राहणाऱ्या मुसलमानांविषयीं बाळगत" असल्यानें हिंदुस्थानांत निवसणाऱ्या सर्वांच्या एकजिनसीपणावर आधारलेला हिंदी राष्ट्रवाद यशस्वी होईल कसा ? असो.

---

१ कॉन्स्टिटयूशनल् प्रपोझल्स् ऑफ् दि सप्रू कमिटी; पृ. १५७

२ इंडियाज् प्रॉब्लेमः पृ. ५१-५२ (अखंड भारतच कां ?, पृ. १३७)

गेल्या पाऊणशें वर्षांच्या काळांत हिंदुस्थानांत राष्ट्रवादाच्या ज्या प्रमुख विचारधारा वहात होत्या त्यांचा विचार करणें हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाविषयीं पहिल्या प्रकरणांत मांडलेला सिद्धांत पटण्यास आवश्यक होतें. इस्लामी राष्ट्रवादाचें समालोचन त्यासाठींच केलें. इस्लामी राष्ट्रवाद हा निखिल हिंदुस्थानचा राष्ट्रवाद होऊं शकत नसल्यानें तो समजण्यास आवश्यक तेवढीच माहिती वर दिली आहे. आतां हिंदुस्थानांत प्रचलित असलेल्या राष्ट्रवादाच्या तिसऱ्या प्रमुख विचारधारेचें म्हणजे ' हिंदूराष्ट्रवादाचें ' समालोचन पुढील प्रकरणांत करूं.

प्रकरण ४ थें

☆

हिंदु राष्ट्रवाद

[विभाग १]

हिंदीराष्ट्रवाद आणि इस्लामीराष्ट्रवाद ह्या दोन विचारधारांचें समालोचन मागील दोन प्रकरणीं केलें. आतां ह्या प्रकरणांत हिंदूराष्ट्रवादाचें विवेचन करावयाचें आहे. पहिल्या प्रकरणाच्या अंतीं काढलेल्या हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व या सिद्धांताचें स्वरूप नीट समजणें हें पूर्वीच्या दोन प्रकरणांपेक्षां, ह्या प्रकरणांतील विवेचनावर अधिक अवलंबून असल्यानें हें प्रकरण विशेष महत्त्वाचें आहे. या प्रकरणांत पुढील गोष्टींचें सत्यशोधन केलें आहे.

(१) हिंदुसमाजांतील एकत्वाची अविच्छिन्न जाणीव दाखविणारा ऐतिहासिक पुरावा.

(२) हें एकत्व निर्माण करणारीं कारणें.

(३) हिंदुराष्ट्रवादावरील आक्षेप आणि त्यांचें निराकरण.

(४) निधर्मी शासनाच्या तत्त्वज्ञानाच्या निर्मितीचा इतिहास.

(५) हिंदुत्वाची व्याप्ति.

वरील गोष्टींच्या सत्यशोधनानें हिंदुत्वावर घेण्यांत येणारे सर्व आक्षेप कसे फोल आहेत हें समजू शकेल. ह्या राष्ट्रवादावर स्वातंत्र्यवीर सावरकर यांचें 'हिंदुत्व', श्री. बाबाराव सावरकर यांचें 'राष्ट्र-मीमांसा' आणि श्री. माधवराव गोळवलकर यांचें 'आम्हीं कोण' असे एकंदर तीन ग्रंथ

उपलब्ध आहेत. त्या सर्वांत प्रामुख्यानें हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचें विवेचन केलेलें आहे. एकाच विषयाची मीमांसा त्यांपैकीं प्रत्येकानें आपापल्या दृष्टिकोनाप्रमाणें अत्यंत सरस केली आहे. हिंदुत्वाचा आमूलाग्र अभ्यास करूं इच्छिणाऱ्या प्रत्येकानें ह्या तिन्ही ग्रंथांचें परिशीलन करणें आवश्यक आहे. असो.

हिमालय ते कन्याकुमारी आणि द्वारका ते जगन्नाथपुरी ह्या चतुः-सीमेमध्यें निवसिणाऱ्यांपैकीं हिंदु या नांवानें ओळखला जाणारा समाज ह्या भूमीवर राष्ट्र आहे असें प्रतिपादन करणारें जें तत्त्वज्ञान आहे, तोच हिंदुराष्ट्रवाद होय.

ह्या राष्ट्रवादाच्या परामर्षास आरंभ करण्यापूर्वी एका मोठ्या अप-समजाचें निराकरण होणें आवश्यक आहे. हिंदुत्वावर घेण्यांत येणारा जातीयत्वाचा, अराष्ट्रीयतेचा आणि धर्मांधतेचा आक्षेप हे सर्व ह्या अपसमजाच्या पोटींच उद्भवलेले आहेत. हे आक्षेप घेण्यापूर्वी ह्या बाबतींत हिंदुत्वाच्या पुरस्कर्त्यांचें काय म्हणणें आहे हें विरोधकांनीं शांतपणें पहावें. विरोधकांकडून झालेल्या सतत प्रचारानें हिंदुत्व आणि हिंदुधर्म हे शब्द समानार्थक आहेत अशी सामान्य माणसाची समजूत झालेली असते. नि त्यामुळेंच तो 'हिंदुराष्ट्र' या शब्द-प्रयोगानें दचकतो. परंतु हिंदुत्व आणि हिंदुधर्म हे समानार्थी शब्द नसून ते संपूर्णपणें भिन्नार्थवाचक आहेत. हिंदुत्व आणि हिंदुधर्म हे पर्यायशब्द नाहींत हें सावरकरांनी आपल्या हिंदुत्व या प्रबंधाच्या उपोद्घातांत सुस्पष्टविलें आहे. सावरकर[1] म्हणतात :—

"हिंदुत्व हा कांहीं साधा शब्द नव्हे, ती एक परंपरा आहे, तो एक इतिहास आहे, आणि तोही, कित्येक वेळीं, 'हिंदुत्व' या शब्दाचा हिंदुधर्म

१ हिंदुत्व-पटवर्धनकृत मराठी भाषांतर पृ. ५

ह्या त्याच्यासारख्याच भासणाऱ्या नांवाशीं घोंटाळा करून समजण्यांत येणारा केवळ धार्मिक आणि आध्यात्मिक इतिहासच नव्हे, तर सर्वसंग्रही इतिहास आहे! 'हिंदुधर्म' हा शब्द हिंदुत्वांतूनच निघालेला असा हिंदुत्वाचा अंश आहे; केवळ त्याचाच एक भाग आहे. म्हणून हिंदुत्व ह्या शब्दाची स्पष्ट कल्पना जर आली नाहीं तर, हिंदुधर्म हाही शब्द तसाच दुर्बोध आणि अनिश्चित राहील. या दोन शब्दांतील परस्पर वेगळेपणा न समजल्यामुळेंच हिंदुसंस्कृतीचा अमूल्य वारसा ज्यांना लाभला आहे अशा कांहीं सहोदर जातिजातींमध्यें अनेक अपसमज आणि परस्पर साशंकता निर्माण झाली आहे. येथें इतकेंच सांगितलें म्हणजे पुरें कीं, 'हिंदुधर्म या शब्दानें जें कांहीं मोघमपणें दाखविलें जातें तें आणि हिंदुत्व एक नव्हे. कोणत्या तरी आध्यात्मिक किंवा भक्तिमार्गी सांप्रदायाच्या मताला उण्याअधिक प्रमाणांत अनुसरून रचलेली उपपत्ति किंवा आचार-विचारविषयक नीतिनियमांचें शास्त्र एवढाच अर्थ, साधारणपणें, 'धर्म' या शब्दानें दर्शविला जातो. हिंदुत्व या एकाच शब्दामध्यें एकराट् हिंदु-जातीच्या अस्तित्वाच्या विचारांची आणि पराक्रमांची सर्व दालनें समाविष्ट होतात."

हिंदुत्व आणि हिंदुधर्म या दोन संज्ञांसंबंधीं श्री. सावरकरांनीं केलेलें वरील स्पष्टीकरण, त्या दोहोंच्या अर्थांतील भेद कोणाही सुबुद्ध माणसाच्या ध्यानांत आणेल, असेंच आहे. परंतु धर्म, संप्रदाय, तसेंच हिंदुधर्म, वैदिक संप्रदाय ह्यांविषयीं अधिक माहिती हवी असल्यास जिज्ञासूंनीं ज्ञानकोशकार केतकर यांचा 'हिंदु रिलिजन, इटस् फॉर्मेशन् अँड फ्यूचर' हा ग्रंथ अवलोकावा. प्रस्तुत विषयाशीं वरील गोष्टींचा संबंध नसल्यानें त्यांची चर्चा येथें वगळलेली आहे. असो.

हिंदुसमाजांतील एकत्व-निदर्शक कारणपरंपरा साकल्यानें व्यक्तविणारा एकच शब्द म्हणजे 'हिंदुत्व'! आतां 'हिंदुत्व हेंच हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व'

हा सिद्धांत कसा अचूक आहे तें पाहूं. पण तत्पूर्वी पहिल्या प्रकरणांत हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ठरविणाऱ्या लक्षणांविषयीं जें निगमन काढलें होतें त्याकडे पुन्हां एकदां दृष्टिक्षेप करणें प्रस्तुत विषयाच्या अनुसंधानाच्या दृष्टीनें इष्ट आहे.

'सर्व राष्ट्रांना निरपवादपणें लागू पडेल अशी 'राष्ट्र' या संज्ञेची व्याख्या करणें दुर्घट आहे. तथापि इतकें मात्र म्हणतां येईल कीं, प्रदीर्घ काळापासून एकाद्या समाजांतील घटकांत एकत्वाची भावना नांदत आली असेल तर, त्या समाजास स्वतःला 'राष्ट्र' म्हणवून घेण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

ह्या लक्षणानुसार हिंदुस्थानांत हिंदु हे राष्ट्र आहेत हा अभियोग मान्य होण्यासाठीं आपणांस हिंदूलोकांत प्रदीर्घ काळापासून हिंदु म्हणून एकत्वाची भावना नांदत होती काय हें पाहिलें पाहिजे.

(१) हिंदुसमाजांतील एकत्वाची अविच्छिन्न जाणीव दाखविणारा ऐतिहासिक पुरावा.

हिंदूंचें मूळ निवासस्थान कोणतें होतें, ते हिंदुस्थानांत कोणत्या काळीं स्थायिक झाले, कां हिंदुस्थान हीच त्यांची मूलभूमि होती, हे सर्व प्रश्न विवाद्य असून या ठिकाणीं त्यांच्या विवेचनास हात घालणें अप्रस्तुत होईल. हिंदूंचें मूल निवासस्थान उत्तरध्रुवासारखें हिंदुस्थानाबाहेरील असो, किंवा तें हिंदुस्थानच असो, त्यांच्या संस्कृतीचा पगडा बृहत् हिंदुस्थानावर फार प्राचीन काळापासून पडला होता याविषयीं शंका नाहीं. नृपेंद्रकुमार दत्त म्हणतात, "खिस्तपूर्व चौथ्या शतकाच्या उत्तरार्धांत, म्हणजे अलेक्झांडरचे स्वारीच्या वेळीं आर्यांचा प्रभाव लंका, तसेंच हिंदुस्थानची अंतिम दक्षिण यांसह अखिल हिंदुस्थानावर पडला होता." यावरून आपण असें अनुमान करूं शकतों कीं, सुमारें तेवीसशें

वर्षें हिंदुस्थानावर आर्यसंस्कृतीचा पगडा आहे. आतां या कालखंडांत, म्हणजे ख्रिस्तपूर्व ४०० वर्षांपासून आजमितीपर्यंत भारतांत एकत्वाची भावना वसत आली आहे काय तें पहावयाचें आहे.

हिंदुस्थानांतील त्यावेळचा समाज बाहेरील जगतास हिंदु याच नांवानें परिचित होता, ही गोष्ट संशयातीत पुराव्यानें सावरकरांनीं आपल्या 'हिंदुत्वाची व्याख्या' ह्या लेखांत सिद्ध केली आहे. तो पुरावा दोन अरबी कवींच्या कांहीं काव्यपंक्तींचा आहे. ह्या कवींचा काळ दोन हजार वर्षांपूर्वींचा आहे. ह्या काव्यपंक्ति जेव्हां रचल्या गेल्या तेव्हां मुसलमानी धर्माचा ठावठिकाणाही नव्हता ही विशेष लक्ष्यांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे.

लबी बीने आखतफ बीने तुर्कीच्या ओळी अशा :—

॥ अया मुबारकल अर्जे यो शैयेनोहा मिनल हिंदे ॥
॥ वा अरा दक्कला हो मईयो नज्जेला जिक्रतुन ॥ १
॥ व हल्ल तज्जली यतुन ऐनक सहवि अरब अतुन जिक्रा ॥
॥ व हाजे हियोन लज्जेलुर रसूला मिनजा अनल 'हिन्दजुन ॥

आरबांच्या मुसलमानपूर्व धर्माचा अभिमानी असा दुसरा आरब कवि, उमर बीने हाशीम अबुल हकम, महादेवाच्या स्तुतिपर कवितेंत लिहितो :—

॥ व अह लोलहा अजरु अरमीमन 'महादेउ' व मनाजेला इल मुददीने मिनहुम व सेयतरु ॥१॥ म अस्सेर अखलका न असानन कल्ल हुम यन हुवा नजू मुन अजाअत सुम्मा गाबुल 'हिन्दु' ॥२॥ व सहबी कया माफिल मका मिल 'हिन्दे' यौमना यकूलूना लात हज्ज न फइन्न-कतो वजरु ॥३॥

हिमालयापासून समुद्रापर्यंत पसरलेल्या भूभागाचें नांव हें त्यांतील

समाजाच्या नांवावरून काय नि कसें पडलें हें दर्शविणारा श्लोक विष्णु-पुराणांत आहे तो असा :—

" उत्तरं यत्समुद्रस्य हिमाद्रेश्चैव दक्षिणम् ।
वर्षं तद् ' भारतं ' नाम भारती यत्र संततिः ॥

ह्या श्लोकाची रचना इतकी सुंदर आहे कीं, आजही आपल्या राष्ट्रीयत्वाचें वर्णन करण्यास तो स्वयंपूर्ण आहे.

प्राचीन काळीं शक, हूण, यूची, बर्बर, ग्रीक इत्यादि अनेक परकीय जमातींनीं हिंदुस्थानावर स्वाऱ्या करून साम्राज्येंही स्थापन केलीं होतीं. प्रत्येक जमातीची आपापली संस्कृति होतीच. परंतु हिंदुस्थानांत एकदां स्थायी झाल्यावर त्यांनीं येथील वैदिक वा बौद्ध धर्मांचा स्वीकार केला. ह्याचें एक उदाहरण कनिष्काचें[1] आहे. तो यूची जातीचा, असून त्यानें बौद्ध धर्मांचा स्वीकार केला होता. अशाप्रकारें बाहेरून येणाऱ्या ह्या परकीयांनीं हिंदु संस्कृति स्वीकारल्यामुळें भारतीय समाजांत विघटना अशी निर्माण झाली नाहीं. परंतु मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून मात्र भारतांतील समाजरचनेची घडी विसकटली ! आणि त्या वेळेपासून धर्मानें, परंपरेनें, भाषेनें नि संस्कृतीनें विभिन्न असलेले दोन समाज ह्या देशांत अस्तित्वांत आले. ह्या परकीय समाजाची इच्छा नी ईर्षा उभा हिंदुस्थानच मुसलमानमय करण्याची कशी होती, तें आपण इस्लामी राष्ट्रवादामध्यें पाहिलेंच आहे. मुसलमानी स्वाऱ्यांपूर्वी भारतीय समाजांत एकत्वाची जाणीव अव्यक्त होतीच. भेद इतकाच कीं, मुसलमानांच्या हिंदुस्थान यवनमय करण्याच्या ईर्षेच्या प्रतिक्रियेमुळें ती आतां व्यक्त होऊं लागली.

हिंदी भाषेचा आद्य कवि चंदबरदाई[2] हा हिंदू, हिन्दवान्, हिंद हे शब्द आपल्या काव्यांत इतक्या वेळां नि इतक्या सहजतेनें वापरतो

१ रोमेशचंद्र दत्तः सिव्हिलायझेशन् इन् एन्शन्ट इंडिया, पृ. ३७३
२ हिंदुत्वः पृ. ५१

कीं, त्यावरून हे शब्द **अकराव्या शतकाच्या सुमारासच सर्वसामान्य व्यवहारांत रूढ झाले होते**, असें समजण्यांत कांहींच चूक नाहीं. शहाबुद्दीनाला हिंदूंनीं अटक केल्यावर, हिंदूंकडे पुनः डोळा वर उचलून बघणार नाहीं या अटीवर पृथ्वीराजानें त्यास कसें सोडून दिलें तें वर्णितांना चंद भाट म्हणतो—

किय सलाम तिनबार जाहु अपन्ने सुथानह
मति हिंदुपर साहि सज्जि आऔ स्वस्थानह ।

हिंदुस्थानावर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या, आणि हिंदभर मुसलमानी राज्य नि वर्चस्व चालू होऊन पांच सहाशें वर्षें झालीं. इतिहासांतील एवढ्या मोठ्या कालखंडांत हिंदूंनीं कांहीं वेळां शिर उंचाविण्याचा प्रयत्न केला; तथापि तो अयशस्वी ठरला. तत्कालीन देशपरिस्थिति कशी होती याचें वर्णन कांहीं संतकवींच्या काव्यांत आढळतें. रामदासांनीं मुसलमानी राज्यकालांत झालेल्या हिंदु समाजाच्या दुरवस्थेचें बोलकें शब्दचित्र पुढील शब्दांत रेखाटलें आहे. दास म्हणतात :---

पदार्थमात्र तितुका गेला । नुसता देशची उरला ।
येणेंकरितां बहुतांला । संकट जालें ।

लोकें स्थानभ्रष्ट झालीं । कितेक तेथेंची मेलीं ।
उरली तें मराया आली । गावांवरी ॥

किती गुज्रिणी ब्राह्मणी भ्रष्टवील्या । किती शांमुखी जाहाजी फांकवील्या
किती येक देशांतरी त्या विकील्या । किती सुंदरी हाल होऊनि मेल्या

तीर्थक्षेत्रें मोडलीं । ब्राह्मणस्थानें बिघडलीं
सकळ तीर्थें आंदोळलीं । धर्म गेला ।

कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती
कित्येक तुरुक होती । आपुले इच्छेनें ॥

राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं
आपण अरत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥

शिवपूर्वकालीं भारताची अवस्था ही अशी होती. परंतु शिवाजी महाराजांनीं ती कशी पालटविली त्याविषयीं श्रीरामदास म्हणतात—

बुडाले सर्वही पापी । **हिंदुस्थान बळावलें**
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभूवनीं ॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला
निर्मळ जाहली पृथ्वी । आनंदवनभूवनीं ॥

या काव्यांतील ' हिंदुस्थान बळावलें ' हा शब्दप्रयोग अत्यंत मार्मिक आहे. शतकानुशतकें म्लेंच्छ आधिपत्याखालीं भरडला गेल्यानें, हिंदूंचें स्थान असलेल्या ह्या देशांत, हिंदूंची अशी कांहींच खूण उरणार नाहीं कीं काय, असें वाटण्याइतकी भीषण परिस्थिति निर्माण झाली होती. अशा ह्या अश्रुतपूर्व आपत्तींतून हिंदुस्थानाला वांचविणारी विभूति म्हणजे ' हिंदवी स्वराज्यसंस्थापक ' शिवाजी महाराज !

शिवाजी महाराजांपूर्वींही त्यांचे वडील शहाजी राजे हे मुसलमानी राजांची नोकरी करीत परिस्थितीनुरूप हिंदुहिताचें कार्य करीतच होते. पुढें पुढें शहाजी राजे यांचा दरारा इतका वाढला कीं, त्यांच्या सभोंवतालचे इतर मुसलमान सरदार त्यांचा द्वेष करूं लागले. याविषयीं असा उल्लेख[१] आहे, " ते समयीं ' ही पातशाहात बुडाली तरी बुडो. परंतु हिन्दु राजे यांचा कारभार चालूं न द्यावा ' असा सर्व यवनांनीं कट केला." शहाजी राजे यांच्या कार्याचें मूल्यमापन करून इतिहासाचार्य राजवाडे [२]म्हणतात, " हिंदुस्थानच्या तत्कालीन राजकारणांत शहाजीच्या

१ द. वि. आपटे :—इतिहास मंजरी. पृ. ३८
२ राजवाडे :—राधामाधवविलासचंपू पृ. ११५

इतिकर्तव्यतेचें कार्य हें असल्या स्वरूपाचें म्हणजे यवनांची सत्ता खिळखिळी करून मोडण्याच्या पंथास लावण्याचें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हटलें तर, शहाजी ह्या वेळीं 'हिन्दुत्वाचा विजयी वाली' बनला होता."

शिवाजीच्या काळापासून मात्र आपल्याला 'हिंदु, हिंदुस्थान, हिंदुधर्म' हे शब्द खळवळलेल्या महासागरावरील लाटांप्रमाणें पुनः वर उसळलेले दिसतात. शिवाजीविषयीं जवाहरलाल नेहरू[1] म्हणतात-"शिवाजी हा हिंदुराष्ट्रवादाच्या पुनरुत्थानाचें प्रतीक होता." आतां स्वराज्यस्थापनेविषयीं शिवरायाचे विचार कसे होते तें पाहूं[2]. 'ते समयीं महाराजांनीं विचार केला जे, 'आपण हिंदु. दक्षिण देश सर्व म्लेंच्छांनीं ग्रासिला. धर्म अगदीं बुडाला. तेव्हां धर्मरक्षणार्थ प्राणही वेंचून धर्म रक्षावा...वडिलीं मेळविलें तेंही रक्षून नवें साधन करावें.' याप्रमाणें मनांत कल्पना आणूं लागले. दादोजी कोंडदेव यांस सल्हा विचारली. त्यांणींहीं...या करण्यास आपणांस मातबर स्थळें असावीं; हिंदु राजे व हिंदु फौजा जागां जागां आपलें साह्य करीत असें असावें, अशी सल्हा दिली.

एकदां शिवाजीनें[3] आपल्या संवगड्यांस खि. १६४६ मध्यें लिहिलें—शहास तुम्हीं आपली बेमानगिरी करीत नाहीं. आदि कुलदेव स्वयंभू. यांनीं आम्हांस यश दिलें. व पुढें तो मनोरथ 'हिंदवी स्वराज्य' करून पुरविणार आहे.

पुढें अफजुलखानाचे चढाईचे वेळीं त्याचा वकील कृष्णाजी भास्कर यास गाठून शिवाजी म्हणाला[4], तुम्ही जातीचे ब्राह्मण. वर्णश्रेष्ठ आहां.

---

१ नेहरू : डिस्कव्हरी ऑफ इंडिया. पृ. २३२.

२ चिटणीस : शककर्ते श्री. शिव छत्रपती महाराज पृ. ६०–६१

३ हिंदुत्व. पृ. ५९.   ४ केळुसकर : शिवाजीचें चरित्र पृ. १५६.

आजपर्यंत मीं जें कांहीं केलें आहे तें हिंदुधर्म व हिंदुलोक यांचें रक्षण करण्यासाठींच केवळ आहे. प्रत्यक्ष भवानीनें मला अशी आज्ञा केली आहे कीं...हिंदूंचीं देवालयें व हिंदूंचे देव यांची नासधूस करणारांचें पारिपत्य कर. हिंदुधर्मद्वेष्टयांचा संहार कर. आपला धर्म बुडत चालला. देव ब्राह्मणास पीडा होत आहे. सर्व भरत खंड म्लेंच्छमय होण्याचा समय आला आहे.' असे विचार सांगून शिवाजीनें कृष्णाजीस स्वपक्षास मिळविलें.

अशाप्रकारें शिवाजी अनेक राजकारणी डाव खेळून आणि स्वपराक्रमानें राज्यवृद्धि करीत असतां शहाजी शिवाजीस भेटावयास आला. एकंदर विचारपूस झाल्यावर शहाजी शिवाजीस म्हणाला[1] 'तुम्ही हिंदु प्रजेस यवनांच्या क्लेशप्रद सत्तेंतुन सोडवून स्वराज्यस्थापन व स्वधर्मरक्षण करण्यासाठीं भगीरथ प्रयत्न करून त्यांत यशस्वी झालांत हें पाहून मला पराकाष्ठेचें समाधान व धन्यता वाटत आहे. आमच्या वडिलांस असा दृष्टांत झाला होता कीं, तुमच्या कुळांत शककर्ता उत्पन्न होऊन तो हिंदुप्रजेचें व हिंदु धर्माचें यवनापासून रक्षण करील.'

शिवाजीच्या संगोपनाखालीं, हिंदवीस्वराज्याचें बी, मूळ धरून, वाढूं लागलें होतें. अशा वेळीं साहजिकच जेथें जेथें मुसलमानांची हिंदूंवर बळजबरी होई तेथील लोक शिवाजीकडे हिंदूंचा दास्य-मोचक म्हणून साह्याची याचना करीत. सावनूरमधील हिंदू लोक शिवाजीस लिहितात—[2]'हा युसफ फार खस्त आहे. आम्हीं त्याचे हाताखालीं वागण्यास कंटाळलों. तुम्हीं हिंदुधर्माचे संस्थापक, म्लेंच्छांचे नाशक, म्हणून तुम्हांकडे आलों.'

पुढें शिवाजीचें पारिपत्य करण्यासाठीं औरंगजेबानें राजा जयसिंग यास दक्षिणचे स्वारीवर पाठविलें. स्वारीवर निघतांच[3] जयसिंगानें

---

१ केळुसकर पृ. २०४. २ हिंदुत्व पृ. ६०. ३ केळुसकर पृ. २४७.

शिवाजीस एक पत्र पाठविलें त्यांत तो लिहितो, 'औरंगजेब हा अतिबलाढ्य पादशहा आहे. त्याशीं तुम्ही सख्य करावें हें उत्तम...हिंदु-धर्माचा तुम्हांस पूर्ण अभिमान आहे हें पाहून आम्हांस संतोष वाटतो.'

महाराजांनीं जयसिंगाच्या या पत्रास उत्तर लिहिलें आणि आपला वकील रघुनाथपंत याचे हातीं तें पत्र देऊन त्यास जयसिंगाकडे पाठविलें. त्या पत्रांत महाराज लिहितात[१]....'हिंदु धर्माचा अभिमान हिंदु राजांनीं टाकिला हें कांहीं चांगलें नाहीं. ह्या भूमीचें राज्य हिंदु राजे पुरातन काळापासून करीत आले असून सांप्रत ते पद-भ्रष्ट होऊन यवनांचे अंकित झाले आहेत, हें पाहून मन उद्विग्न होतें.'

हें पत्र आणि तोंडी निरोप देऊन निघतेवेळीं रघुनाथपंतानें जय-सिंगास एकांतीं गाठून त्यास सांगितलें[२] 'तुम्ही शहाणे हिंदु राजे आहांत ...शिवाजी महाराज तुमचें लेकरूं आहे. त्यांच्याकडून हिंदु धर्माचें रक्षण करविणें आपल्या हातीं आहे...हिंदु राजाच्या कुळांत तुम्ही प्रति-सूर्य उदय पावलां आहां.'

तसेंच आपला भाऊ व्यंकोजी यास तंजावरची जहागीर परत देतांना शिवरायांनीं लिहिलें[३]—'दुष्ट हिंदु-विद्वेषीयांस आपल्या राज्यांत ठेवूं नये.' संभाजी मोगलांस मिळाला असतां शिवाजीनें त्यास बोध केला कीं,[४] 'तुम्ही हिंदुपदपादशाहीचे अधिकारी असून थोर कुळांत उत्पन्न झाला आहांत...'

वर उध्दृत केलेल्या सर्व उताऱ्यांवरून 'हिंदु' या दृष्टीनेंच शिवा-जीचें स्वराज्य निर्माण झालें होतें याची निश्चित कल्पना येते. परंतु शिवरायांनीं जयसिंगाला लिहिलेलें पुढील पत्र इतक्या खोल आणि

१ केळुसकर. पृ. २४८.
२ केळुसकर पृ. २४९-५०.
३ हिंदुत्व पृ. ६१
४ केळुसकर. पृ. ४६१

मार्मिक विचारांनीं भरलेलें आहे कीं, त्यास 'हिंदुराष्ट्रवादाची घोषणा' असेंच यथार्थपणें म्हणतां येईल. हिंदुराष्ट्रवादाचें आकलन होण्यासाठीं ह्या पत्राचें वाचन शतशः करावें ह्या मोलाचें तें आहे. शिवराय[1] जयसिंगास लिहितातः—

"मी असें ऐकलें आहे कीं, मजवर चढाई करण्यासाठीं नि दख्खन जिंकण्यासाठीं तूं आला आहेस. हिंदूंचें हृदय नि नेत्र यांच्या रक्तानें तूं जगांत यशस्वी होऊं पहात आहेस. पण तुझ्या हें लक्षांत आलें नाहीं कीं, त्यामुळें तुझ्या तोंडास काळोखी फासली जात आहे; कारण या कृत्यानें देशावर नि धर्मावर आपत्ति ओढवली आहे.......बरें; जर मी तरवार नि कुऱ्हाड यांचा उपयोग केला तर, दोन्ही बाजूंनीं हिंदूंचीच हानी होणार...कारण औरंगजेब आमचा मार खाण्यास समर्थ नाहीं. हिंदु लोकांत कोणी बलशाली राहूं नये आणि सिंहानीं आपसांत लढून घायाळ व्हावें आणि गिधाडांना अरण्याचें स्वामित्व प्राप्त व्हावें अशी औरंगजेबाची इच्छा आहे...आम्हां लोकांशीं युद्ध करून हिंदूंचें शिर धुळीस मिळविण्याचें काम तूं मात्र करूं नये...जर तुझ्या तीक्ष्ण तरवारींत पाणी असेल, नि घोड्यांत दम असेल तर, हिंदुधर्माच्या शत्रूवर चढाई करून इस्लामधर्माचें जडमूळ खोदून टाक. कुमार छत्रसाल याजवर तो कशाप्रकारची आपत्ति आणूं पहात होता, हें तूं जाणतोसच. या दुष्टाच्या हातून हिंदू लोकांवर आणखीही काय काय अनर्थ ओढवले आहेत, हेंही तुला ठाऊक आहे......हा प्रसंग आम्ही आपसांत लढण्याचा नाहीं; कारण हिंदूंवर यावेळीं मोठें कार्य येऊन पडलें आहे. आमचीं पोरेंबाळें, देश, धन, देव नि पवित्र देवपूजक या सर्वांवर त्याच्यामुळें पराकाष्ठेचें दुःख कोसळलें आहे. आणि हाच क्रम आणखी कांहीं दिवस चालेल तर, आम्हां हिंदूंचें चिन्ह सुद्धां ह्या पृथ्वीवर उरणार नाहीं. **आम्ही लोकांनीं यावेळीं हिंदु,**

---

१ द. वि. आपटे. पृ. १५०-१५४.

हिंदुस्थान नि हिंदुधर्म यांच्या संरक्षणार्थ फार जोराचे प्रयत्न केले पाहिजेत. तुर्कांचा जाब तुर्कीतच दिला पाहिजे.......म्हणजे त्याच्या नांवाचें औरंगही (राजसिंहासन) राहाणार नाहीं व जेबही (शोभा) राहाणार नाहीं.......दोन अंतःकरणें एक होतील तर पहाड तोडतां येईल.......मला तुझ्यापासून अशी भीति नाहीं; कारण तुझ्यामाझ्यांत कांहीं शत्रुत्व नाहीं."

ह्या शिवाजीच्या पत्रांतील हिंदु, हिंदुस्थान आणि हिंदुधर्म हे शब्द कोणता मनोभाव व्यक्तवितात? 'हिंदुस्थान हा हिंदूंचाच देश आहे. त्यांत हिंदुधर्मावांचून दुसरा धर्म राष्ट्रधर्म म्हणून राहूं शकत नाहीं.' हाच मनोभाव वरील पत्रांत आहे. मुसलमानांकडे शत्रू म्हणून पाहाण्याची हिंदूंची जी दृष्टि होती ती शिवाजीच्या मृत्यूनंतर निवळली नाहीं; किंबहुना ती वृद्धिंगतच झालेली आढळते. कशी ती पहा.

जयपूर संस्थानच्या दप्तरांतील छत्रपती संभाजी महाराजांचीं दोन संस्कृत पत्रें सध्यां प्रसिद्ध झालीं आहेत. संभाजीनें रामसिंगास लिहिलेल्या पत्रांत औरंगजेब बादशहाला सिंहासनावरून काढून टाकण्याची प्रचंड योजना आंखलेली आहे. या योजनेसाठीं संभाजीनें रामसिंगाचें साहाय्य मागितलें होतें. पत्रांत संभाजी[1] लिहितो, "आम्ही हिंदु आहोंत. नी सध्यांच्या परिस्थितींत आमच्याकडून जें होणें शक्य असेल तें आम्हीं करूं, असें तुम्हीं आम्हांस लिहिलें. खरोखरच जर तुमची अशी इच्छा असेल तर, तुम्ही या कामामध्यें पुढारीपण घेऊन हें कार्य करावें. सध्यांचा बादशहा (औरंगजेब) समजत आहे कीं, सर्व हिंदु मेषपात्र झालेले आहेत नी त्यांनीं आपल्या धर्माचा अभिमान पूर्णपणें सोडलाहीं आहे."

इतिहासप्रसिद्ध जिंजीच्या वेढ्यांत, ज्या वेळीं मराठी सैन्यें तो वेढा

१ पुरुषार्थः

फोडून त्यांतून निसटून जाण्याचा प्रयत्न करीत होती त्या वेळीं, मोगल सेनाधिकाऱ्यांच्या हातांखालीं लढत असलेल्या मराठ्यांना आपल्याकडे वळवून घेण्याचा प्रयत्न करण्यांत आला होता.[१] 'नागोजी राजे यांजकडे संधान केलें, तुम्ही आम्ही एक झाल्यास ही फौज मोडून हिंदुधर्म जतन करूं'...शिर्के हे मोगलांचे ताबेदार बनले. तेव्हां खंडोबा बल्लाळ म्हणाले 'तुमचें जसें शिरकाण केलें, तसेंच आमचेही तीन पुरुष हत्तीपायीं मारविले; परंतु हिंदूंच्या दौलतीकरितां आम्ही झटत आहोंत.'

पुढें नादिरशहाचे स्वारीविषयीं बाजीराव ब्रम्हेंद्रस्वामीस लिहितो[२]— हिंदु लोकांस फार मोठें संकट प्राप्त झालें आहे. अद्याप वसई आली नाहीं. आपुलीं घरगुतीं भांडणें (रघूजीचें पारिपत्य वगैरे) बाजूला ठेवलीं पाहिजेत. आतां सर्व हिंदुस्थानास एक शत्रु उत्पन्न झाला आहे. तसेंच नादिरशहाच्या स्वारीविषयीं आपल्या सैनिकांना उद्देशून तो म्हणतो 'अरे बघता काय? चला जोरानें चाल करून. हिंदुपदपादशाहीस आतां उशीर काय?'

असो, ह्या भूमीवर, हिंदु राजे पुरातन काळापासून राज्य करीत होते. परंतु स्वसमाजामध्यें, राज्य टिकविण्यासाठीं आवश्यक अशी राजकीय ऐक्याची जाणीव कमी झाल्यामुळें मध्यंतरीं पदभ्रष्ट होऊन यवनांचे अंकित झाले. अशा प्रसंगीं हिंदूंनीं संघटन करून हिंदुराज्य स्थापावें, म्हणजे हिंदुधर्म वृद्धिंगत होईल असें केवळ शिवाजी, संभाजी, बाजीराव इत्यादींनाच वाटत होतें, असें नाहीं. हिंदुस्थानांतील इतर भागांतही संघटनेची ही विचारधारा कशी प्रसृत झाली होती ह्याविषयींचे पुढील पुरावे चिंतनीय वाटतील.

'शिवाजी न होत तो सुन्नत होत सबकी' ह्या शब्दांत शिवाजी-

---

१ हिंदुत्व : पृ. ६१ २ हिंदुत्व : पृ. ६४

मुळेंच हिंदूंचें चिन्ह पृथ्वीवर राहिलें असें सांगतांना भूषण कवि[1] म्हणतो—

राखी हिन्दुवानी, हिंदुवान तिलक राख्यो।
स्मृति और पुराण राख्यो वेद विधि सुनि में।।

तद्वतच शिखांचा गुरु तेगबहादुर[2] आपल्या 'सूर्य प्रकाश' काव्यांत वर्णितो---

'तिन ते सुन श्री तेगबहादुर। धर्म निवाहन विषे बहादुर
उत्तर भनयो धर्म हम हिंदु। अति प्रियको किम करे निकंदु॥

शिखांचा १० वा गुरु गोविंदसिंह[3] यानें तर आपल्या 'विचित्र' नाटकांत "जगे हिंदु धर्म सकल भंड भाजे" या स्पष्ट शब्दांत आपलें हिंदुत्वप्रेम व्यक्तविलें आहे. सवाई जयसिंगानें[4] एका पत्रांत लिहिलें आहे कीं, "हजार शाबास है, आप सब मालवे सरदार एक रहके हिंदू धर्मका कल्याण होना, और मालवेमें हिंदू धर्मकी वृद्धि होना। इस बात पर विचार कर मालवेसे मुसलमानोंको नौमेद किये। और हिंदूधर्म कायम रखा."

वरील उताऱ्यांवरून हें ध्यानांत येईल कीं, महाराष्ट्रीय हिंदूंप्रमाणेंच इतरप्रांतीयांसही हिंदुत्वाविषयीं आणि हिंदुधर्माविषयीं आपुलकी आणि अभिमान वाटत असे.

नादीरशहाचे दिल्लीवरील स्वारीविषयीं वासुदेव दीक्षित[5] लिहितो— "इंद्रप्रस्थांत पश्चिमेचा यवन येऊन बसला. शहरांत जनांचा संहार झाला. हिंदूंचा द्वेष्टा महादुष्ट आहे." बाजीरावाचा प्रतिनिधि (वकील) धोंडो

---

१ हिंदुत्व : पृ. ५६. २ हिंदुत्व पृ. ५८ ३ हिंदुत्व पृ. ५९
४ ,, पृ. ६४ ५ सरदेसाई : मराठी रियासत, पुण्य. शाहू पृ. ३२९

गोविंद[1] नादिरशहाच्या स्वारीविषयीं लिहितो,—"निजामच जर फितूर आहे, तर नादिरशहा माघारा जात नाहीं. हिंदुराज्यांवर निघेल. हिंदुराजे सर्व सवाई आदिकरून स्वामींचें स्वारीची प्रतीक्षा करितात."

तसेंच, प्रकरण निकरावर येतेंसें पाहून शाहूनें[2] गुजराथचा मोकासा पूर्वीप्रमाणें दाभाड्यांस देऊन कानउघाडणीचें पत्र गौरवून लिहिलें कीं–"तुम्ही साहेबांचे एकनिष्ठ कार्याचे हिंदुसेवक, यास्तव साहेब तुम्हांपरी बहुत सदयचित्तें कृपा करीत असतां, हल्लीं दुसऱ्याचा आश्रय करून आपले एकनिष्ठतेस बोल लावून घ्यावा यांत फायदा काय?"

वसईच्या युद्धाच्या वेळीं पोर्तुगीझांनीं[3] आपल्या वरिष्ठांस कळविलें कीं, "मराठ्यांनीं मोगलांस जर्जर करून सोडिलें. ते मुख्य दोन अटी आमच्यावर लादूं पहातात. एकः 'पोर्तुगिझ हद्दींत हिंदु लोकांस देवळें बांधण्याची परवानगी; दुसरीः वसई प्रांताच्या प्रत्येक गांवाची खंडणी".

नानासाहेब[4] ताराबाईस लिहितात, "मोंगल केवळ हिंदुराज्याचे शत्रु. त्यांस देखिल अनुसंधानें होत असतांना सेवकच केवळ वाकडे वर्ततात हाच दोष."

नाना फडणवीस व महादजी शिंदे यांचें ऐक्य झाल्याचें ऐकल्यावर निजामाच्या दरबारीं असलेले पेशव्यांचे वकील गोविंदराव काळे यांनीं नाना फडणवीस यांना एक पत्र पाठविलें होतें. शिवाजीनें जयसिंगास लिहिलेलें पत्र वगळल्यास, इतकें ओजस्वी नी राष्ट्रीयत्वाची निश्चित कल्पना देणारें पत्र दुसरें कोणतें असेल असें वाटत नाहीं. गोविंदराव काळे[5] लिहितात, "पत्र पहातांच रोमांच उभे राहिले, अति संतोष

१ सरदेसाई : पु. शाहू. पृ. ३३२ २ सरदेसाई : पु. शाहू. पृ. १८९
३ ,, ,, पृ. ३४५
४ हिंदुत्व : पृ. ६५ ५ हिंदुत्व : पृ. ६६-६७.

झाला. विस्तार पत्रीं किती लिहूं? ग्रंथचे ग्रंथ मनांत आले. अटक नदीचे अलीकडे दक्षिण समुद्रापावेतों हिंदूंचें स्थान, तुर्कस्थान नव्हे. हे आपली हद्द पांडवांपासून विक्रमाजितपावेतों. त्यांनीं राखून उपभोग घेतला, त्यामागें राज्यकर्ते नादान निघाले. यवनांचें प्राबल्य झालें. चकत्यांनीं (बाबरच्या वंशजांनीं) हस्तनापूरचें राज्य घेतलें. शेवटीं आलमगिराचे कारकिर्दींत यज्ञोपवीतास साडेतीन रुपये जेजिया बसून ओलें अन्न विकत घ्यावें अशी नौबत गुजरली......

त्या दिवसांत कै. शिवाजीराजे शककर्ते व धर्मराखते निघाले. त्यांनीं किंचित् कोन्यांत धर्मरक्षण केलें. पुढें कै. नानासाहेब व भाऊसाहेब प्रचंड प्रतापसूर्य असे झाले कीं, असें कधीं झालें नाहीं. हल्लीं श्रीमंतांचे पुण्य-प्रतापेंकरून व राजेश्री पाटीलबुवांच्या बुद्धि व तरवारीच्या पराक्रमेंकरून सर्व घरास आलें. परंतु झालें कसें? प्राप्त झालें तेणेंकरून सुलभता वाटली; अगर मुसलमान कोणी असते तर मोठमोठे तवारिखनामे झाले असते. यवनांच्या जातींत इतकी गोष्ट चांगली झाल्यास गगनाबरोबर करून शोभवावी. आमचे हिंदूंत गगनाइतकी झाली असतां तिचा उच्चार न करावा हें चाल आहे. अलभ्य गोष्टी घडल्या. यवनांच्या मनांत काफर-शाही झाली असें बोलतात.......

लेकिन ज्यांनीं ज्यांनीं हिंदुस्थानांत शिरें उचलली त्यांची पाटील-बोवांनीं फोडली, न लाभल्या त्या गोष्टी लाभल्या. त्यांचा बंदोबस्त शककर्त्यांप्रमाणें होऊन उपभोग घ्यावें पुढेंच आहे. कोठें पुण्याइंत उणें पडेल आणि दृष्ट लागेल न कळे. झाल्या गोष्टी त्यांत केवळ मुलूख, राज्य प्राप्त इतकेंच नाहीं, तरी वेदशास्त्ररक्षण, गोब्राह्मणप्रतिपालन, सार्वभौमत्व हातीं लागणें; कीर्ति, यश यांचे नगारे वाजणें इतक्या गोष्टी आहेत. हे किमया संभाळणें हक्क आपला व पाटीलबोवांचा. त्यांत वेत्यांत पडला कीं दोस्त दुष्मन मजबूत. संशय दूर झाला. अति अति चांगलें. दुष्मन उश्या-

पायथ्याशीं लागून आहेत. चैन नव्हतें. आपण लिहिल्यावरून मन स्वस्थ झालें".—इतक्या सहजसुंदर शैलीनें लिहिलेलें हें एकच पत्र आपल्या इतिहासाचें अंतरंगदर्शन जितक्या उत्कटतेनें आणि वास्तविकतेनें घडवितें, तितकें तें दुसऱ्या शेंकडों शुष्क इतिहासग्रंथांनीं कदापिहि घडणें अशक्य आहे. हिंदु नी हिंदुस्थान या नांवांची सहज स्फुरलेली आणि अचूक अशी व्युत्पत्ति या लेखकानें दिलेली आहे. त्याचबरोबर अगदीं शेवटच्या पिढ्यांपर्यंत आपल्या पूर्वजांना या नांवांविषयीं किती प्रेम होतें, किती भक्तिभाव होता, नी त्या नांवाशीं ते कसे एकरूप झाले होते याचें इतकें सावेश दिग्दर्शन या पत्रांत झालेलें आहे कीं, त्यासंबंधी आतां दुसरा पुरावा उद्धृत करणेंच निरर्थक होईल."

नाना फडणवीसांस गोविंदराव काळ्यांनीं लिहिलेलें पत्र त्यावरील सावरकरांच्या भाष्यासह वर उद्धृत केलेलें आहे. येथून पुढेंही पेशवाईच्या अंतापर्यंत आपण 'हिंदु' असल्याची जाणीव कशी जागृत होती हें पुढील उतारे दर्शवितात.

२३ ऑगस्ट १८०३ मध्यें रघूजीस यशवंतराव लिहितो[१], "हिंदुधर्म सर्वांनीं मिळून राखावा; स्वराज्यांतून इंग्रजांस काढावें हें सर्वपरी चांगलें आहे म्हणून लिहिलें."

इंग्रजांनीं शिंद्यांशीं युद्ध पुकारलें तेव्हां त्यांनीं बाजीरावांस फौज घेऊन बरोबर बोलाविलें. युद्धांत कोणास सामिल व्हावें यासंबंधानें पटवर्धनांची तारांबळ फारच उडाली. रामचंद्र अप्पास गंगाधरराव बोलला[२], "दौलतेत शत्रु प्रबळ शिरला. दौलत रहात नाहीं. आजपर्यंत स्वेच्छाभोक्तृत्व झालें. हिंदुधर्म सर्वांनीं एकदिल होऊन राखावा."

......यावेळीं रघूजी भोसल्यानें खालील पत्र[३] पटवर्धनांस पाठ-

१, २, ३ सरदेसाई : म. रि. उत्तर विभाग ३, पृ. २४७, २५८, २५९

विलें. ' इंग्रजांनीं स्वराज्यांत प्रसार करून दौलत आकर्षण केली. त्यास हिंदुधर्म रक्षावा. स्वराज्य राखावें हें चित्तांत धरून दौलतराव शिंदे यांसुद्धां आम्हीं मसलतीस प्रवर्तक जाहलों असों. तुम्हांस तो स्वराज्याचें कल्याण पहाणें, व या मसलतीस अनुकूल होणें जरूर आहे......गायकवाडांच्या संस्थानाची व जनानखान्याची सुद्धां दरमहा नेमणूक होऊन इंग्रजांनीं बंदोबस्त केला. **कुल हिंदूंचे** दौलतीवर इंग्रजांचा ताबा झाला."

......याच संबंधांत यशवंतराव होळकराचें[1] प्रतिनिधीस लिहिलेले खालील उद्गार ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. " आजपर्यंत **हिंदुराज्य** सर्वांनीं एकदिल राहून चालविलें. अलीकडे ज्याचे त्याचे दौलतींत गृहकलह होऊन राज्य विपर्यास पडोन हिंदुधर्म नाहींसा होण्यास मूळ जाहलें. त्याचें छेदन करण्यास सर्व एकदिल झाले पाहिजेत, तर **हिंदूंची कायमी** राहील, आम्हीं जो क्रम इंग्रजांशीं लढण्याचा आरंभिला आहे, हाच यावद्देह चालवावा असें मनांत आहे. यांत परमेश्वर अनुकूल होऊन जें घडविल तें खरें. परंतु एकानेंच असा प्रकार करून बाकीच्यांनीं तमाशा पाहून आपापली दौलत सांभाळून असावें, यांतील परिणाम कसा आहे हें चित्तीं विचारून ज्यांत हिंदु धर्माची कायमी व परिणामास नीट तें करावें. याचा विचार तुमच्यासारख्यांनीं न केला तर दुसरा कोण करील?"

दिनांक २१–१०–१८०४ ला यशवंतरावानें[2] आपला नागपूरचा वकील खंडो महादेव यास कळविलें, " ......येथील एक संधान राहून शत्रूचें पारिपत्य होऊन बंदोबस्त झाला पाहिजे. या अन्वयें तुम्हीही बोलून ज्यांत त्यांची कायमी पूर्वीप्रमाणें राहून, मसलत शेवटास जाऊन, स्वराज्याचा बंदोबस्त घडून, हिंदुधर्म राहील तें करणें. " .... यशवंतरावानेंही[3] या वेळीं असा पुकारा केला कीं, " इंग्रजांविरुद्ध सर्व

१, २, ३, सरदेसाई : म. रि. उत्तरविभाग ३, पृ. २९१-९२, २९७, ३३४

हिंदु दौलतदार उठले असून सर्वांनीं मिळून एकदम त्यांचा पाडावा केला तरच आपला निभाव आहे."

आपल्या एकंदर उद्योगाचा फलादेश खुद्द यशवंतरावानें[1] नागपूरकर व्यंकोजी भोसले यास (१५-२-१८०६) एक सुंदर पत्र लिहून केला आहे, तें पत्र असें :—"हिंदुधर्मास मुख्य आपले इरादे नमूद असावे तें कांहीं एक दिसण्यांत येईना."

वरील सर्व उताऱ्यांवरून शिवाजीच्या जन्मापासून पेशवाईच्या अंता-पर्यंत आपण हिंदु आहोत, नि हें राज्य हिंदूंचेंच आहे ही भावना अखिल हिंदु समाजांत कशी नांदत होती हें स्पष्टपणें दिसतें. परंतु याचा अर्थ असा नव्हे कीं, पेशवाईचा अंत होतांच हिंदुपदपादशाहीची, हिंदु दौलतीची कल्पनाही अंत पावली! हिंदुत्वाची ही दिव्य ज्योत हिंदूंच्या उदयकाला-इतकीच अस्तसमयींही प्रकर्षानें तळपत होती याविषयीं ऐतिहासिक पुरावे उपलब्ध आहेत. आपण हिंदु आहोंत, हिंदुधर्माचा अभिमान आपण धरिला पाहिजे, 'हिंदु' शब्दास गौरवाप्रत नेण्यास आपणांवांचून कोणीही नाहीं, याची जाणीव पेशवाईनंतरही हिंदुसमाजांत जिवंत होती.

१८५७ च्या स्वातंत्र्यसमरांत पराभूत झाल्यावर नानासाहेब नेपाळांत अंतर्धान पावले. पण तत्पूर्वी नेपाळचा राजा जंगबहाद्दर याचा एक सरदार कर्नल बलभद्रसिंह याच्याशीं समक्ष बोलतांना नानासाहेब नि इतर क्रांतिकारक त्याला[2] म्हणाले, "आम्हीं हिंदूधर्माकरितां लढलों आहों. महाराज जंगबहाद्दर हेही हिंदूच असल्यानें त्यांनीं आम्हांला साह्य द्यावें. जर ते आम्हांला साह्य देत असतील, इतकेंच काय पण त्यांचे अधिकारी येऊन आमचें नेतृत्व स्वीकारीत असतील तर, त्यांच्या नेतृत्वाखालीं

१ सरदेसाई : म. रि. उत्तरविभाग ३, पृ. ३५९-६०

२ सावरकर : सत्तावनचें स्वातंत्र्यसमर, पृ. ५४१

वागूनहि आम्हीं कलकत्यावर धडक मारूं. जो कांहीं देश आम्हीं परत हस्तगत करूं तो सर्व गुरखा सरकारच्या स्वामित्वाखालीं राहिल्यास प्रत्यवाय नाहीं."

केवढा प्रचंड स्वार्थत्याग ! आणि कशासाठीं ? इंग्रजांपासून जिंकलेले प्रदेश गुरख्यांना द्यावयाचे मग ते जिंकावयाचे तरी कशाला, असा स्वार्थी प्रश्न नानासाहेबांसमोर जराही आला नाहीं. हिंदुस्थानचे राज्य-कर्ते पेशवे राहावेत कीं गुरखे व्हावेत, हा प्रश्न नानासाहेबांस फारच गौण वाटला. कारण, कसेंही झालें असतें तरी राज्य हिंदूंचेंच राहात होतें. मुसलमानांचें किंवा टोपीकरांचे राज्य होऊं नये यासाठींच तर मुळीं नानासाहेब स्वतःचें रक्त सांडण्यास सिद्ध झाले होते ! नानासाहेबांच्या ह्या विनंतीस गुरख्यांचा तत्कालीन राजा मान्यता देऊं शकला नाहीं, याचें कारण त्यावेळची राजकीय परिस्थितीच तशी होती. संघटितपणांत नि शस्त्रबलांत अनेक पटींनीं इतर राष्ट्रांस भारी ठरून जगभर राज्य कमवीत चाललेले इंग्रज गुरख्यांच्या टिचभर हिंदुराज्यास केव्हांच जिंकू शकले असते. ही शक्यता नि भीति मनांत असल्यानें गुरख्यांच्या राजानें नानासाहेबांच्या विनंतीचा अव्हेर केला असावा. परंतु नानासाहेबांची विनंति अव्हेरली गेली असली तरी, नानासाहेबांनी व्यक्तविलेली हिंदुत्वाची भावना ही त्यांच्यांत तेवढी होती नि गुरख्यांत नव्हती, असें म्हणणें सयुक्तिक ठरणार नाहीं. कारण तीच हिंदुत्वाभिमानाची परंपरा आजवर उभयपक्षीं अविच्छिन्न राहिल्यानेंच, इंग्रजांना साह्य करणारे नेपाळचे नरेश सावरकरांना लिहिलेल्या पत्रांत[१] म्हणतात, "नेपाळची सीमा मी वायव्य प्रांत समजतो. हिंदुस्थानांत हिंदुत्वाचा नाश झाला तर नेपाळचा नाश होईल, नी हिंदुत्वाची वृद्धि झाली तर नेपाळचीही होईल."

ह्याच सत्तावनच्या स्वातंत्र्यसमरांत जगप्रसिद्ध झालेली झांशीची

---

१ ग. रं. भिडे : सावरकर सूत्रें, पृ. ३९

राणी लक्ष्मीबाई म्हणाली[1] होती कीं, "मीं अर्धाशेर तांदुळाची धनीण. मजला विधवा धर्म सोडून हा उद्योग करण्याची कांहींच जरूरी नव्हती. परंतु हिंदुधर्माचा अभिमान धरून ह्या कर्मास प्रवृत्त झालें, व याजकरितां वित्ताची जीविताची सर्वांची आशा सोडली."

'५७ चें स्वातंत्र्य-समर अयशस्वी झाल्यावरही हिंदुत्वाची भावना कोमेजल्याचें दिसत नाहीं. सशस्त्र चळवळ अयशस्वी झाल्यावर कांहीं वर्षांनी वैध (सनदशीर) चळवळीस आरंभ झाला. ह्या वैध चळवळीच्या आरंभाबरोबरच नवीन राष्ट्रवादाच्या संगोपनास सुरुवात झालेली दिसते. आणि त्या परिस्थितींत तें अंशतः न्याय्यही ठरतें. कारण स्वराज्याचे अधिकार मागतांना राष्ट्रीयत्वाचा वेश आवश्यक होता. स्वराज्याच्या मागणीस मान्यता देण्यापूर्वी इंग्रजांनीं एकमुखी मागणीची आवश्यकता पुढें केली होती. ही एकमुखी मागणी एकरसी समाजाच्या कल्पनेवांचून शक्य दिसली नाहीं; आणि अशा समाजाची कल्पना तत्कालीन पुढाऱ्यांनीं 'हिंदी' या शब्दानें व्यक्तविली. याप्रमाणें वैध चळवळीबरोबर इकडे हिंदी राष्ट्रवादाची विचारसरणीही प्रसृत होऊं लागली होती. परंतु तेवढ्यावरून, आपण हिंदू असल्याचा अहंकार नि हिंदुत्वाचा अभिमान आपल्या पुढारी मंडळींतून लोप पावूं लागला होता असें मुळींच नाहीं.

विष्णुशास्त्री चिपळूणकर आपल्या 'इतिहास' नांवाच्या निबंधांत लिहितात,[2] "अशांच्या फर्डेशाईपुढें आमच्या बिचाऱ्या हिंदु लेखणीनें टिकाव धरावा हें मुळींच संभवत नाहीं; तरी तिच्या सपाट्यानें अगदीं गतप्राणच न होऊन ज्यांच्यांत अजून थोडी धुगधुगी तरी उरली असेल त्यांस जिवविण्याचा यथाशक्ति यत्न करणें आम्हांस योग्य वाटतें. यास्तव

१ विष्णुपंत गोडसे : माझा प्रवास, पृ. १३८–३९
२ चिपळूणकर : निबंधमाला; पृ. ९१

आम्ही अशांस इतकेंच सांगणार कीं, बाबांनों! ज्यांच्यांत पाणिनि, वाल्मीकि, कालिदास, आर्यभट्ट, भास्कराचार्य, गदाधरभट्ट वगैरे असंख्यात धेंडें निपजलीं, त्या लोकांची केवळ मूर्खांतच गणना करणें कठीण आहे. ज्यांच्यांत रामपांडवादिक नाहीं धरले तरी विक्रमादित्य, इतिहासप्रसिद्ध पोरस, शिवाजी, बाजीराव, यशवंतराव, रणजितसिंग विजेच्या गतीनें सैन्यासहवर्तमान धांवणारा परवांचा शूर, असे तरवारबहाद्दर होऊन गेले ते केवळ 'मेंढ्याच' असतीलसें नाहीं; तसेंच ज्यांच्यांत तुकाराम, रामदास, किंवा रामशास्त्री, माधवराव असे निष्पाप महात्मे; व रमाबाई, अहल्याबाई, अशीं भूतलास भूषित व पवित्र करणारीं स्त्रीरत्नें निर्माण झालीं त्याच लोकांस अघोर, पातकी, दुराचारी, निर्दय म्हणणें म्हणजे शुद्ध दांडगाई आहे. आणि जो धर्म सर्वांत प्राचीन असून शंकराचार्यांसारख्यांनीं ज्याच्या रक्षणार्थ आपली बुद्धि खर्चली तो मेकॉले, रेवरेंड विल्सन किंवा जोतीबांसारखे त्यांचे कल्याण, अशांच्या बडबडीनें व शुष्क तर्कांनीं ऱ्हास पावेल हें मुळींच संभवत नाहीं! वरील गोष्टी इतक्या धडधडीत स्पष्ट दिसत असतांही आमच्या लोकांस त्या आलीकडे दिसेनाशा झाल्या आहेत. हें तर काय, पण आपणांस अधिकाधिक कुत्सित म्हणवून घेण्यांतच पुष्कळांस कांहीं विलक्षण प्रतिष्ठा वाटते. 'हिंदु' हा शब्द 'मूर्ख' शब्दाशीं केवळ समानार्थकच होय असें ते समजतात. आणि त्यांतून जितकें सुटून जातां येईल तितकें जाण्याचा बहुतेकांचा प्रयत्न दृष्टीस पडतो. हा 'हिंदुत्वाचा' द्वेष कित्येकांच्या ठायीं इतका जागृत असतो कीं, पोषाक, रीतरिवाज, आचार वगैरे गोष्टींत सर्व प्रकारें इंग्रजांचा नमुना उचलला असल्यामुळें त्यांच्या पूर्वस्थितीची एकमात्र काय ती मोठी खूण त्यांच्यांत राहिली असते—ती अर्थातच काळा रंग होय." ह्या एकाच उताऱ्यांत चिपळूणकरांनीं हिंदुत्ववादाच्या सर्व अंगांचा विचार आपल्या अनन्य-सामान्य शैलीनें केला आहे.

लोकमान्य टिळकांनीं १९०६ मध्यें भारत-धर्म-महामंडळांत दिलेल्या

व्याख्यानांत असें स्पष्टपणें म्हटलें कीं[1] "हिंदूंमधील पंथोपपंथांचें संघटन करून त्यांचें एक प्रबळ हिंदूराष्ट्र बनविणें हें हिंदुमात्राचें कर्तव्य आहे."

आणखीही एका ठिकाणीं टिळक[2] म्हणतात—

"आपणांस पुढें जी ऊर्जितावस्था प्राप्त व्हावयाची आहे ती हिंदूराष्ट्र या नात्यानेंच प्राप्त झाली पाहिजे."

देशबंधु चित्तरंजन दास यांना पाठविलेल्या पत्रांत[3] लाला लजपतराय स्पष्ट लिहितात—'हिंदुमुसलमान एकीच्या प्रश्नानें माझे मनाला ग्रासून टाकलें आहे; आणि तुम्हीहीं याविषयीं विशेष गंभीरपणानें विचार करा. गेले सहा महिने, मुसलमानी इतिहास नि मुसलमानी कायदा यांचा खूप अभ्यास करून माझें असें मत झालें आहे कीं, हिंदुमुसलमान एकी शक्य नाहीं नि व्यवहार्यही नाहीं."

तसेंच स्वामी श्रद्धानंद[4] एका लेखांत लिहितात—"हिंदूंच्या संयुक्त संघटनशक्तीच्या आधारावरच स्वराज्यसंपादनाचें कार्य सिद्ध होण्याचा संभव आहे. जे मिळूं इच्छित नाहींत त्यांना मिळवून घेण्याच्या नादांत सांपडून हिंदूंनीं आपल्या अस्तित्वाला किंचितही धोका निर्माण होऊं देतां कामा नये."

थोर क्रांतिवीर लाला हरदयाळ[5] आपल्या 'वेडा' चा अर्थ स्पष्टवितांना म्हणतात, "हिंदु संघटनेच्या वेड्या भक्तांचें हेंच ध्येय असावयास पाहिजे......मी अगदीं घराच्या शिखरावरून ओरडून सांगतों कीं, हिंदुस्थानांत हिंदूंचेंच स्वराज्य घडेल, आणि आपला भारतवर्ष पुनः पूर्ववत् ऋषींची भूमि होईल. हिंदुस्थान हा देश हिंदूंचा राहिला नाहीं

१ अग्रणी : १ ऑगस्ट १९४८

२, ३, ४ बाबाराव सावरकर : पूर्वी, आतां व पुढें, पृ. ७६, १८९, १८८

५ राष्ट्रसेवकाची शिदोरी, पृ. ७०,

तर, आपलें राष्ट्रीय जीवितच नष्ट होईल. दुसऱ्याच्या साह्यावांचून स्वराज्य मिळणार नाहीं असलें भीरु तत्वज्ञान हिंदूंना शिकवूं नका."

अखिल–महाराष्ट्र–हिंदु–युवक परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत डॉ. हेडगेवार म्हणतात[१], "आपल्या देशाचें नांव हिंदुस्थान आहे, हिंदीस्थान नव्हे. हिंदुस्थानचें हिंदीस्थान व इस्लामीस्थान न होईल असा प्रयत्न करा. हिंदुस्थान हा हिंदूंचा आहे, नि पुढेंही तो तसाच राहिला पाहिजे...... आपणांपैकीं प्रत्येकाला हिंदूसमाजाचें हित करण्यांत नि स्वतःला हिंदू म्हणवून घेण्यांत आनंद वाटला पाहिजे."

हे लोकच काय, पण एकाद्या हिंदुत्वनिष्ठ संस्थेशीं कांहीं एक संबंध नसलेले, वि. ना. चंदावरकरांसारखे[२] स्वतंत्र गृहस्थही, स्वतः हिंदु असल्याचा अभिमान बाळगतांना आढळतात. 'शांतता परिषदेंत बडे भाई शौकतमिया यांनीं जेव्हां चंदावरकरांवर आग पाखडण्यास सुरुवात केली, तेव्हां मात्र बड्या भाईच्या क्रोधाला भीक न घालतां ताडकन् उठून त्यांनीं उत्तर दिलें कीं, "मी हिंदु मेयर (नगराध्यक्ष) आहे हें सुदैव म्हणा अगर दुर्दैव म्हणा, पण मी तसा आहे खरा. आणि हिंदु म्हणवून घेण्यांत मला अभिमानच वाटतो."

तसेंच 'एक हजार वर्षांनंतर' या आपल्या लेखांत न. वि. गाडगीळ[३] लिहितात—"पडक्या घरांच्या रांगांतुन आम्ही सोमनाथ मंदिरापुढें आलों. स्मशान, पडका किल्ला, पडकीं घरें, जणूं कांहीं संपूर्ण नष्ट सृष्टि पुरी झाली नव्हती म्हणून या भग्न मंदिरापुढें आम्ही आलों. अंतःकरणांत कालवाकालव झाली. अवतींभोंवतीं शेंकडों लोक होते. हे

---

१ राष्ट्रसेवकाची शिदोरी : १ पृ. ७४–७५

२ सत्यग्राही : ग्रह आणि तारे, पृ. १६३

३ विविधवृत्त : १५ ऑगस्ट १९४८

जिवंत हिंदू नी पुढें त्यांचें भग्न मंदिर हें दृश्य शल्यापेक्षांही दुःखदायक होऊं लागलें.......अटकेपार हिंदवी स्वराज्य नेणाऱ्यांचा मी वंशज, हें भग्न मंदिर, हें मूर्तिहीन देवालय कसें पाहूं, कसें साहूं? डोळ्यापुढें हजारों हिंदुवीर 'जय सोमनाथ' ही घोषणा करीत आहेत असें वाटत होते."

मागें जनाधिकार समितिकडून दिल्लीस एक मोठी सभा घेण्यांत आली होती. त्या सभेंत भाषण करतांना श्री. **पुरुषोत्तमदास**[1] **टंडन** म्हणाले, "आम्ही काँग्रेसवाले लोक, एका विनाशकारी रस्त्यावरून दीर्घकाळपर्यंत प्रगतीकडे जाण्याचा प्रयत्न करीत होतो. दोन विभिन्न संस्कृतींचा व धर्मांचा संगम अवश्य होईल अशी खोटी समजूत करून घेऊन, त्याप्रमाणें आम्हीं व्याख्यानें देत होतों. ही चूक होती हें समजण्यासाठीं आम्हांस फार मोठें मूल्य द्यावें लागलें आहे. त्या चुकीच्या समजुतीचा त्याग करून आम्हांस मोठ्यानें असें उद्घोषिलें पाहिजे कीं, हिंदुस्थानांत फक्त एकच संस्कृति राहील, नि ती म्हणजे हिंदु संस्कृति होय......हिंदुराष्ट्रासाठीं सर्वस्वाचा त्याग करणारे लक्षावधि तरुण तयार आहेत, याची आम्हांस जाणीव आहे."

याप्रमाणेंच काँग्रेसचे भूतपूर्व सभापति **श्री. कृपलानि**[2] एका भाषणांत म्हणतात, "देशासाठीं काँग्रेसवर माझें अतुलनीय प्रेम आहे. त्याचप्रमाणें माझें हिंदुत्वाच्या महानतेवर गाढ प्रेम आहे. गीता नि उपनिषदांचा मी प्रचारही करितों. याचा अर्थ असा नाहीं कीं, यामुळें माझ्या देशभक्तीस कमीपणा येतो. माझा असा विश्वास आहे कीं, खरा हिंदु हा देशभक्तच असतो."

असो; हरदयाळ, हेडगेवार, परमानंद, मुंजे, सावरकर ह्यांच्यासारख्या हिंदुत्ववादी नेत्यांना हिंदु नी हिंदुत्व यांविषयीं अभिमान वाटणें

१ युगधर्म : (हिंदी साप्ताहिक, नागपूर) १९ सप्टेंबर १९४८
२ भारतवर्ष : २ ऑक्टोबर १९४८

हें स्वाभाविक आहे. परंतु हिंदुत्वाच्या राजकीय तत्वज्ञानाशीं अर्थाअर्थी ज्यांचा संबंध नाहीं अशा गाडगीळ, टंडन, कृपलानी, चंदावरकर ह्यांच्या-सारख्यांनाही हिंदु नी हिंदुत्व ह्यांविषयीं आत्मीयता नी अभिमान वाटतो तो कां? असा कोणता मोह त्या संज्ञांमध्यें आहे?

ह्या प्रश्नाचें उत्तर हेंच कीं, '**हिंदु हा शब्द उच्चारतांक्षणींच गेल्या सहस्रों वर्षांपासून चालत आलेल्या, हिंदूंच्या ऐहिक नी पारमार्थिक अशा तेजस्वी नी दिव्य परंपरेचा साक्षात्कार त्या शब्दांनीं कोणाही हिंदूस होतो; आणि यामुळेंच हिंदुमात्रास मी हिंदु आहे ह्याचा उपजतच अहंकार असतो.**'

वर उद्धृत केलेल्या अनेक ऐतिहासिक नी वर्तमानकालीन उताऱ्यां-वरून हें निर्विवादपणें दिसतें कीं, शतकानुशतकें 'आपण हिंदु आहोंत' ह्याची जाणीव नी अहंकार हिंदुसमाजामध्यें होता, आणि आजही आहे. हिंदुसमाजपुरुषाच्या जीवनेतिहासाच्या या प्रदीर्घ कालौघांत चमत्कृतिजन्य अशा विविध घडामोडी झालेल्या दिसतात. इतिहासाचें लुप्तस्मृति झालेलें पान जर पुन्हां हातीं लागलें तर, कितीतरी घटनांचा उलगडा होईल. याच काळांत परकीयांच्या असंख्य स्वाऱ्या—सामाजिक घडण-विघडण—भिन्न सांप्रदायिक विचार—भौतिक नी आध्यात्मिक तत्वज्ञानांची निर्मिति—ऐहिक विभवाचा चढलेला उन्माद, तर त्याच ऐहिक जीवनाकडे पाठ फिरवून चिदानंदांत विलीन झाल्यानें चढलेली धुंदी,-- अशा प्रकारचे कधीं परस्पर पोषक, कधीं परस्पर विरोधी तर कधीं एकमेकांशीं समांतर असलेले असे अनेक ओघ निर्माण झालेले दिसतात! या ओघांच्या संगमांतच वैभवशाली नि दिव्य अशी हिंदु संस्कृति निर्माण झाली. **कालचक्रासमवेत हिंदु समाजही फिरत होता. परंतु त्यांत एक घटना मात्र स्थिर होती. ती म्हणजे 'हिंदु' ह्या शब्दाविषयींची ममत्वभावना आणि त्यायोगें निर्माण होणारें एकत्व.** वंश, भाषा, परंपरा, इतिहास,

संस्कृति ह्या बंधांनीं हिंदूसमाजास नुसतें एकरूपी बनविलें नाहीं तर, इतरांपासून आपण भिन्न आहोत, याचीही जाणीव करून दिली. उपरोक्त बंधांमुळें हिंदु हेच हिंदुस्थानांत राष्ट्र आहेत, हें सावरकर बंधु आणि गोळवलकर यांच्या ग्रंथांवरून दिसतेंच. परंतु एकत्वाची जाणीव आणि एकत्र राहाण्याची इच्छा हेंच राष्ट्रीयत्वाचें एकमेव गमक मानावयाचें म्हटलें तरी, त्याप्रकारची एकत्वाची जाणीव हिंदु समाजांत शतकानुशतकें नांदत होती हें आतांपर्यंत दिलेल्या अनेक उताऱ्यांवरून स्पष्ट होतें.

(२) हिंदु समाजांत एकत्व निर्माण करणारीं कारणें.

परंतु अशाप्रकारची ही एकत्व-भावना सहजासहजीं निर्माण झालेली नाहीं. एकत्वभावनेची ही तेजस्वी ज्योत सतत तेवत राहावी यासाठीं आपल्या पूर्वजांनीं अनेक युक्त्या योजिल्या होत्या. या युक्त्या अथवा योजना हजारों वर्षांच्या देवघेवींत निर्मिल्या गेल्या. ज्ञानकोशकर्ते डॉ. केतकर[1] म्हणतात, "भारतीय संस्कृति एकाच मानव वंशांतून निघालेली नाहीं; तर वैदिक परंपरेच्या लोकांच्या आचारांशीं आणि धर्मांशीं इतरांच्या आचारधर्मांचें एकीकरण होऊन आजचें 'हिंदुत्व' निर्माण झालें आहे."

भारतीय समाजांत एकत्व नांदावें, तसेंच समान संस्कृतीची जाणीव सतत जिवंत राहावी यासाठीं चार धामांच्या यात्रेची कल्पना श्रीमच्छंकराचार्यांनीं हिंदु समाजांत रूढ केली. याविषयीं पंडित सातवळेकर म्हणतात—"श्रीमत् शंकराचार्य पंचायतन पूजेनेंच धर्मैक्य व देशैक्य करून थांबले नाहींत, तर त्यांनीं चार धामांचीही स्थापना करून त्या चारही दिशांमध्यें अगदीं शेवटच्या सुरक्षित स्थानांवर आपले शिष्य बसवून धर्मजागृतीचीं चार मोठीं केंद्रेंच त्यांनीं जागृत केलीं.—येथें हें स्मरण ठेवावयाचें कीं, शंकराचार्यांनीं पूर्वीं कधीं नव्हता तो एकोपा केलेला नसून, जो अनादिकालापासून चालत आलेला होता तोच एकोपा

१ ज्ञानकोश: जग व हिंदुस्थान, खंड १, पृ. ४४

पुन्हां धुवून पुसून स्वच्छ करून व सतेज करून जनतेपुढें आचार्यांनीं ठेवला. (१) बद्रिकेदार (हिमालय), (२) द्वारका (सौराष्ट्र), (३) जगन्नाथपुरी (बिहार) आणि (४) शृंगेरी (म्हैसूर) हीं चार धामें म्हणजे अखंड भारतवर्षाचीं सुरक्षित अशीं चार केंद्रेंच होत. हीं चारही धामें एका आर्य राजाच्या अधिकारामध्येंच असलीं पाहिजेत."

तसेंच प्रातःकाळीं स्नान नी देवपूजा उरकणारे अनेक भाविक हिंदु, "गंगे च यमुने चैव गोदावरि, सरस्वति। नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन्सन्निधिं कुरु" असा जो मंत्र म्हणतात, त्यांतील नद्यांच्या[1] नामौघांत सगळा हिंदुस्थान गवसला जातो.

ज्याप्रमाणें नद्या, त्याप्रमाणेंच हिंदूमनाला पवित्र वाटणारीं तीर्थक्षेत्रें, कीं जेथें एकदां स्नान घडलें तरी मुक्ति मिळते तींही, समग्र हिंदुस्थानास आपल्या कक्षेंत घेतात. नी म्हणूनच स्नानारंभीं "गङ्गाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते। स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते।" असें म्हणून, तद्वतच प्रातःस्मरणांत[2] 'अयोध्या, मथुरा, माया, काशी, काञ्ची, अवन्तिका। पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिकाः" या श्लोकानें हिंदू मनाला पवित्र वाटणाऱ्या स्थळांच्या रूपानें, निखिल हिंदुस्थानाचें मानचित्रच, एकत्वाच्या जाणिवेनें, हिंदू आपल्या कल्पनाचक्षूंपुढें उभें करितो.

बारा ज्योतिर्लिङ्गांचें दर्शन घेणें हेंही एक आवश्यक धर्मकृत्यच ठरविल्यानें, तन्निमित्त यात्रेस निघालेला हिंदु हा सौराष्ट्रांतील सोमनाथ, श्रीशैलावरील मल्लिकार्जुन, उज्जयिनींतील महाकाल, मान्धातृपुरींतील ओंकारेश्वर (कावेरी नी नर्मदा यांच्या संगमावर), अशारीतीनें वैजनाथ, भीमशंकर, रामेश्वर, नागनाथ नी विश्वेश्वर, केदारनाथ नी

१ राधाकुमुद मुकर्जी : नॅशनॅलिझम् इन् हिंदु कल्चर, पृ. ५४
२ ,, ,, पृ. ५५

घृष्णेश्वर यांचें दर्शन घेत घेत हिमालय ते कन्याकुमारीपर्यंत फिरतो, तेव्हां त्याला आपल्या मातृभूमीच्या विशाल विस्ताराची कल्पना येते, हिंदुस्थानचें अखंडत्व प्रत्ययास येतें, आणि या साऱ्या देशांतील हिंदु हे सांस्कृतिक सूत्रानें कसे निगडित झाले आहेत याची साक्ष मिळते.

परंतु सांस्कृतिक एकत्व हें राजकीय ऐक्यावांचून टिकूं शकत नसतें याची जाणीव असल्यामुळेंच कीं काय[१], अधिराज, राजाधिराज, सामराज, एकराज, सार्वभौम यांसारखे राज्यांचे चढते क्रम आपल्या शास्त्यांनीं निर्मिले होते. अशा ह्या, नि दुसऱ्या किती तरी योजनांनीं, कधीं कळत तर कधीं न कळत, हिंदुसमाजास एकत्व दिलें गेलें.

ही एकत्वाची जाणीव, गोविंदराव काळे आपल्या पत्रांत म्हणतात त्याप्रमाणें, भारतीयांमध्यें थेट पांडवांपासून तें विक्रमादित्यापावेतों होतीच. परंतु हिंदी भाषेचा आदि कवि चंदबरदाईपासून तें आजच्या चंदावरकरांपावेतों भारतीय समाजांत नुसती एकत्वाची जाणीव होती एवढेंच नव्हे तर, ती जाणीव 'आम्हीं सगळे हिंदु' या स्वरुपाची होती. ही एकत्वाची भावना हिंदूंमध्यें फार प्राचीनकाळापासून नांदत आहे. तसेंच प्राचीनकाळापासून हिंदुस्थान देश ही त्यांची निवासभूमि आहे. हिंदूंची संस्कृत भाषा आणि तिनें निर्माण केलेलें वाङ्मय आणि संस्कृति ह्यांचा ठसा ह्या भूमीवर उमटलेला आहे. या कारणांनीं ' हिंदु समाज अखंड हिंदुस्थानांत राष्ट्र ' असल्यानेंच ' हिंदुत्व हेंच हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ' हा सिद्धांत सावरकर मांडतात.

---

१ राधाकुमुद मुकर्जी : पृ. ७१

[विभाग २]

(३) हिंदूराष्ट्रवादावरील आक्षेप आणि त्यांचें निराकरण.

मागील प्रकरणांत हिंदी राष्ट्रवाद आणि इस्लामी राष्ट्रवाद यांचा परामर्ष घेऊन ते दोन्ही राष्ट्रवाद न्याय्य नि स्वयंपूर्ण कसे नाहींत हें पाहिलें होतें. आतां ह्या प्रकरणांतील साधार विवेचनावरून 'हिंदुत्व हेंच हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व' ठरत असल्याचें आपण वर पाहिलें. त्यामुळें हिंदुराष्ट्रवाद हाच काय तो न्याय्य राष्ट्रवाद आहे असें साहाजिकच म्हणावें लागतें. तथापि ह्या राष्ट्रवादाविरुद्ध विपक्षीयांकडून दोन आक्षेप घेतले जातात. पहिला आक्षेप असा कीं, हिंदू समाजांत भेद अनेक असल्यामुळें हिंदू हे एक राष्ट्र होऊंच शकत नाहींत.

याला **उत्तर**:—हो, हिंदू समाजांत जातिभेदासारखे भेद आहेत हें खरें; परंतु त्यामुळें कांहीं हिंदू हे राष्ट्र ठरण्यास बाध येत नाहीं. कारण या सर्व जाती नि हिंदुसमाज यांचा 'अवयव-अवयवी' असा संबंध आहे हें एक; आणि हिंदू हिंदूंत जितके भेद दिसतात त्यांहून फार मोठे भेद हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी या जमातींपैकीं कुठल्याही दोनांत आहेत. हिंदूंतील कोणत्याही दोन जाती घेतल्या तरी, त्यांच्यांतील भेद हा हिंदु-मुसलमान, हिंदु-ख्रिश्चन, हिंदु-पारसी, मुसलमान-ख्रिश्चन अशा कुठल्याही जोडींतील भेदाहून मोठा अथवा तितकाही नसतो, तर तो त्या मानानें फारच अल्प असतो. तेव्हां भेद आहेत म्हणून राष्ट्रीयत्व नष्ट होत असेल तर, हिंदू, मुसलमान, पारशी इत्यादींचें मिळून होणारें हिंदीराष्ट्रच मुळांत असिद्ध ठरतें, आणि हिंदूराष्ट्रवादाआधीं हिंदीराष्ट्रवादच पार भुईसपाट होतो; आणि थोड्यांत थोडे भेद, नि अधिकांत अधिक लोकसंख्या असलेला हिंदु समाजच राष्ट्र ठरतो.

परंतु आतां हिंदुस्थान दुखंड झाल्यामुळें 'अखंड हिंदुस्थानांत हिंदू

हेच राष्ट्र होत' हा सिद्धांत आपण क्षणभर जरी बाजूला ठेवला तरी, वरील प्रमाणानें खंडित हिंदुस्थानांतही हिंदु हेच राष्ट्र ठरतात. पाकिस्ताननिर्मितीनंतर नेहरूंच्या[१] मद्रासमध्यें झालेल्या भाषणानेंही आमच्या ह्या विधानास पुष्टीच मिळते. " बहुसंख्यांकांनीं अल्प संख्या-कांना सहनशीलता दाखविली पाहिजे" असें नेहरू म्हणतात. याचा अर्थ असा कीं, अजूनही खंडित भारतांत जे बहुसंख्य हिंदु आहेत त्यांनीं झाल्यागेल्या गोष्टी विसरून अल्पसंख्यांकांशीं उदारपणें वागलें पाहिजे. 'बहुसंख्याकांनीं वर्तणूक कशी ठेवावी' हा नेहरूंच्या भाषणांतील मुद्दा येथें अप्रस्तुत म्हणून बाजूस ठेवून त्यावरून सूचित झालेल्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. नेहरू म्हणतात त्याप्रमाणें, खंडित भारतांतही अजून बहुसंख्य नि अल्पसंख्य अशी समाजाची विभागणी असेल तर, त्या समाजास एकरसी हिंदी समाज असें कसें म्हणतां येईल? आणि पुनः नेहरूंच्या विधानाप्रमाणें 'अल्पसंख्य' असे निराळे कोणी असल्यास, मग 'बहुसंख्यांक हेच राष्ट्र आहेत,' असा सिद्धांत कोणी मांडला तर त्यांत अराष्ट्रीय किंवा जातीय तें काय ?

सावरकरांनीं कर्णावतीच्या (अहमदाबादेच्या) हिंदु महासभा-अधिवेशनांत आपल्या अध्यक्षीय भाषणांत, हिंदु राष्ट्राची राज्यघटना ज्या तीन तत्त्वांवर अधिष्ठित असेल असें सांगितलें तीं तीन तत्त्वें अशीं :—(१) प्रत्येक माणशीं एक मत. (२) लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधित्व आणि (३) पात्रतेप्रमाणें नोकऱ्या. विशुद्ध लोकशाहीवर आधारलेली ही जी राज्यघटना सावरकरांनीं सुचविली तिच्याहून अधिक विलोभनीय असें खंडित भारताच्या स्वीकृत राज्य-घटनेंतही आज तरी काय आहे ? 'राष्ट्र' या विषयासंबंधीच्या तात्त्विक चर्चेत शासनसंस्थेलाही गोवल्या कारणानें, तसेंच राष्ट्र (Nation) आणि शासनसंस्था

---

१ टाइम्स ऑफ इंडिया, २७ जुलै १९४८

(State) यांतील भेदाचें आकलन न झाल्यामुळें, हिंदु-राष्ट्रासंबंधीचा अपसमज निर्माण झाला आहे. एका शासनसंस्थेच्या आधिपत्याखालीं जसें एक राष्ट्र असूं शकतें, तसेंच एकाहून अधिक राष्ट्रें अथवा अल्प-संख्याक जमाती असण्यास राज्यशास्त्राचा विरोध नाहीं. ह्यासंबंधीचें विशेष स्पष्टीकरण उपसंहारांत येईल.

विपक्षीयांचा दुसरा आक्षेप असा :—हिंदु राष्ट्राची कल्पना धर्मा-धिष्ठित आहे.

उत्तर :— हिंदूंच्या सामाजिक नी धार्मिक इतिहासाचें परिशीलन केलें असतां असा आक्षेप घेण्याला वाव राहाणार नाहीं. हिंदुस्थानांतील प्रत्येक जण हिंदु असें मानून, आम्हीं सर्व हिंदु आहोत असें अल्पसंख्यां-कही म्हणूं शकले असते. परंतु त्यांनीं तसें केलें नाहीं, हा कांहीं हिंदु-समाजाचा दोष नव्हे. डॉ. केतकर[1] म्हणतात, “ खिस्ती व मुसलमान हे आपणांस हिंदु म्हणवीत नाहींत. हिंदु ह्या नांवावर अधिकार स्थापित करणें हें ज्या त्या जातीच्या किंवा सांप्रदायाच्या इच्छेवर अवलंबून आहे.” अहिंदूंनीं जर आपणां स्वतःला ‘ हिंदू ’ म्हणून संबोधावयाचें ठरविलें असतें, तर त्यांच्या धार्मिक वा पारलौकिक सद्‌गतीच्या आड तें आलें असतें, असें वाटत नाहीं. कारण, केतकर[2] म्हणतात त्याप्रमाणें “ मत-मूलक भिन्नता किंवा उपास्यमूलक भिन्नता या गोष्टी हिंदूंच्या दृष्टीनें फारच कमी महत्त्वाच्या आहेत.”

गो. म. जोशी[3] म्हणतात कीं, हिंदूने जातीय आचार आणि नैतिक मूल्यें बरोबर पाळल्यास आध्यात्मिक बाबतींत तो शंकर, रामानुज, मध्व,

१ ज्ञानकोश, खंड १ ‘ हिंदुस्थान आणि जग ’ पृ. ९९

२ ज्ञानकोश खंड १ हिंदुस्थान आणि जग पृ. ९६

३ गो. म. जोशी : हिंदूंचें समाजरचनाशास्त्र. पृ. २०६

वल्लभ, येशूखिस्त, महंमद, बुद्ध, महावीर, मस्करी गोशाल किंवा झरदुष्ट्र यांपैकीं कोणाचाही अनुयायी असेल, तर तो हिंदु राहतो. तो वेदांचें तत्वज्ञान मानील, ॲरिस्टॉटलच्या ग्रंथाचें परिशीलन करील; सांख्याचा अनुयायी होईल, अगर डार्विनवर विश्वास ठेवील. त्याचें वैशेषिक तत्वज्ञान आवडतें असेल; तो तत्वज्ञानांत स्वतःस प्लेटो, थॉमस ॲक्विनास अगर आधुनिक कालांतील विल्हेम फुंट, ब्रॅडले, फुईली, गुया, नित्से, रुडोल्फ आयकेन अगर विल्यम जेम्स यांपैकीं कोणाचाही शिष्य मानून घेईल. परंतु आचाराचे बाबतींत जर समाजाचे नियम पाळील तर, तो हिंदूच राहील. अशा तऱ्हेचें आध्यात्मिक स्वातंत्र्य दुसऱ्या कोणत्या धर्मांत आहे तें कोणीही आम्हांस दाखवावें अशी सर्व पंडितांना सप्रश्रय प्रार्थना आहे. इतर धर्मांचें तसें नाहीं. ख्रिस्त्यांचा बायबलावर आणि मुसलमानांचा कुराणावर विश्वास असलाच पाहिजे."

याप्रमाणें हिंदुधर्मांत आध्यात्मिक स्वातंत्र्य आहे ही नुसती पुस्तकी गप्प नाहीं. भारताचार्य चिं. वि. वैद्य[1] म्हणतात, "एकाच राज्यांत किंवा एकाच शहरांत, किंबहुना एकाच कुटुंबांत देखील हिंदु, बौद्ध व जैन या धर्मांचे अनुयायी गुण्यागोविंदानें राहून धर्मांच्या गहन तत्त्वांवर अत्यंत सहनशीलतेनें वादविवाद करीत. त्यावेळीं असा चमत्कार पाहावयास सांपडे कीं, एकाच कुटुंबांत बाप शैव तर मुलगा बौद्ध असून, तोही पुढील आयुष्यांत मत पालटल्यास धर्मांतर करी; व हें धर्मांतर त्याच्या कौटुंबिक किंवा सामाजिक नात्याच्या आड येत नसें." "पिता[2] परम वैष्णव असेल तर मुलगा परम माहेश्वर असतो; व नातु भगवतीभक्त असतो तर पणतु आदित्य-उपासक होतो; पण त्यामुळें उपासकांमध्यें वैरभाव उत्पन्न होत असे असें मात्र नाहीं." तेव्हां हिंदु मनुष्य हा

---

१ चिं वि. वैद्य : मध्ययुगीन भारत पृ. १४५

२ चिं. वि. वैद्य : मध्ययुगीनभारत पृ. २८१ (भाग २)

आध्यात्मिक बाबतींत किती स्वातंत्र्य उपभोगतो हें दर्शविण्यासाठीं हिंदूंच्या सामाजिक, धार्मिक, नी सांस्कृतिक इतिहासावरील तज्ञ समजल्या जाणाऱ्या विद्वानांचीं मतें उद्धृत केलीं आहेत. असें स्वातंत्र्य जो समाज उपभोगतो तो समाज राष्ट्र आहे असें म्हटल्यास त्यांत धर्मनिष्ठेचा वास येण्यासारखें काय आहे? तसेंच बहुसंख्य असणें यांतही जातीयता काय आहे? आपणही हिंदूच आहोत असें मानण्यास नी म्हणण्यास कोणालाच बंदी नव्हती. तसें मानणें ज्या त्या जातीच्या इच्छेवर अवलंबून होतें. मुसलमान किंवा इतर अल्पसंख्य लोक हे केवळ परधर्मीय आहेत एवढ्या-मुळेंच हिंदूंना त्यांचेंविषयीं परकीय भाव वाटत नाहीं; तर ते परकीय संस्कृतीचे आग्रही बनतात, या कारणामुळें वाटतो.

मार्क्सवादाचे पुरस्कर्तें आणि हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री. राहुल सांकृत्यायन[१] हेही भारतांतील मुसलमानांच्या दृष्टिकोनाविषयीं म्हणतात, "भारतीयतेच्या बाबतींत येथील मुसलमानांचा सदैव द्वेष दिसून आलेला आहे, पण स्वतंत्र भारतांत आतां हें चालणार नाहीं. भारतीय संस्कृतीशीं एकरूप झाल्यावांचून कोणताही धर्म विकसित होऊं शकणार नाहीं. ख्रिश्चन, पारशी, बौद्ध आदि धर्मीयांचा भारतीयतेला विरोध नाहीं. तर मग इस्लामी संस्कृतीचाच कां असावा? हिंदुस्थानची चालरीत, साहित्य, इतिहास, वेशभूषा इत्यादि सर्व बाबतींत मुसलमानांनीं भारतीय संस्कृतीशीं एकरूप झालें पाहिजे." मुसलमानी वृत्तीविषयींचें हें मतप्रदर्शन राहूल सांकृत्यायनांसारख्या एका जाड्या विद्वान, तसेंच कम्युनिस्ट मताच्या माणसाकडून केलें गेले आहे. परंतु सांकृत्यायनांचें नांव वगळून तें मत नुसतेंच वाचलें तर, तें कोणातरी कट्टर हिंदुत्वनिष्ठाचें असावें असा सामान्यतः समज होईल, इतक्या प्रमाणांत त्यास हिंदुत्वनिष्ठेचा दर्प येत आहे. परंतु गेल्या हजार वर्षांच्या हिंदुस्थानच्या इतिहासाच्या निःपक्षपाती

१ केसरी : दि. ६ जानेवारी १९४८

अभ्यासकास ह्या मतास येण्यावांचून दुसरा मार्गच नाहीं. सांकृत्यायनांचें तरी निदान या बाबतींत असेंच झालें आहे. राहुलजींनीं वर म्हटल्या-प्रमाणेंच मुसलमानी वृत्ति असूनही, धर्मांधतेचा दोषारोप मात्र हिंदुत्व-निष्ठांवरच केला जातो. आणि एका बाजूस राष्ट्रवादाचा सांगोपांग अभ्यास नसल्यानें त्याविषयाचें आत्यंतिक अज्ञान, आणि दुसरीकडे भ्रांत हिंदीराष्ट्रवादाची मनावरील पकड ह्या चिमट्यांत सांपडल्यानें, हिंदुराष्ट्र-वाद हा धर्माधिष्ठित नसून, नी वस्तुतः तो न्याय्य राष्ट्रवाद असूनही, तथाकथित हिंदीराष्ट्रवाद्यांकडून त्याच्यावर धर्माधिष्ठिततेचा अध्यारोप केला जातो.

म्हणूनच हिंदु राष्ट्रवाद आणि हिंदू शासनसंस्था हीं धर्माधिष्ठित नाहींत हें सिद्ध करण्यासाठीं धर्माधिष्ठित शासनसंस्थेच्या इतिहासाचें अवलोकन करणेंही आवश्यक ठरतें. हिन्दू राजकीय इतिहासास धर्माधिष्ठित शासन-संस्थेची कल्पना सर्वस्वीं परकीय असल्यामुळें, या कल्पनेचा उगम जेथें प्रथम झाला तेंथील इतिहास अवलोकूं.

(४) निधर्मी शासनाच्या तत्त्वज्ञानाच्या निर्मितीचा इतिहास.

फिशर[१] म्हणतो, "रोमन साम्राज्याच्या शेष वैभवाची छाप आणि रोमन चर्चची अतिबलाढ्य शक्ति यांच्या खतपाण्यांतूनच मध्ययुगीन राज्यशास्त्रविचार अंकुरत होता......पोप हा धर्म आणि नीति यांचा भूतलावरील सर्वश्रेष्ठ संरक्षक होता. भौतिक जगतांत अंधाधुंदी आणि रणें माजलीं असतां, राजा आणि प्रजा या उभयतांनीं शांततेनें आणि न्यायानें वागावें, तसेंच खिश्चन धर्माच्या त्रिकालाबाधित सत्याची कास कधींही सोडूं नये असें सांगणारा पोप हा एकमेव उद्गाता होता......अनेक शतकांपासून जागतिक सांप्रदायाच्या पायावर जागतिक राज्य उभारण्याची

१ फिशर : हिस्टरी ऑफ् युरोप, पृ. ४३२–३४.

युरोपची मनीषा होती. परंतु युरोपच्या नित्यनैमित्तिक आवश्यकता आणि वरील मनीषा यांचा मेळ कधींच बसूं शकला नाहीं. किंबहुना त्या मनीषे-विषयीं पूज्यभावच नव्हता. पोपच्या आकांक्षा आणि राजांच्या इच्छा ह्यांत सतत छत्तीसचा आंकडा असे."

राष्ट्रकल्पनेच्या अभिनव कल्पनेसमवेत राज्यशास्त्र-विचारांतही दृश्य फरक पडूं लागला. फ्रान्समध्यें राज्यक्रांति होण्यापूर्वींहि अनेक वर्षांपासून पोपच्या आकांक्षांविरुद्ध अनेक राजांनीं बंडें पुकारिलीं होतीं. परंतु शासन-संस्था नि धर्मपीठ यांच्या विभक्तीकरणाचा विचार फ्रेंच राज्यक्रांतीपूर्वी कांहीं वर्षें, प्रथम रूसोनें आपल्या राज्यशास्त्रावरील प्रबंधांत प्रामुख्यानें मांडला. रूसो[1] म्हणतो, "आतां किंवा यापुढें कोणत्याहि राज्यांत कुठल्याहि प्रकारचा एकमेव राज्यपुरस्कृत धर्मसंप्रदाय असूं शकणार नाहीं. जे धर्म सहिष्णु आहेत, आणि ज्यांची धार्मिक मतें नागरिक-कर्तव्याच्या आड येणारें शिक्षण देत नाहींत त्यांच्याशीं सहिष्णुतेचें वर्तन असलें पाहिजे. परंतु चर्चवांचून मुक्तीच नाहीं असें धाष्ट्यीचें विधान करणाऱ्यास मात्र राज्यांतून सीमापार केला पाहिजे."

रुसोच्या तत्वज्ञानाचा फ्रेंच राज्यक्रांतिकारकांच्या मनावर परिणाम झाला होता. हेज्[2] म्हणतो, "राष्ट्रवाद आणि कॅथॉलिक संप्रदाय यांमध्यें फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुरवातीच्या काळांत संपूर्ण विरोध नव्हता. तात्विक दृष्ट्या नसला तरी, आवश्यकतेच्या दृष्टीनें कॅथॉलिक सांप्रदाय हा फ्रेंच राष्ट्रास उपयुक्त आहे ह्या विचारानेंच आद्यक्रांतिकारक कार्य करीत होते. फ्रेंच राष्ट्रीय सभेमध्यें Talleyrand आणि Abbé Siéyes यांसारखे धर्मोपदेशक प्रामुख्यानें भाग घेत. आणि राष्ट्रीय सभेनेंही कॅथॉलिक सांप्रदाया-

---

१ रूसो : सोशिअल् कॉन्ट्रॅक्ट, पृ. १२२

२ प्रो. हेज् : दि हिस्टॉरिकल इव्होल्युशन ऑफ मॉडर्न नॅशनॅलिझम्, पृ. ७१ ते ७३

वर उघडपणें हल्ले केले नाहींत. टॅलिरंड आणि ॲबेसाईज हीं पूर्णपणें राष्ट्रीय वृत्तीचीं माणसें होतीं. आणि फ्रान्समधील इतर संस्थांप्रमाणेंच चर्चनें पण राष्ट्रासाठींच कार्य केलें पाहिजे असेंच इतरांप्रमाणें त्याचेंही दृढ मत होतें. १७८९ मध्यें मिरांब्राच्या साह्यानें टॅलिरंडनें चर्चच्या मालकीची संपत्ति राष्ट्राच्या मालकीची असल्याचें ठरविणारा निर्बंध केला. व्यक्तिस्वातंत्र्याच्या नांवाखालीं राष्ट्रीय सभेनें सर्व धार्मिक संस्था बंद करून, धर्मोपदेशक नी धर्मोपदेशिका यांना आपल्या शपथेंतून मुक्त करण्याचा अधिकार सरकारी अधिकाऱ्यांना दिला. १७९० मध्यें 'सिव्हिल कॉन्स्टिटयूशन् ऑफ दि क्लर्जि' या नांवाचा निर्बंध झाला. आणि त्यायोगें एक संस्था ह्या दृष्टीनें फ्रान्समधील चर्चचें संपूर्णपणें राष्ट्रीयीकरण झालें. १७९० मध्यें राष्ट्रीय सभेनें ठरविलें कीं, कॅथॉलिक धर्मोपदेशकांनीं अशी शपथ वाहिली पाहिजे कीं, मी आपल्या ताब्यांतील प्रदेशामधील जनतेवर संपूर्ण लक्ष्य ठेवीन; निर्बंध, राजा नी राष्ट्र यांच्याशीं पूर्णतया एकनिष्ठ राहीन आणि राष्ट्रीय सभेनें ठरविलेल्या नी राजानें संमतिलेल्या घटनेस मी सर्व शक्ति एकवटून जिवंत ठेवीन. या निर्बंधास निष्ठावंत कॅथॉलिकांनीं मान तुकवूं नये असें पोपनें उद्‌घोषिलें. परिणामत: फ्रेंच कॅथॉलिकांमध्यें दोन तट पडले. एक राष्ट्रवादास निष्ठा वाहणारा तर दुसरा पोपला एकनिष्ठ राहणारा. यामुळें पारलौकिक सांप्रदायाशीं विरोधी असलेल्या जॅकोबिन गटानें, चर्च हें क्रांतिविरोधी नी परदेशीय स्वामित्वाखालीं आहे असें म्हणून त्यावर कडक उपाय योजावयाचें ठरविलें. यानंतर धर्मासंबंधीच्या जॅकोबिन विचारांचा प्रादुर्भाव झाला. प्रजासत्तेला, व्यक्तिस्वातंत्र्याला नी राष्ट्रीय सार्वभौमत्वाला विरोधी असा ख्रिश्चन संप्रदाय असल्यानें एकतर त्यावर बंदी घातली पाहिजे, अथवा त्याचा अधिकार व्यक्तिमात्रापुरताच मर्यादित केला पाहिजे. कॅथॉलिक चर्चच्या जागीं सामाजिक हिताच्या गोष्टी करणाऱ्या आणि धार्मिक निष्ठेचें स्थान म्हणून अविभाज्य अशा प्रजासत्ताक राष्ट्राची

स्थापना झाली पाहिजे. अन्य शब्दांत सांगावयाचें तर धर्माचें ऐहिकीकरण करून आंतरराष्ट्रीय आध्यात्मिक चर्चच्या आधिपत्याऐवजीं चर्चवरच ऐहिक राष्ट्रीय राज्याच्या आधिपत्याची स्थापना केली पाहिजे."

निधर्मी शासनसंस्था निर्माण होण्याची पूर्वपीठिका ही अशी आहे. पोप स्वतःस आध्यात्मिक नि भौतिक जगताचा नियंता समजत असे; आणि त्यामुळें आंतरराष्ट्रीय निष्ठेची अपेक्षा ठेवून तो तीवर फार भर देत असे. पण अशाप्रकारची निष्ठा राष्ट्रवादाच्या तत्त्वज्ञानास मूलतः विरोधी होती म्हणूनच आध्यात्मिक जगताबरोबरच भौतिक जगताचाही नियंता पोप असावा ह्या कल्पनेविरुद्ध राष्ट्रोद्भवाच्या काळीं बंड पुकारलें गेलें! ज्यावेळेस एखादा धर्म आंतरराष्ट्रीय निष्ठा शिकवीत असेल आणि असहिष्णु मनोवृत्ति वाढीस लावीत असेल त्यावेळेस, जागरूक राहून, शासनसंस्थेस धर्मापासून दूर ठेवणें योग्य आहे. युरोपमध्यें शासनसंस्था आणि धर्मपीठ यांनीं हातांत हात घालून अनेक शतकें फेरा धरला होता. धर्माच्या नांवाखालीं धर्मपीठानें युरोपमध्यें अत्यंत अत्याचार केले होते; आणि शासनसंस्थेनें ह्यास साह्य केलें होतें. अशा स्थितीत युरोपांतील मानवी प्रगति या धार्मिक अत्याचारामुळें कुंठित झाली होती. तिला गति मिळावी यासाठीं शासनसंस्था, शासनसंस्था आणि धर्मपीठ पृथक् होणें आवश्यक होतें; आणि म्हणूनच युरोपांतील प्रगतिप्रिय विचारवंतांनीं आणि राजकारणी पुरुषांनीं त्या दोहोंस पृथक् केलें. तेव्हां जो धर्म आंतरराष्ट्रीय निष्ठा अपेक्षित असेल किंवा जो असहिष्णु असेल त्यास राज्यांत स्थान असतां कामा नये, हें तर्कशुद्ध आहे. परंतु जो आंतरराष्ट्रीय निष्ठा शिकवीत नाहीं, आणि जो असहिष्णुही नाहीं अशा हिंदु धर्मास जो समाज 'मम' म्हणून म्हणतो त्याला ही पाश्चिमात्य विचारांची शिकवणूक आवश्यक आहे काय? आंतरराष्ट्रीय निष्ठा आणि असहिष्णुता हे दोन गुण हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू यांपैकीं कोणत्या धर्मामध्यें आहेत तें सांगितलेंच पाहिजे असें नाहीं.

'चर्चवांचून मुक्ति नाहीं,' असें म्हणणाऱ्यांस राज्याबाहेर हाकललें पाहिजे हें मत हिंदुस्थानांत कृतींत आणावयाचें ठरलें तर, पहिल्यांदा इंडियन युनियनमध्यें कोणावर पाळी येईल हें काय सांगायला हवें? आजही इतिहास मुक्त कंठानें तें सांगत आहेच!

वरील सर्व पुराव्यांचा नी चर्चेचा निष्कर्ष निघतो तो हा कीं, आज हजारों वर्षांपासून परकीय लोक हिंदुस्थानांतील समाजास 'हिंदु' म्हणून ओळखत आहेत. तसेंच हिंदुस्थानांतील हिंदूंत 'आम्हीं सगळे हिंदू' अशी एकत्वाची जाणीव प्रदीर्घ कालापासून आहे. ह्या हिंदुसमाजानें व्यापलेल्या भूभागाचें हिंदुस्थान हें नांवच तें स्थान कोणाचें आहे तें दर्शवितें. या सगळ्याचा तात्पर्यार्थ हाच कीं हिंदुस्थानांत हिंदू हेच राष्ट्र आहेत.

आतां हिंदु हेच हिंदुस्थानांत राष्ट्र होत असा सिद्धांत एकदां प्रस्थापित झाल्यानंतर, त्यावरून दुसरें अनुमान ओघानेंच निघतें कीं, या ठिकाणीं हिंदी, मुसलमान वा हिंद्वेतर कोणीही राष्ट्र असूं शकत नाहींत. तसेंच हिंदुसमाजांतील एकत्वाचें निदर्शक असें जें हिंदुत्व तेंच हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्व असून तें धर्माधिष्ठित मुळींच नाहीं.

(५) हिंदुत्वाची व्याप्ति

कांहीं लोक हिंदुत्व नि वैदिक संप्रदाय यांतील भेद नीट न समजल्या कारणानें असा प्रश्न उपस्थित करतात कीं शिख, जैन, बौद्ध हे सांप्रदायिक दृष्ट्या हिंदूंहून वेगळे असतांना त्यांचा अंतर्भाव हिंदुत्वांत कसा होतो? आणि जर वेगळे असूनही शिखादि समाजांचा अंतर्भाव हिंदुत्वांत होत असेल तर खिश्चन, मुसलमान यांचा अंतर्भाव मात्र कां होऊं नये?

याचें उत्तर असें : शिख, जैन, बौद्ध या संप्रदायांचा उद्भव हिंदुस्थानांत झाला तसा कांहीं खिस्ती, ज्यू, महंमदीय यांचा झाला नाहीं; तर तो परदेशांत झाला. आणि जशीं त्यांच्या उद्भवाचीं

स्थानें भिन्न आहेत, तशींच त्यांचीं कारणेंही भिन्न आहेत. शिख काय, बौद्ध काय हे सारे भारतोद्‌भूत संप्रदाय वैदिक संप्रदायाचे एका अर्थानें उपपंथच आहेत. त्यामुळें रूढि, संस्कृति, निर्बंध, भाषा, उपभाषा, ऐहिक वा पारमार्थिक विचारांची मूलस्थानें हीं सर्वच्या सर्व शीख, बौद्ध, जैन नि वैदिक यांना थोड्याफार प्रमाणांत समानच आहेत. उलट ख्रिस्ती, इस्लामी हे अ-भारतोद्भव असल्यानें त्या त्या धर्मांतील रूढि, परंपरा, संस्कृति आदि सर्व, ज्या ज्या स्थळीं त्यांचा प्रादुर्भाव झाला, त्या त्या स्थानांतुन उचललीं गेलीं आहेत. अशी धार्मिक विभिन्नता ही केवळ पारलौकिक गोष्टींविषयींच्या श्रद्धेपुरती मर्यादित न राहतां, ती रूढि, भाषा, संस्कृति यांमध्यें पण भिन्नता निर्माण करिते. उदाहरणार्थ, जेव्हां एकादा मनुष्य हिंदूचा मुसलमान होतो तेव्हां त्याची शंकरावरील श्रद्धा उडून ती महंमदावर जडते एवढेंच होत नाहीं, तर एका क्षणांत त्याच्याकडून रूढि, परंपरा, भाषा, आचारविचार, वेशभूषा इत्यादि सर्वच बदललें जाऊन तो एका समाजांतून दुसऱ्या समाजांत फेकला जातो. थोडक्यांत डॉ. श्री. व्यं. केतकर[१] म्हणतात त्याप्रमाणे "इस्लामी उपदेशाचे ते शिष्य न बनतां, विदेशी संस्कृतीचे आग्रही बनतात, त्यांचें स्वरूप विदेशी बनतें." वरील पहिल्या शीखादि गटांत सांप्रदायिक भिन्नता ही सामाजिक भिन्नता निर्माण करत नाहीं; उलट मुस्लीमादि गट हा धार्मिक भिन्नतेबरोबरच सामाजिक भिन्नताही निर्माण करतो; नि त्यामुळेंच हिंदुत्वांत पहिला गट जितक्या त्वरेनें अंतर्भूत होतो तितक्याच त्वरेनें दुसरा गट त्याच्याबाहेर फेकला जातो. बौद्ध, शिख हे, प्रचलित समजुतींप्रमाणें, (इतर) हिंदूंहून जितके दूर आहेत असें वाटतें तितके ते दूर नाहींत हें दाखविणारे पुढील उतारे मननीय वाटतील. बौद्ध संप्रदाय ह्या विषयावरील अधिकारी समजला गेलेला लेखक ऱ्हिस डेव्हिस[२] म्हणतो, "माझ्या

१ ज्ञानकोश : खंड १, पृ. ३६६

२ ऱ्हिस डेव्हिस; बुद्धिझम् : पृ. ८३-८४-८५

मतें वरील (त्यानें या वाक्यापूर्वी दिलेली) माहिती निदान एका अपसमजाचें निराकरण करील. तो अपसमज असा: 'बुद्ध हा हिंदुधर्माचा शत्रू असून, विश्वासघात, अत्याचार, नि असमानता यांनीं बुजबुजलेल्या समाजघटनेचा त्यानें नाश केला. त्याच्या ह्या कर्तृत्वाचें भारतीयांवर ऋण आहे.' पण वस्तुस्थिति तशी नाहीं. बुद्धाचा जन्म जसा हिंदु म्हणूनच झाला, तसाच त्याचा विकास झाला तोहि हिंदु म्हणूनच. थोडक्यांत तो हिंदु म्हणून जगला नि हिंदू म्हणूनच मृत्यु पावला......आणि तो जरी अत्यंत निष्ठावान बौद्धधर्मीय होता तरीही, त्याचा निर्देश बौद्ध सांप्रदायिक हिंदु असा करणें हेंच रास्त ठरेल. गौतमाच्या पारमार्थिक किंवा आध्यात्मिक विचारांमध्यें असें कांहीं एक नवीन नव्हतें, कीं जें जुन्या ह्या वा त्या दर्शनांत आढळणार नाहीं. त्याचीं नीतितत्वें प्राचीन अथवा पौराणिक ग्रंथांतूनच वेचलेलीं होतीं,.....पुरातन संप्रदायांतच बौद्ध संप्रदायाचा उद्भव झाला. हिंदुधर्म नीच नि आक्रमक आहे हें दर्शविण्याऐवजीं त्यानें नेमकें त्याच्या उलट सिद्ध केलें. बौद्धसांप्रदायांत कमनीय नी उदात्त असें ब़रेंच आहे याविषयीं कोणाचेंही दुमत नाहीं. आणि बौद्धधर्म तर हिंदुधर्माचेंच फळ होता. किंबहुना हिंदुधर्म हा बौद्धसांप्रदायाच्या पितृस्थानीं होता. पुरातन धर्माच्या चैतन्याचें आपण यथातथ्य उद्गाते आहोंत, असा बुद्धाचा स्वतःविषयीं समज असावा, आणि म्हणूनच त्याचेविषयीं असें निःसंशय म्हणतां येईल कीं, हिंदुसमाजांतील सर्वश्रेष्ठ, बुद्धिमंत नि गुणवंत असाच तो हिंदु होता."

आतां शिख समाज हा हिंदुत्वांत कसा अंतर्भूत होऊं शकतो या प्रश्नांचें उत्तर शिखांची हिंदुधर्माकडे पाहण्याची दृष्टि हा होय. सावरकरांनीं आपल्या 'हिंदुत्व' ग्रंथांत शिखांच्या धर्मगुरूंचीं वचनें उदधृत केलीं आहेत. गुरु तेगबहादुर म्हणतो, "उत्तर भनयो धर्म हम हिंदु." तर गुरु गोविंदसिंह म्हणतो "जगे धर्म हिंदु, सकल भंड भाजे." शिख संप्रदायावरील आपल्या

प्रबंधांत डॉ. गोकुळचंद नारंग[1] म्हणतात, "इस्लामी धर्मापासून शिख धर्मानें एकही तत्त्व स्वीकारलेलें नाहीं. हा सिद्धांत माझ्याप्रमाणेंच इतरही अनेक युरोपीय विद्वानांना मान्य आहे. त्यांच्यापैकीं ट्रंप म्हणतो, 'नानकानें हिंदु आणि मुसलमानांच्या ईश्वरविषयक कल्पनांचा समन्वय करण्याचा प्रयत्न केला होता हा समज अगदीं चूक आहे नानकाचीं सर्व मतें पाहतां तो सर्वस्वीं हिंदूच राहिला.' नारंग पुढें लिहितात, 'शिखधर्म हा इस्लामी तत्वज्ञानाचा जराही ऋणी नाहीं; किंबहुना तो हिंदुधर्माच्या विकासाचें अभिनव स्वरूपच होता आणि म्हणूनच शिख धर्म नी हिंदुधर्म यांचीं प्रमुख अंगें यांत बरेंच साम्य आहे." तेव्हां नेहरूंसारख्या[2] व्यक्तीनें 'शिख संप्रदाय हा हिंदुमुस्लिम ऐक्याचा प्रयत्न होता' असें जरी म्हटलें तरी शिखांना हिंदु नी मुसलमान यांत हिंदुविषयींच ममत्व वाटतें हें इतिहाससिद्ध आहे. आणि गतवर्षी पाकिस्थानांतून हिंदुस्थानांत शिखांनीं केलेल्या स्थानांतरानें तें अधिकच सिद्ध होतें.

सरतेशेवटीं हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, हिंदु निर्बंध हा शिख, जैन, ब्रह्मोसमाजी इत्यादि सर्वांना लागतो. उपरोक्त सर्व पुरावे बौद्धादि समाज हिंदु आहेत हें सिद्ध करण्यास समर्थ आहेत.

अशारीतीनें आपण हिंदुत्वाच्या कक्षेंत कोण येऊं शकतो नी कोण नाहीं, याचा विचार करून ह्या निर्णयास आलों कीं, हिंदुत्वाच्या कक्षेंत बौद्ध, जैन, शिख इत्यादि जसे येतात तसे मुसलमान, ख्रिश्चन, पारशी हे कांहीं येऊं शकत नाहींत. ही गोष्ट सिद्ध होत असूनही कांहीं लोक अजूनही अशी सूचना करतात कीं, हिंदूंनी 'हिंदु' ह्या अभिधानाच्या व्याख्येचा निकष 'निवासभूमि' एवढाच काय तो कल्पून मुसल-

---

१ डॉ. गोकुळचंद नारंगः ट्रान्सफॉर्मेशन ऑफ सिखिझम : ॲपेन्डिक्स, २; पृ. १२, १६

२ नेहरुः ग्लिंप्सिस् ऑफ् वर्ल्ड् हिस्टरि, पृ. ३२०

मानादींना हिंदु या नांवानेंच कां संबोधूं नये? ह्या प्रश्नाचें उत्तर देण्यापूर्वी सावरकरांच्या[1] 'हिंदुत्व' ह्या ग्रंथांतील जो एक उतारा उद्धृत करणें आवश्यक आहे तो असा: "हिंदु ह्या शब्दाचा मूळ अर्थ, त्याच्याच अर्थाचा दुसरा शब्द जो 'हिंदी' त्याप्रमाणें, केवळ 'हिंदुस्थानांत राहणारा एवढाच जर केला गेला, आणि तेवढ्यावरून हिंदुस्थानांत राहणाऱ्या एखाद्या मुसलमानालाही जर आपण हिंदू म्हणूं लागलो तर, शब्दांच्या चालचलाऊ व्यावहारिक अर्थांची आपण इतकी ओढाताण केल्यासारखी होईल कीं, आम्हांला त्यांच्या अर्थाचा अनर्थ केला जाईल अशी राहून राहून भीति वाटते. **कदाचित् पुढें मागें हिंदु म्हणजे हिंदुस्थानचा केवळ नागरिक आणि अन्य कोणीही नाहीं, अशा प्रकारची गोष्ट घडून येणारच नाहीं असें नाहीं.** परंतु तो दिवस तेव्हांच उगवेल कीं जेव्हां आक्रमक आणि स्वार्थी अशा प्रभुत्ववृत्तीचे हात बळकट करणारे जातीय आणि सांस्कृतिक दुरभिमान गळून जातील, आणि सारे धर्म हे जेव्हां आपला संकुचितपणा सोडून देऊन विश्वाच्या बुडाशीं असलेल्या सनातन तत्त्वांच्या विचारांचें सर्वांचें असें एक जागतिक पीठ निर्माण करतील! आणि हें सारें मानवकुटुंब एकाच शासनाखालीं वैभवानें नांदावयास पाहिजे असेल तर असल्याच प्रकारच्या भेदाभेदशून्य भक्कम पायाची आवश्यकता आहे. परंतु इतक्या सोत्कण्ठ आतुरतेनें अपेक्षिलेल्या त्या परमोच्च विकासाचा एकही किरण अद्याप जोपर्यंत क्षितिजावरसुद्धां दिसत नाहीं तोंपर्यंत कठोर सत्य परिस्थितीकडे डोळेझांक करणें मूर्खपणाचें ठरेल."

हा उतारा सावरकरांनीं १९२५ मध्यें लिहिलेल्या 'हिंदुत्व' ह्या ग्रंथांतील आहे. ह्यांत हिंदुस्थानांत राहणाऱ्या मुसलमान, ख्रिश्चन इत्यादि जमाती अतिदूरच्या भविष्यांत एक दिवस हिंदु ठरूं शकतील असें

---

१ हिंदुत्व: पृ. ८०

सावरकरांनीं निःसंदिग्ध शब्दांत सूचित केलें आहे. असें जर आहे, तर मग आज त्यांना हिंदु म्हणून कां संबोधावयाचें नाहीं? कारण एकच. डॉ. केतकर म्हणतात त्याप्रमाणें, हे लोक हिंदुस्थानांत राहात असूनही विदेशी संस्कृतीचे अभिमानी आहेत म्हणूनच त्यांना हिंदु म्हणणें अशक्य ठरतें. मुसलमानापुरतें याचे परिणाम काय झाले हें सर्वश्रुत आहेच.

हिंदुत्वांत खिस्ती नि इतर परधर्मीयांचाही समावेश व्हावा असें प्रतिपादन असलेला हिंदुत्वावरील एक लेख खिस्ती पुढारी **देवदत्त नारायण टिळक**[1] यांनीं लिहिला आहे. त्यांत खिस्ती समाजाची स्थिति कशी चमत्कारिक झाली आहे याचें चित्रण करून ते म्हणतात, "तरीहि मुसलमान समाजांतील पुढाऱ्यांच्या चढेल वृत्तीमुळें त्यांच्याबरोबरीनें खिस्ती लोकही केवळ परधर्मीय म्हणून द्वेष्य बनले. सोरटी सोमनाथा-पासून पंजाबपर्यंत मुसलमानांनीं जीं स्मृतिचिन्हें उभारून ठेविलीं आहेत, तीं जोंपर्यंत पुढें आहेत तोंपर्यंत त्यांच्याबद्दल (मुसलमानांबद्दल) प्रेम वाटूं द्या असें सांगणें हें मानवी स्वभावाविरुद्ध आहे. अशा परिस्थितींत सावरकरांनीं त्यांना नि त्यांच्याबरोबर खिस्ती लोकांना दूर लोटण्याचा प्रयत्न केला तर त्यांत त्यांना कितपत दोष देतां येईल?"

रे. टिळक यांच्या ह्या उताऱ्यासह हिंदुत्व ग्रंथांतील वर प्रथम दिलेला उतारा वाचला असतां, 'हिंदुस्थानचा रहिवासी तो हिंदु' अशी हिंदूची व्याख्या घडविणारा मंगलदिन जवळच्या भविष्यांत शक्य आहे कीं काय, याचा उलगडा होईल. हिंदी-राष्ट्रवादाच्या परामर्षांत असें म्हटलें आहे कीं, हिंदचा रहिवासी तो हिंदी ही कल्पना हिंदुस्थान अखंड असतांना यशस्वी झाली असती तर फार चांगलें झालें असतें. सावरकरांनीं म्हटल्याप्रमाणें तोच हिंदी नागरिक, भिन्न सांस्कृतिक अभिमान गळून गेल्यामुळें, हिंदूही ठरला असता. परंतु आपण अल्पसंख्य आहोंत अशी

१ तरुण भारत : विशेषांक (पंचम वर्षारंभांक) १९४८

जाणीव नी समजूत झाल्यामुळें मुसलमानांकडून हिंदी-राष्ट्रनिर्मितीस सतत विरोध झाला. हा विरोध कांहीं मर्यादित काळापावेतोंच झाला असता तरी तें समजण्यासारखें होतें. परंतु विरोधाची ही धांव शेवटीं हिंदुस्थानचे खंड करण्यापावेतों गेली. या विभंजनाचें दायित्व भारतांतून फुटून पाकिस्तान ह्या नवोद्भूत राष्ट्रांत सामावलेल्या मुसलमानांपुरतेंच मर्यादित नसून, अखंड हिंदुस्थानांतील सर्वच मुस्लिम जमातीवर आहे. कारण हिंदुस्थानांतील बहुतेक मुसलमानांनीं पाकिस्तानची जनयित्री ठरलेल्या मुस्लिमलीगला पूर्ण पाठिंबा दिलेला आहे. अशारीतीनें हिंदुस्थानच्या विच्छेदनाचें दायित्व ज्यांच्या शिरावर आहे ते, त्यांच्या ह्या दायित्वामुळें आणि त्यांस वाटत असलेल्या भिन्न संस्कृतीच्या नि धर्मांच्या अभिमानामुळें, हिंदुत्वांत समाविष्ट होऊं शकत नाहींत म्हणून लगेच हिंदुत्व हें जातीय ठरणें कसें शक्य आहे ?

येथवर आपण हिंदुराष्ट्रवादाचें समालोचन केलें. एक धर्म, एक परंपरा, एक इतिहास, एक भाषा, एक निर्बंध (कायदा), समान विचार नि समान संस्कृति या नि इतर अनेक ऐक्यसाधक घटकांमुळें हिंदु हेच हिंदुस्थानांत राष्ट्र आहेत हें सावरकरबंधु नि गोळवेलकर यांनीं आपल्या ग्रंथांत सविस्तर मांडलें आहेच. आम्हीं मात्र, प्रदीर्घ कालापासून, हिंदू लोकांत 'आम्ही सर्व हिंदू' अशी एकत्वाची राष्ट्रनिर्माती जाणीव अविच्छिन्न-पणें कशी होती नि आजही कशी आहे हें दाखविलें आहे. आणि यावरून-ही हिंदुस्थानांत हिंदु हेच राष्ट्र ठरतात नि त्यांचें एकत्व-दर्शक हिंदुत्व हेंच हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ठरतें.

प्रकरण ५ वें.

मार्क्सवाद आणि बोल्शेव्हिक रशिया

☆

हिंदुस्थानांत हिंदू हेच राष्ट्र आहेत हा सिद्धांत, येथवर केलेल्या विवेचनावरून, अनुमान नी प्रत्यक्ष ह्या तर्कशास्त्रांतील प्रमाणांच्या कसोटीस कसा उतरतो हें आपण पाहिलें. परंतु जगांतील यच्चयावत् राजकीय विचार ज्याच्या झंझावातामुळें उधळले गेल्यासारखे आज दिसत आहेत, त्या मार्क्सवादाचा ज्या रशियामध्यें जीवनाचें तत्त्वज्ञान म्हणून स्वीकार झाला आहे तेथील चालू परिस्थितीचा परामर्ष घेणें हें ह्या प्रबंधास परिपूर्णता आणण्याचें दृष्टीनें इष्ट ठरेल. कारण हिंदु राष्ट्रवाद हा जातीयवाद असून, त्याच्या उत्थापनानें मानवी प्रगतीचीं पावलें थबकतील, अशी जी भीति बऱ्याच मोठ्या प्रमाणांत व्यक्तविली जाते तिच्या प्रसाराचें दायित्व, बव्हंशीं मार्क्सवाद्यांवर, आणि पूर्णांशानें मार्क्सवादी नसले तरी ज्यांची स्फूर्ति-देवता मार्क्स आहे अशा इतरांवरही आहे. ही भीति यथार्थ कशी नाहीं हें समजण्यासाठीं मार्क्सवादाचा राष्ट्रवादाकडे पहाण्याचा दृष्टीकोन आणि रशियांतील सद्यःस्थिति यांचें अवलोकन करूं.

ज्याचें तत्त्वज्ञान रशियानें 'जीवनाचें तत्त्वज्ञान' म्हणून स्वीकारलें आहे त्या मार्क्सच्या[1] विचारांप्रमाणें "आजपावेतों अस्तित्वांत असलेल्या समाजांचा इतिहास हा वर्गयुद्धाचाच इतिहास आहे."

"स्वतंत्र मानव[2] आणि दास, रोमन सरदार आणि रोममधील

१, २ मार्क्स सिलेक्टेड् वर्क्सः कम्युनिस्ट मॅनिफेस्टो, पृ. ११०, १११.

सामान्य लोक, जमिनदार आणि भूदास, सहकारी संस्थेचा सभासद आणि रोजकामदार, थोडक्यांत म्हणजे पिळणारे आणि पिळले जाणारे हे सतत विरोधी भूमिकेंत असत. कांहीं वेळां उघड उघड, तर कांहीं वेळां गुप्तपणें, परंतु सातत्यानें हें वर्गयुद्ध चालू राहिलें. प्रत्येक वेळीं या युद्धाचा शेवट एक तर क्रांतिकारक नवसमाजाच्या निर्मितींत होई, किंवा ' युद्धाय कृतनिश्चय ' असलेल्या दोन्हीही पक्षांच्या नाशांतही होई.

इतिहासाच्या प्राचीन युगांत जवळ जवळ प्रत्येक ठिकाणीं आपणांस समाजाची रचना संमिश्र अशी अनेक थरांत झालेली आढळते. आणि सामाजिक श्रेणींचा क्रमही अनेक प्रकारचा असे. प्राचीन रोममध्यें आपणांस कुलीन सरदार, दरकदार, सामान्य जनता आणि दास असा समाजाच्या स्थितीचा क्रम आढळतो. मध्ययुगांत जमिनदार नी त्याचें कुळ, सहकारी संस्थेचा भागिदार नी रोज कामदार, सेवक, भूदास असा क्रम दिसतो. आणि पुन: या वर्गांमध्येंही आणखी गौण वर्गवारी असतेच."

" आधुनिक[१] बुझ्वा समाजाचा उद्भव हा जमिनदारी पद्धतीच्या समाजाच्या नाशांतूनच झालेला आहे. या समाजानें वर्गविग्रह नष्ट केले नाहींत. उलट त्यानें जुन्याऐवजीं नवीन वर्ग, गरीब जनतेस पिळण्याचे नवीन प्रकार आणि कलहाच्या अभिनव पद्धति स्थापित केल्या आहेत.

" आपल्या सध्यांच्या युगास 'बुझ्वा युग' असें नामाभिधान देतां येईल. ह्या युगाचें एक स्वतंत्र वैशिष्ट्य आहे. या युगानें वर्गविग्रहाचा मार्ग सुकर केला आहे. समाजाच्या एकतेंत भेद पडून, त्यांत दोन मोठे विरोधी वर्ग निर्माण झाले आहेत. शत्रुत्वाच्या भावनेनें एकमेकांसमोर उभे टाकलेले हे वर्ग म्हणजे बुझ्वा आणि कामकरी होत."

---

१ मॅनिफेस्टोः पृ. १११

"यापूर्वींच्या[1] वर्गयुद्धांत प्रबळ ठरलेल्या वर्गांनीं आपल्या स्वतःच्या धननिर्मितीच्या पद्धतीनें सर्व समाजास बद्ध करून आपापलें बूड स्थिर करण्याचा प्रयत्न केला. कामकरी वर्गास समाजाच्या उत्पादनाच्या साधनांवर स्वामित्व मिळविण्यासाठीं पूर्वींच्या धननिर्मितीच्या पद्धतीचें उन्मूलन करावें लागतें; आणि इतरही सर्व जुनाट पद्धतींचा नाश करावा लागतो. कामकरी वर्गाला आपलें आसन स्थिर करण्याची आवश्यकताच नसते. व्यक्तिगत धनांच्या सर्व तारणांचा नाश करणें हें कामगाराचें जीवन-ध्येय असतें.

"पूर्वकालीन सर्व ऐतिहासिक चळवळी ह्या अल्पसंख्यांकांच्या होत्या अथवा त्यांचा हेतु अल्पसंख्यांकांचें हितरक्षण करणें हा होता. परंतु कामकरी चळवळ ही स्वतःच्या कार्याची जाणीव असलेली, स्वतंत्र, आणि बहुजन समाजाच्या हितार्थ चालविलेली चळवळ आहे. प्रचलित समाजरचनेंतील अगदीं शेवटच्या थराशीं असलेल्या कामकरी वर्गाचा उद्धार त्याच्या डोक्यावर असलेल्या अधिकारी समाजाच्या उच्छेदनांतच आहे."

"कम्युनिस्टांचें[2] तत्त्वज्ञान अवघ्या एका वाक्यांत ग्रथित करावयाचें म्हटलें तर, 'व्यक्तिगत संपदेचा नाश' असेंच करावें लागेल."

"प्रत्येक[3] चळवळींत कम्युनिस्ट लोक संपत्तीचा प्रश्न इतका प्रामुख्यानें पुढें मांडतात कीं, त्यावेळीं त्या प्रश्नानें तीव्र स्वरुप धारण केलें आहे कीं नाहीं इकडे त्यांचें लक्षही नसतें.

व्यक्तिगत संपदेचा नाश करणें हें कामकरी क्रांतीचें ध्येय आहे. आणि म्हणूनच मार्क्स[2] म्हणतो, "सर्व देशांतील कामगारांनो, संघटित व्हा. कम्युनिस्ट क्रांतीच्या जाणिवेनें सत्ताधारी वर्गास कांपरें भरूं द्या. या

१, २, ३ मॅनिफेस्टो : पृ. १२१, १२३, १४२

क्रांतीनें कामगारांच्या बेड्यांव्यतिरिक्त दुसरें त्यांचें कांहींएक जाणार नाहीं. उलट त्यांना जग जिंकावयाला मिळणार आहे."

मार्क्सच्या 'कम्युनिस्ट मॅनिफेस्टोंतील' हे वरील सर्व उतारे राष्ट्रवादाविषयींचा मार्क्सवादी दृष्टिकोन समजण्यासाठीं उद्धृत केले आहेत. मार्क्सवाद समजण्यासाठीं संपूर्ण मॅनिफेस्टो वाचणें आवश्यक आहेच. परंतु ह्या ठिकाणीं तो संपूर्ण उद्धृत करणें शक्य नाहीं, नी आवश्यकही नाहीं. मार्क्सवादाचा ऐतिहासिक दृष्टिकोन थोडक्यांत असा सांगता येईल : सर्व मानवी इतिहास वर्गयुद्धावर आधारलेला असून, मानवी समाजांत वर्ग पडण्याचें कारण, खाजगी संपदेचें अस्तित्व नि त्यास कायद्यानें प्राप्त झालेलें अबाध्यत्व हें होय. खाजगी संपदेच्या हक्कावर उभारलेली निरनिराळ्या देशांतील भिन्न भिन्न समाजरचना, ही शेवटीं बहुजनसमाजाचें शोषणच करिते; आणि त्यामुळें वैयक्तिक विकासाची योग्य संधि बहुजनसमाजास कधींही लाभत नाहीं. यामुळेंच, बहुजन समाजास आपल्या विकासासाठीं, निरुपायानें, चालू समाजरचनेचा विध्वंस करावा लागतो. अर्थात् हें घडवून आणण्यासाठीं, जगांतील सर्व कामगारांचें ऐक्य आवश्यक असतें. भिन्न देशांतील कामगारांमध्यें 'अभिनव समाजरचनेंतील भागिदारी' हेंच सर्वश्रेष्ठ असें एकतादर्शक चिन्ह आहे. आणि म्हणूनच कामगारांस स्वदेशांतील शोषण करणाऱ्या स्वजनांहून परकीय कामगारांविषयीं अधिक ममत्व वाटलें पाहिजे. यासाठींच मार्क्स[1] आपल्या मॅनिफेस्टोंत म्हणतो, 'देश नि राष्ट्रीयत्व यांचा नाश करण्याची इच्छा कम्युनिस्ट बाळगतो, असें कम्युनिस्टांना दूषण दिलें जातें. परंतु कामगारांना देशच नाही. तेव्हां कामगारांपाशीं मुळांतच जें नाहीं तें हिरावलें कसें जाणार ?"

कामगार क्रांतींतूनच अभिनव समाजाची निर्मिती होणार असल्यानें,

---

१ मॅनिफेस्टो : पृ. १२७–२८

'जगांतील सर्व कामगारांनो, एक व्हा' असा संदेश मॅनिफेस्टोमध्यें देण्यांत आला आहे. कामगार क्रांतीपूर्वीच्या सर्व क्रांत्या अल्पसंख्यकृत असून, त्यांत केवळ अल्पसंख्यांकांच्या हितरक्षणाची दृष्टि असे; आणि तें हितरक्षण नीट होईल अशीच ती समाजरचना असे. अशा समाजरचनेंतील समाज-स्थैर्याचे दुवे हें त्या समाजांतील मोठ्या भागाचें शोषणच करीत असत. त्यासाठींच कामगारांच्या क्रांतिपूर्व समाजांतील सामाजिक स्थैर्याच्या दुव्यांचा संपूर्ण नाश करणें अभिनव समाजाच्या निर्मितीस आवश्यक आहे. समाजस्थैर्याचा एक मोठा दुवा जी शासन-संस्था (State) तिच्याविषयीं एंजल्स[१] लिहितो, "शासनसंस्था ही समाजावर बाहेरून लादण्यांत आलेली शक्ति नाहीं. तसेंच, हेगेल प्रतिपादितो त्याप्रमाणें, नैतिक मूल्यांचें ती सत्यस्वरूपही नाहीं. परंतु सामाजिक विकासाच्या एका टप्प्याचें तें फळ आहे. शासन-संस्थेचें अस्तित्व जी गोष्ट सिद्ध करते ती ही कीं, सांप्रतच्या समाजांत गुंतागुंत आणि विसंवाद निर्माण झालेला आहे. तसेंच समाजांत विरोध उद्भवल्यानें समाजाच्या एकतेस तड गेली असून ती सांधली जाणें अशक्य नि समाजाच्या शक्तीच्या बाहेरचें आहे. परंतु ह्या हित-भिन्नता असलेल्या वर्गांनीं स्वतःसह समाजास निरर्थक झगड्यांत होरपळून टाकूं नये नि वर्गविग्रहाची तीव्रता मर्यादित राहावी आणि तो विग्रह शांततेच्या कक्षेबाहेर जाऊं नये यासाठींच समाजापासून वरकरणीं निराळी असलेली दंडशक्ति आवश्यक झाली. समाजाच्या गर्भांत निर्माण झालेली, परंतु समाजापेक्षां स्वतःस वरचढ समजणारी आणि समाजापासून पृथक होणारी दंडशक्ति म्हणजे शासन-संस्था होय."

"वर्गविग्रहास[२] कक्षेंत ठेवण्यासाठींच शासनसंस्था निघाली असल्यानें, आणि तीहि विग्रहाच्या काळांतच निघाल्यानें, ती वर्गविग्रहांत बलवान ठरलेल्या अशा केवळ संपत्तिमान वर्गांचीच प्रतिनिधी झाली.

१, २ स्टेट ॲंड् रेव्होल्युशनः पृ. १४४, १४८

शासनसंस्थेच्या जोरावर तो वर्ग राजकीय दृष्ट्याही प्रबल ठरला; आणि यामुळेंच त्यास पिळल्या जाणाऱ्या वर्गास बंधनांत ठेवण्याचें नि त्याचें शोषण करण्याचे नवीन मार्ग उपलब्ध झाले.

"आधुनिक काळांतील प्रातिनिधिक शासनसंस्था ही भांडवल-वाल्यांच्या हातांतील बाहुलें असून कामगार वर्गाचें शोषण करण्यासाठींच तिचा उपयोग होतो."

"म्हणूनच[1] शासन संस्थेचें अस्तित्व अनादिकालीन नाहीं. असेही समाज होते कीं ज्यांना शासनसंस्थेची मुळीं आवश्यकताच भासली नाहीं. किंबहुना त्यांना शासनसंस्थेची अथवा राजदंडाची कल्पनाच सुचली नाहीं. आर्थिक विकासाच्या एका टप्यामध्यें समाजांत वर्गभेद निर्माण झाले. आणि या वर्गभेदांमुळें शासनसंस्थेची आवश्यकता निर्माण झाली. आज अर्थ-निर्मितीच्या विकासाच्या एका अशा टप्प्याजवळ आपण त्वरेनें पोहोंचत आहोंत कीं, यावेळीं भिन्न वर्गांची आवश्यकता नुसती नाहींशींच झाली नसून त्यांचें अस्तित्व अर्थ-निर्मितीस व्यत्ययरूप होत आहे. पूर्वीं हे वर्ग जितक्या अपरिहार्यतेनें निर्माण झाले, तसेच ते नष्ट होतील, आणि त्यांच्यासह शासनसंस्था सुद्धां अपरिहार्यतेनें नष्ट होईल".

वरील विचारांचा सारांश असा : समाजांतील वर्गविग्रह नामशेष करण्यासाठीं बहुसंख्य असलेल्या कामगारांनीं कामगार-क्रांतीला सिद्ध झालें पाहिजे. ही क्रांति, पूर्वींच्या समाजस्थैर्याच्या सर्व दुव्यांचा म्हणजे राज्ययंत्र, सैन्य, कारागृह, इत्यादि अल्पसंख्यांकांच्या हातांतील बहुसंख्यां-कांचें शोषण करण्याच्या सर्व साधनांचा नाश करील. मार्क्सवादीय सिद्धांताप्रमाणें ही सामाजिक क्रांति केवळ कामगारांच्या ऐक्यानेंच

---

१ स्टेट ॲंड् रेव्होल्युशन : पृ. १५०

शक्य होते. आणि म्हणूनच जगांतील सर्व कामगारांनीं संघटित झालें पाहिजे असा आदेश कम्युनिस्ट मॅनिफेस्टोंत दिलेला आहे.

याचाच अर्थ मार्क्सवाद आणि राष्ट्रवाद यांचा विरोध अटळ आहे. मार्क्सवादामध्यें वर्गावर पूर्ण भर असतो, तर राष्ट्रवादांत वर्गविग्रहाला स्थान नसून राष्ट्र या मानवसमूहास अधिक महत्त्व असतें.

रॉयल इन्स्टिटयूट ऑफ् इंटरनॅशनल ॲफेअर्स ह्या संस्थेनें प्रकाशिलेल्या 'नॅशनॅलिझम्' या ग्रंथांत (पृ ३११) प्रस्तुत विषयासंबंधीं असें म्हटलें आहे कीं, "मार्क्सच्या राष्ट्रीय शासनसंस्थेविषयींच्या तत्त्वज्ञानांतच मार्क्सवाद आणि राष्ट्रवाद यांतील अटळ विरोधाचें मूळ आहे. मार्क्सच्या मतें शासनसंस्था म्हणजे अधिराज्य, निर्बंध, समाजाचे सामाजिक नीतिनियम, हे सर्व सामाजिक विकासाच्या प्रत्येक टप्प्यांतील वर्गवर्चस्वाची साधनें आहेत. आणि त्यांतही, आधुनिक काळीं, भांडवलदार वर्ग ह्या साधनांनींच आपलें कामगारांवरील वर्चस्व चिरकाल टिकविण्याचा प्रयत्न करितो. म्हणूनच अशा प्रकारची शासनसंस्था, प्रसंगीं सशस्त्र क्रांतीनें सुद्धां, उलथून टाकण्याचें कामगारांचें ध्येय असलें पाहिजे. एकाच शासनसंस्थेच्या कक्षेंतील कामगार वर्ग हा इतर देशांतल्या कामगारांच्या साहाय्यावांचून अशी कामगारक्रांति घडविण्याइतका शक्तिमान नसतो. यासाठीं कामगारांनी आंतरराष्ट्रीय संघटना उभी करूनच बुझ्वांस उलथून टाकलें पाहिजे. कम्युनिस्ट मॅनिफेस्टोतील शेवटचे शब्द "सर्व देशांतील कामगारांनो एक व्हा" असेच आहेत. मार्क्सच्या मताप्रमाणें, एका देशांतील कामगारांचें त्याच देशांतील बुझ्वांशीं जितकें हितसाम्य असतें त्यापेक्षां शतपट अधिक हितसाम्य दुसऱ्या देशांतील कामगारांशीं असतें. स्वदेशांतील बुझ्वांकडून कामगारांना अधिकाधिक प्राप्ति होते केवळ बेड्यांचीच! खरा सामाजिक गट हा राष्ट्रीय शासनसंस्था नसून वर्ग हाच असतो. आणि अशा वर्गास

राष्ट्रीय मर्यादा नसते. **शुद्ध मार्क्सवाद हा मूलतः आंतरराष्ट्रीय असून तो राष्ट्रीयत्वाविरुद्ध असतो."**

इथवर राष्ट्रीयत्वाविषयींचा मार्क्सवादी दृष्टिकोन समजण्यासाठीं मार्क्स आणि एंजल्स यांच्या विचारांचा थोडक्यांत परामर्ष घेतला. यापुढें मार्क्सवाद हा जीवनाचें अधिकृत तत्त्वज्ञान म्हणून रशियानें स्वीकारला असल्यानें तेथील प्रचलित परिस्थितीचें अवलोकन करूं. परंतु हें करीत असतांना शुद्ध मार्क्सवादाचा राष्ट्रीयत्वाशीं मूलतः विरोध आहे, हें मात्र विसरून चालावयाचें नाहीं.

रशियांत १९१७ मध्यें मार्क्सवादी क्रांतिकारकांनीं कामगार क्रांति केली. परंतु त्यांची जागतिक कामगारक्रांतीची अपेक्षा मात्र फलद्रूप झाली नाहीं. किंबहुना, पुढें पुढें तर, सोव्हिएट रशियाच्या बाहेरील परिस्थितीच उलट बदलूं लागली. यासंबंधी रॉयल् इनस्टियूटच्या 'नॅशनॅलिझम्' या ग्रंथांत म्हटलें आहे कीं, '१९१८ च्या एप्रिलमध्यें लेनिननें आपल्या अनुयायांना शिकविलें कीं, जोपर्यंत सोव्हिएट रशिया एकाकी आहे तोंपर्यंत ही क्रांति टिकविण्याचें कार्य आपणांस करावयाचें आहे. हें कार्य आपणांस इतर देशांत क्रांत्या होईपर्यंत, अथवा इतर देशांतील कामकरी संघटना आपल्या सहाय्यास येईपावेतों चालूं ठेवलेंच पाहिजें. कारण, ही क्रांति जरी दुबळी नी लहानशी असली तरी समाजवादाचा ती एकमेव दुर्ग आहे. जागतिक क्रांति करण्यासाठीं सोव्हिएट युनिअनच्या भूमिचाच काय तो उपयोग होईल असें, १९२५ पर्यंत, जवळ जवळ संपूर्णपणें मानण्यांत येत असे. परंतु सोव्हिएट युनिअनबाहेरील परिस्थिति हलकें हलकें पालटूं लागली, आणि त्याचा परिणाम नवीन सोव्हिएट राष्ट्रवाद निर्माण होण्यांत झाला."

रशियाच्या बदललेल्या धोरणाविषयीं फ्लॉरिन्स्कि म्हणतो, 'राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद ह्या विवाद्य प्रश्नाचा निर्णय लागून त्यांत राष्ट्-

वादाचा विजय झाला; आणि त्याच्याच पायावर राष्ट्रीय आणि परराष्ट्रीय धोरणें आखलीं जाऊं लागलीं.'

रशियाच्या नवराज्यांतील मानवाविषयीं बोलतांना गॉर्कीनें १९२७ मध्यें म्हटलें होतें कीं, 'अभिनव शासनसंस्थेचा निर्माता असा हा नूतन रशियन मानव माझ्या जीवनाचा आनंद आणि अभिमानाचें स्थान आहे. अशा प्रकृतीचा मानव भूतलावर यापूर्वी कधींही निर्माण झाला नव्हता.'

परदेशांतून रशियांत येणाऱ्यांविषयीं वॉरकेनॉव् यानें आपल्या 'दि कम्युनिस्ट इंटरनॅशनल' या ग्रंथांत १९३८ मध्यें लिहिलें कीं, 'परकीय आणि आश्रयार्थी कम्युनिस्ट मॉस्कोस 'लाल मक्का' समजून त्याकडे खेचले जात. परतु आतां निराशेच्या पोटीं त्यांच्या ध्यानांत आलें कीं, 'कॉमिन्टर्न'चाही उपयोग संपूर्णपणें रशियन परराष्ट्रीय धोरणाचें साधन म्हणून करण्यांत येऊं लागला आहे.'

अशाच प्रकारचा आक्षेप युगोस्लोव्हियानें रशिया आणि 'कॉमिनफार्म'वर केला आहे. परंतु हे आक्षेप खोटे आहेत असें बोल्शेव्हिक नेत्यांकडून सांगण्यांत येतें. युगोस्लॉव्हियाची सध्यां कशी परिस्थिति झाली आहे हें प्रसिद्धच आहे. ह्याच बाबत वर्थ[1] नांवाच्या लेखकाचा 'नो कलोनियल् एक्स्प्लॉइटेशन् बाय दी क्रेमलिन्' हा लेख फार मननीय आहे. बोल्शेव्हिक रशियावर त्या लेखानें लहानसा, पण नवीन, प्रकाशकिरण पडतो.

देशभक्ति, पितृभूमि यांसारख्या आतांपावेतों प्रतिगामी म्हणून तिरस्कृत समजल्या गेलेल्या शब्दांनींच आतां वर्तमानपत्रांचे स्तंभ भरले जाऊं लागले. पूर्वीच्या शूर रशियन राष्ट्र पुरुषांच्या चित्रांशेजारींच क्रांतिकारक समाजवादी नेत्यांचीं चित्रें ठेवण्यांत येऊं लागलीं. सरतेशेवटीं

१ संडे न्यूज् ऑफ् इंडिया : ९ ऑक्टो. १९४९

१९३९ मध्यें लाल सैन्याच्या शपथेंत एक दर्शनीय पालट झाला. पूर्वी सोव्हिएट सैनिक हा आपल्या कार्यास नि विचारांस कामगारांच्या मुक्तीच्या उदात्त ध्येयासाठीं अर्पण करीत असे; आणि लोकबंधुत्वासाठीं तसेंच सोव्हिएट युनिअन नि समाजवाद यांसाठीं आपण युद्धास सिद्ध असल्याची प्रतिज्ञा करीत असे. परंतु आतां स्वजनांची, स्वदेशाची आणि कामगार नि शेतकरी यांच्या शासनसंस्थेची सेवा जिवंत जीव असेपर्यंत करण्याची तो शपथ घेऊं लागला.

विचार व्यक्तविण्याच्या सर्व साधनांमध्यें रशियन घटकांस बलवान् करून त्यांची प्रतिष्ठा वाढविण्याचे प्रयत्न सध्यां सोव्हिएट युनिअनमधील राजकीय नी बौद्धिक विकासांत दिसतात हा एक दर्शनीय विशेष होय. रशियन भाषेचें महत्त्व वाढविण्यासाठीं फार मोठे प्रयत्न करण्यांत आले असून, तिचा सोव्हिएट युनिअनची राजभाषा नि समाजवादी संस्कृतीची आंतरराष्ट्रीय भाषा म्हणून स्वीकार करण्यांत आला आहे. युक्रेन, व्हाइट रशिया, आर्मेनिया या आणि यांसारख्या इतर राष्ट्रीय प्रजासत्ताकांतील प्राथमिक नी माध्यमिक शाळांमध्यें रशियन भाषेंतून शिक्षण देण्याचें आज्ञांकित झालें आहे. हें वाचतांना हेंही ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे कीं, एप्रिल २९, १९१७ च्या कम्युनिस्ट पार्टीच्या[१] ठरावाप्रमाणें अशा प्रकारची राजभाषा नष्ट केली पाहिजे अशी मागणी करण्यांत आली होती.

युक्रेन नी इतर सोव्हिएट प्रजासत्ताकांतील मोठ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या जागेवरून पदच्युत करण्यांत आलें आहे. तसें करण्याचें कारण भिन्न नी आक्रमक राष्ट्रवादाच्या प्रदर्शनास आळा घातला जावा हेंच होय. युनियनमधील लोकांच्या लिपीचें लॅटिनीकरण करणारी जी संस्था आज बरींच वर्षें अस्तित्वांत होती, ती वर्ष १९३७ मध्यें विसर्जित करण्यांत आली. त्याचप्रमाणें ज्या लोकांनीं दहा वर्षांपूर्वी लॅटिन लिपीचा

---

१ लेनिनः सि. वर्क्स; खंड २, पृ. ५३

अंगीकार केला होता, त्यांना तिचा त्याग करून पुन्हां रशियन लिपीचा अंगीकार करावा लागला आहे. राज्यक्रांतीनंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत, रशियन भाषेनें लॅटिन लिपीचा अंगिकार करावा अशी जी चर्चा चालत असे, ती आतां कोठेंही ऐकूं येत नाहीं. टर्कमेनिस्थान किंवा आर्मेनिया-सारख्या सोव्हिएटमधील इतर प्रजासत्ताक गटांमध्यें १९२८पूर्वीं रशियन वर्तमानपत्रें मुळींच नव्हतीं. पण आतां मात्र तीं बऱ्याच प्रमाणांत प्रसिद्ध होत असून त्यांची संख्याही वाढती आहे.

राष्ट्रीय महाकाव्य हें राष्ट्रीय भावनेस उत्कट करण्याचें कार्य पौराणिक कालाप्रमाणें आजही करीत आहे. रशियन लोकगीतांत 'बोगाट्री' नांवाचे कल्पित नायक आहेत. पूर्वीं रंगभूमीवर त्यांच्यावर टीकास्त्रें धरण्यांत आलीं होतीं. १९३६ मध्यें 'रशियन व्यक्तिमत्त्वांतील शौर्याचीं निदर्शक चिन्हें' म्हणून त्यांचें समर्थन झालें. ज्या नाटकांतून ती टीका होती, तीं नाटकें बंद करण्यांत आलीं. रशियाच्या राष्ट्रीय बुद्धिवैभवाचा पौराणिक वाङ्मय हा पुरावा आहे, असें आज सोव्हिएट युनिअनमध्यें मानण्यांत येत आहे. क्रांतीच्या सुरवातीच्या काळांत वाङ्मयाचे मार्क्सवादी टीकाकार हे पुष्कीनला केवळ सरंजामदारी लोकांचा वैचारिक नेता समजत, आणि त्याचा बौद्धिक वारसा सद्यःस्थितींत अव्यवहार्य असल्याचें ते मानीत. याच कवीचा शतसांवत्सरिक स्मृतिदिन, १९३७मध्यें, सरकारी सूचनेनुसार अखिल सोव्हिएट युनिअनमध्यें, प्रचंड प्रमाणावर साजरा केला गेला.

रशियाच्या भूतकालाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांतही विशेषेंकरून मूलभूत पालट झालेला दिसतो. राज्यक्रांतिकारक चळवळी सोडल्यास बाकीचा सर्व भूतकाळ काळाकुट्ट असल्याचें चित्रण रशियन इतिहासकारां-कडून झालेलें आहे. इतिहासशास्त्राच्या शाखेंत, रशियाच्या राज्यक्रांती-पासून पुढें पंधरा वर्षें, पोक्रोव्हस्की नांवाचा मार्क्सिस्ट हा एक भयप्रद असा हुकूमशहा होता. वर्ष १९३२ मध्यें तो मृत्यु पावला. 'आपल्या

युगांतील असामान्य पंडित,' 'जुन्या नेतृत्वाचा प्रथम श्रेणीचा प्रतिनिधी' असा पोक्रोव्हस्कीच्या मृत्यूनंतर सरकारकडून आणि पक्षाकडून त्याचा गौरव करण्यांत आला. त्यानें १९२० च्या सुमारास लिहिलेल्या 'ब्रिफ् हिस्टरी ऑफ् रशिया' ह्या पुस्तकाचें उत्साहानें स्वागत झालें. लेनिनकडून नुसतें स्वागतच केलें गेलें नाहीं तर, त्याच्या सुचनेवरून बऱ्याच भिन्नभिन्न भाषांतून त्याचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं. परंतु आतांपावेतों प्रमुख समजल्या गेलेल्या पोक्राव्हस्कीच्या वैचारिक शाखेवर १९३६पासून मान-हानीचा प्रसंग आला असून त्याच्या मतांचा पुरस्कार हा दंडनीय अपराध ठरला आहे. लेनिनचा हा पूर्व-आश्रित आणि त्याचे अनुयायी हे अनैतिहासिक नि काल्पनिक समाजशास्त्रीय सिद्धांतांच्या साह्यानें सत्य ऐतिहासिक घटनांवर असत्याचा मुलामा चढविणारे आहेत, आणि ते आंतरराष्ट्रीय डाव्या गटांतील असून रशियन इतिहासांतील राष्ट्रीय हेतूंचा परामर्ष कधींच घेत नाहींत, असे त्यांच्यावर आरोप आहेत. रशियाच्या भूतकालाविषयीं लेनिनइतकाच पोक्रोव्हस्कीसही तिटकारा होता. रशियन राष्ट्रीय चिन्हांप्रमाणें, रशियाचा इतिहास हा त्याच्या मतें प्रतिक्रांतीचा पर्याय होता. सोव्हिएट युनिअननें राष्ट्रवादाची कांस धरतांक्षणींच इतिहासाच्या अशा प्रकारच्या भाष्यांचा त्याग केला गेला हें स्वाभाविक आहे.

१९३७ मध्यें सर्व सोव्हिएट शाळांसाठीं इतिहासाचें पाठ्यपुस्तक म्हणून लावण्यांत आलेलें आणि पारितोषिकार्ह ठरलेलें सेस्टाकोव्हचें पुस्तक 'आमचें स्वदेशावर प्रेम आहे आणि म्हणूनच त्याच्या अद्भुत इति-हासाचें ज्ञान आम्हांस असलेंच पाहिजे' या ध्येयानें लिहिलेलें आहे. आतां ऐतिहासिक घटनांकडे केवळ 'वर्गविग्रहाच्या' दृष्टिकोनांतून पहा-ण्याचें सोव्हिएट इतिहासकारांनीं सोडून दिलें आहे. ज्या कांहीं घटनांचा विचार निराळ्या दृष्टीकोनांतून करण्यांत येत आहे त्यांचीं 'राष्ट्र, राष्ट्रीय झगडे, राष्ट्रीय इच्छा नि राष्ट्रीय आकांक्षा इत्यादि उदाहरणें होत.

ऐतिहासिक घडणींतील सातत्यावर आतां फारच भर देण्यांत येत आहे. १९३८ मध्यें 'दि ग्रेट रशियन पीपल' नांवाची एक लहानशी पुस्तिका कम्युनिस्ट यूथ लीगचे वतीनें प्रसिद्ध करण्यांत आली आहे. त्या पुस्तिकेंत आपणांस पुढील विधानें आढळतात : 'महान रशियन लोकांचा इतिहास म्हणजे अनेक शत्रु, विजेते नी आगांतुक या सर्वांविरुद्ध पुकारलेल्या आणि मुक्ति नी स्वातंत्र्य यांसाठीं झुंजलेल्या युद्धाचा इतिहास आहे. ह्या रशियन भूतकालाच्या यशोगानासाठीं पक्षाच्या नी राज्याच्या भाषणें, वर्तमान पत्रें, रेडियो, प्रदर्शनें नी चित्रपट इत्यादि प्रचारयंत्राचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जात आहे. कीव्हच्या राजपुत्रांच्या नेतृत्वाखालील कॉन्स्टँटिनोपलवरील रशियन सैन्याची स्वारी आणि रशियन लोकांनीं ट्युटॉनिक सरदारांशीं तसेंच मध्ययुगांत टार्टर लोकांशीं केलेलें शौर्याचें युद्ध, सप्तवार्षिक युद्धांत बर्लिनचा रशियन सैन्याकडून झालेला पाडाव आणि सुरोव्हावच्या इटलींतील स्वाऱ्या, या सर्वांचें यशोगान होत आहे.

रशियाच्या राष्ट्रीय विकासावर टार्टर जमातीच्या स्पष्ट पडलेल्या पगड्याविषयींची पूर्वींचीं मतें आतां अमान्य करण्यांत येत आहेत. सतराव्या शतकांत पोलंडविरुद्ध बंड करणारे कोझा मिनीन आणि पोझार्स्की यांसारखे प्रतिक्रांतिकारक हे सोव्हिएटमध्यें आतां नवीन महतपद पावले आहेत. १८१२ मधील नेपोलियनच्या स्वारीविषयीं नवीन इतिहासांत पुढील मत आढळतें—'महान जेत्याचा महान् राष्ट्राशीं संघर्ष झाला आणि त्या संघर्षांत तो पराभूत झाला.' देशभक्तीचा विकास व्हावा यासाठीं वरील विधानाकडे विशेष लक्ष पुरविण्यांत येतें. पूर्वी सोव्हिएट इतिहासशास्त्र महायुद्धाचें खापर झारच्या डोक्यावर फोडीत असे. पण आतां ती समजूत चुकीची समजून त्याज्य ठरविण्यांत आली आहे.

रशियन नेत्यांच्या दृष्टिकोनांत किती अंतर पडलें आहे याविषयींचा परामर्ष घेतांना मॉरिस हिंडस[1] म्हणतो कीं, 'आपल्या मताच्या समर्थनार्थ तिनें भिंतीवरील चित्राकडे अंगुलिनिर्देश केला. १८१२ मध्यें नेपोलियनचा पराभव करणाऱ्या कुटुझाव सेनापतीचें तें चित्र होतें. त्याखालीं तांबड्या भडक अक्षरांत स्टॅलिनचें एक वाक्य होतें——

'आपल्या महान पूर्वजांची दैदीप्यमान स्मृति या युद्धांत तुम्हांस स्फूर्तिदायक ठरो.' स्टॅलिननें निर्देश केलेल्या महान् पूर्वजांचीं नांवें त्याच्या ७ नोव्हेंबर १९४१ च्या भाषणांत आढळतात तीं अशीं : अलेक्झांडर नेव्हेस्की, डिमिट्री डोनस्काय्, कुझमा मिनिन, डिमिट्री पोझार्स्की, अलेक्झांडर सुव्होझाव, मिखाइल कुटुझाव. यांपैकीं एकहीजण कामगार वा शेतकरी नाहीं. कुझ्मा मिनिन वगळल्यास इतर सर्व राजपुत्र होते. आणि कुझ्मा मिनिन व्यापारी होता. ह्या शूर पुरुषांनीं रशियन सेनेस विजयाप्रत नेलें, आणि रशियाच्या इतिहासांतील अत्यंत बिकट काळीं परकीयांच्या विजयापासून नि परकीय दास्यापासून रशियास मुक्त ठेविलें.

रशियन दृष्टिकोनाचा परामर्ष घेतांना मॉरिस हिंडस 'रशिया गोज् रशियन' ह्या प्रकरणांत (पृ. ९८) म्हणतो कीं, ग्रॉझ्नी या गावीं दोन लहानशीं पुस्तकें मी विकत घेतलीं. त्यांपैकीं एक व्ही पेन्हाव नामक लेखकाचें 'पीटर दि फर्स्ट' या नांवाचें होतें. ह्या पुस्तकांतील पहिल्या दोन पानांवर पुढील शब्दप्रयोग मला आढळले 'ज्यांत थोर रशियन जनतेच्या आत्मशक्तीचें केंद्रिकरण झालें आहे अशा महान् रशियन देशभक्तांच्या पथकांत......शक्तिशाली रशियन लोकांत......पीटरच्या नेतृत्वाखालील रशिया.......रशियन लोकांस अभिमानास्पद अशी सेना पीटरनें निर्माण केली. आधुनिक रशियन सैन्य हें तिचेंच फळ होय.'

१ मॉरिस हिंडस : मदर रशिया, पृ. ९३

पीटरवर उधळलेल्या या स्तुतिसुमनांमध्यें **रशिया नि रशियन** या शब्दांवरच संपूर्ण भर दिलेला होता.

प्रवदा हें रशियन कम्युनिस्ट पार्टीचें मुखपत्र आहे. त्या मुखपत्राच्या ३० सप्टेंबर १९४२ च्या संपादकीयांत 'दि रशियन रायफल' यावर अग्रलेख आहे. त्यांत तो म्हणतो, 'जर्मन आक्रमकांसमोरच्या चालू युद्धाच्या या प्रसंगीहि रशियन बंदूक पूर्वीप्रमाणेंच शत्रूच्या गोटांत मृत्यूचें तांडव नृत्य करीत आहे. आणि त्यामुळें फॅसिस्ट गलितगात्र झाले आहेत. रशियन बंदूक नि रशियन बायोनेट हीं भयानक युद्धांची साधनें आहेत... तितकींच तीं विश्वासू मित्रही आहेत. प्रवदासारख्या मुखपत्राकडून रशियन बंदूक नि बायोनेट यांना स्वसामर्थ्य आणि वैभव यांनीं युक्त करण्यांत आलें आहे.

रशियाच्या पुनर्मूल्यमापनांत आणि त्यास गौरवाप्रत नेण्यासाठीं रशियन वाङ्मयांतील थोर लेखकांच्या नांवांस आवाहन केलें जात आहे. पुष्कीन, गोगोल, लरमान्‌टॉव्ह, नेक्रासॉव्ह, डोस्टोव्हस्की, टॉलस्टॉय, टर्‌जेनेव्ह, गॉर्की आणि शेकाव्ह, हे ते लेखक होत. त्यांनीं रशियासाठीं अश्रु ढाळले असून दुःखही भोगलें आहे. त्यांच्यासाठींच त्यांनीं आशा नि प्रेमालाप केले. आजच्या रशियन लोकांस याची जाणीव असली पाहिजे, ज्ञान असलें पाहिजें. या हुंकारांचे प्रतिध्वनि त्यांच्याकडूनच आले पाहिजेत.' (हिंडस : पृ. १००)

रशियाविषयीं निकोले टिकोनॉव्ह[१] म्हणतो, 'आमचा आनंद, आमचें स्वातंत्र्य, आमचा भूतकाळ नि भविष्यकाळ, आमचा आत्मा नि आमचें हृदय हीं सर्व कांहीं रशियाच आहे. रशिया पूर्वी होता, आज आहे नि पुढेंही राहील. त्याचें जीवन म्हणजे आमचें जीवन. रशियन जनता अमर आहे आणि म्हणूनच रशियाही अमर आहे.'

१ हिंडस : पृ. १०१

मॉरिस् हिंडस[1] म्हणतो की, कॉमसोमॉलच्या सेंट्रल कमिटीच्या सुंदर नि तरूण कार्यवाहिकेस मी प्रश्न केला कीं, कोणत्या प्रकृतीचा मानव निर्माण करण्याचें तुमच्या संस्थेचें ध्येय आहे?' तिनें उत्तर केलें 'आमचे तरूण प्रथम देशभक्त असले पाहिजेत. त्यांचें आपल्या देशांवर नि जनतेवर प्रेम असावेंच. पूर्वीच्या सर्व चांगल्या कार्याविषयीं नि सोव्हिएटच्या नेतृत्वाखालीं पुढें होणाऱ्या सर्व कार्यांविषयीं त्यांना प्रेम वाटलें पाहिजे अशी आमची मनीषा आहे. स्वदेशभक्ति हा जीवनाचा मुख्य पाया असून तो अत्यंत कल्याणप्रद असाच आहे. उपरोक्त गुणांवाचून कोणाही मनुष्यास समाजामध्यें स्थान नाहीं.' बॉरिस गॉरबाटॉव्ह[2] नांवाचा प्रथितयश साहित्यिक 'लेटर्स् टु ए कॉमरेड' मध्यें लिहितो, 'पितृभूमि! किती दिव्य शब्द आहे! एकवीस दशलक्ष किलोमिटर भूमीचा आणि वीस कोटी स्वजनांचा समावेश या एका शब्दांत होतो.'

इलीआ इरेनबर्गच्या इतकें रशियन नवचैतन्याचें मनोहर चित्रण करण्याचें दुसऱ्या कोणाही रशियन लेखकास साधलेलें नाहीं. सैनिकांस उद्देशून लिहिलेल्या एका उत्तेजक पत्रांत इलिआ[3] म्हणतो, 'सुकुमार अशी टानया आणि सेव्हास्टोपलचे कणखर नावाडी तुमच्यासह प्रचलन करीत आहेत. रशियन भूमीस देशत्व देणारे तुमचे पूर्वज—ज्यांमध्यें प्रिन्स इगॉरचे सरदार नी डिमिट्रीचें सैन्य आहे—हे तुमच्यासह प्रचलन करीत आहेत. १८९२ मध्यें अजिंक्य ठरलेल्या अशा नेपोलियनला पराभूत करणारे सैनिक तुमच्यासह प्रचलन करीत आहेत. बुंडेनीचे सैनिक आणि शेपायेव्हचे अनवाणी भुकेलेले आणि जगज्जेते स्वयंसेवकही तुमच्यासह प्रचलन करीत आहेत. तुमची माता, तुमची पत्नी, तुमची बालकें तुमच्यासह प्रचलन करीत आहेत; आशीर्वाद देत आहेत. तुमच्या मातेसाठीं शांततेचें उत्तरायुष्य निर्मिण्याचें भाग्य तुम्हांस लाभेल; तुमच्या

१, २, ३ हिंडस. पृ. १०१, १०२, १०२

पत्नीस तुम्ही पुनर्मीलनाचें सौख्य द्याल; आणि मुलांसाठीं आनंदाचा पाऊस पाडाल. सैनिक हो! तुमच्यासह स्वतः रशियाच प्रचलन करीत आहे. तो तुमच्या शेजारींच आहे. त्याच्या पदन्यासाकडे कान द्या. लढाईच्या ऐन धामधुमींत तो सुखद शब्दानें तुम्हांस उल्हसित करील. तुमच्या मनाची चलबिचल झाली, तर तुम्हांस धीर देईल. तुम्ही विजयाप्रत गेलात तर त्याच्या आलिंगनाचें भाग्य ही तुम्हांस लाभेल'.

बोरोडीन नांवाच्या लेखकानें 'डिमिट्री डोनस्काय' या नांवाची एक कादंबरी १९४१ मध्यें प्रसिद्ध केली. हिंडस म्हणतो कीं, 'मी आतां-पावेतों वाचलेल्या अभिप्रायांमध्यें अत्यंत मोठा अभिप्राय प्रवदानें ह्या पुस्तकावर लिहिला. प्रवदा हें रशियाचें एकमुखी आणि आत्यंतिक राजकीय पत्र आहे. 'रशियन लोकांच्या एका महान् पूर्वजावरील पुस्तक या शीर्षकाखालीं तो अभिप्राय लिहिण्यांत आला होता.' (पृ. ९४)

असो. मॉरिस हिंडसच्या पुस्तकांतील कांहीं महत्वाचे उतारे वर उद्धृत केले आहेत. उपरोक्त तसेंच ह्या प्रकरणांतील इतर उताऱ्यांवरून असें निश्चित दिसतें कीं, रशिया व रशियनत्व या दोन गोष्टींवर सोव्हिएट युनिअनमध्यें सध्यां फार भर देण्यांत येत आहे. पण शुद्ध मार्क्सवादाशीं नि क्रांतीनंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांतील विचारसरणीशीं हें विरोधात्मक वाटल्यानें या गोष्टींचा मार्क्सवादाशीं कसा समन्वय होतो असा प्रश्न मॉरिस हिंडसनें एका निष्ठावान् बोल्शेव्हिकास विचारला. त्यानें उत्तर दिलें, 'सोव्हिएट निर्माण होऊन पंचवीस वर्षें झालीं आहेत हें आतां विसरू नका. आम्हीं सज्ञान झालों आहोंत. तेव्हां आम्हीं लहान असतांना आमच्या हातून झालेल्या गोष्टी आतां उगीच उकरून काढीत बसण्यांत काय अर्थ आहे!' (पृ. ९१)

राष्ट्रीयत्वाची भावना अधिक चैतन्ययुक्त होण्यासाठीं सध्यां जे अनेक मार्ग उपयोगांत आणिले जातात त्यांपैकीं चित्रपट हा एक आहे. ह्या-

विषयीं जोसेफ डेव्हिस[1] लिहितो, 'रशियन राष्ट्रवादाच्या उत्थानासाठीं हे बोल्शेव्हिक लोक जुन्या ऐतिहासिक व्यक्तींचा त्याचप्रमाणें राजघराण्याचा उपयोग करीत आहेत हें आश्चर्यकारक वाटतें.'

स्वयंनिर्णयाविषयीं बोलतांना उठल्यासुटल्या रशियाचें उदाहरण दिलें जातें. परंतु त्याविषयीं थोडासा अपसमज आहे. रशियांत स्वयं-निर्णयाचा अधिकार आहे; पण त्याचा उपयोग मात्र करितां येत नाहीं. याविषयीं हर्टस् म्हणतो,' "सर जॉन मेयनार्ड नांवाचे सोव्हिएट रशिया-वरील तज्ज्ञ तसेंच सोव्हिएटविषयीं सहानभूति असलेले गृहस्थ पूर्ण अभ्यासांतीं अशा निर्णयास आले कीं, 'रशियांतील राज्यकारभाराची पद्धति आत्यंतिक एकमुखी अशी आहे. फेडरेशनमधील प्रत्येक घटकास राज्यघटनेनें खरी सत्ता जवळ जवळ दिलेलीच नाहीं.' राज्यघटनेनें दिलेला स्वयंनिर्णयाचा अधिकार हा केवळ कागदावरच आहे. सोव्हिएट संयुक्त संस्थानांतील एखाद्या घटकानें स्वातंत्र्य प्रकट केलें, अथवा कम्युनिस्ट पार्टीच्या आदेशाविरुद्ध किंवा बोल्शेव्हिक कल्पनांच्या विरुद्ध जर निर्बंध करण्याचा प्रयत्न केला, तर असा प्रयत्न कडकपणें दाबून टाकण्यांत येईल." (पृ. १९४)

जीवनाचें तत्त्वज्ञान म्हणून मार्क्सवादाचा रशियानें स्वीकार केला आहे याचा अर्थ पूर्वीच्या सर्व जीवनपद्धतींचें निर्मूलन रशियांत झालेलें असावें असें गृहीत धरावें लागतें. परंतु परराष्ट्रीय धोरणाविषयीं लिहितांना सम्नर वेल्स[2] म्हणतो, 'सोव्हिएट रशियाच्या पुरस्कर्त्यांनीं कितीही नाकारलें तरी, एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, गेल्या पंधरा वर्षांच्या सोव्हिएट शासनांत युरोपांतील इतर राष्ट्रांबाबत आणि तसेंच जागतिक धोरणा संबंधीची रशियाची भूमिका नि कार्यपद्धती यांचें गेल्या दोनशें वर्षांतील रशियन सरकारच्या भूमिकेशीं नि कार्यपद्धतीशीं उघड साम्य आहे.'

येथपावेतों रशियांतील प्रचलित परिस्थितीचा परामर्ष रशियावरील

---

१ मिशन टु मॉस्को : पृ. १५३ २ टाइम फॉर डिसिशन् : पृ. २४०

तज्ज्ञ समजल्या गेलेल्या लेखकांच्या मतांच्या साह्यानें आपण घेतला. प्रथम मार्क्सवादाची राष्ट्रवादाकडे पहाण्याची दृष्टि समजण्यासाठीं म्हणून त्या तत्वज्ञानावरील प्रमुख ग्रंथांतील उताऱ्यांवरून मार्क्सवादाची रूपरेषा दिली; आणि नंतर रशियांतील प्रचलित परिस्थितीचें अवलोकन केलें. त्यांवरून असें स्पष्टपणें दिसतें कीं, मार्क्सवादाचा राष्ट्रीयत्वाविषयींचा दृष्टिकोन सध्यांच्या बोल्शेव्हिक नेत्यांनीं सोडून दिला असून, उलट आज सर्व साधनांनी ते रशियन राष्ट्रवादाचा प्रचार करीत आहेत. त्याबरोबरच हेंही ध्यानांत ठेवणें आवश्यक आहे कीं, या प्रकरणाचा हेतु रशियानें मार्क्सवादाचा संपूर्ण त्याग केला आहे, हें दाखविण्याचा जराही नाहीं; तर त्यानें सध्यां स्वीकारलेल्या राष्ट्रवादाच्या भूमिकेपुरतेंच हें विवेचन आहे. मॉरिस हिंडसच्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे "सोव्हिएट युनिअननें नवीन आर्थिक नि सामाजिक घडी निर्माण करितांना रशिया आणि इतर देशांतील आजपावेतोंच्या सर्व ज्ञात पद्धतींचा पूर्ण त्याग केला आहे. परंतु आतां ह्या नवीन घडीचा भूतकाळांतील व्यक्तींशीं नि घटनांशीं, स्वप्नांशीं नि कार्यांशीं, दुःखांशीं नि विजयांशीं संगम झालेला आहे. आतां भूतकाळ हा व्यत्ययरूप अथवा भयस्वप्न उरलेला नाहीं. ऑक्टोबरपासून इतिहासास आरंभ झाला, असें आतां कोणी म्हणणार नाहीं. रशियास ज्ञात असलेल्या ऐक्यबंधनांत भर पडावी, आणि त्यानें निर्मिलेलें जें जें म्हणून फलदायक आहे त्याचा शुद्ध स्वीकार करितां यावा या हेतूनें ऑक्टोबर-क्रांतीनें भूतकाळाशीं खंड पाडला, ही गोष्ट रशियांतील लहान मुलें सुद्धां आतां जाणतात." (हिंडस : पृ. ९७)

हिन्दुराष्ट्रवादावर जातीयत्वाचा नि प्रतिगामित्वाचा आरोप करण्यापूर्वीं रशियांतील सद्यःस्थितीची अल्प माहिती आरोप करणाऱ्यास असावी या हेतूनेंच कायतो ह्या प्रकरणाचा प्रपंच केला आहे.

———

उपसंहार

☆

राष्ट्र अथवा राष्ट्रीयत्व ह्या विषयावर, सामान्य माणसास सहज समजेल असें वाङ्मय, आज मितीस, मराठी भाषेंत तरी फारसें उपलब्ध नाहीं. किंबहुना या विषयाचा व्यापक प्रमाणांत व्हावा तसा सखोल अभ्यासच झालेला दिसत नाहीं. तसा तो होता तर, राष्ट्रीयत्वाविषयीं आपल्या मनांत येणाऱ्या शंका कदाचित् उद्भवल्याही नसत्या. अलिकडे वर्तमानपत्रांतून हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाविषयीं जी वारंवार चर्चा केलेली आपण पहातों तींत निधर्मी शासन, लोकशाही, स्वयंनिर्णय, राष्ट्रीय-मुसलमान, या नि अशाच इतर संज्ञांचा फार प्रचार झालेला आहे. या संज्ञांचा मूलभूत अभ्यास करून, आणि त्यांचा उपयोग पाश्चिमात्य देशांत सापेक्ष होतो कीं निरपेक्ष होतो हें पाहून, मग जर आपण हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व निश्चित करण्याचा प्रयत्न करूं लागलों तर, शेवटीं ज्यास आपण ' हें हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व ' असें संबोधूं तें दुसरें तिसरें कांहीं नसून ' हिंदुत्व'च आहे असेंच आपल्या प्रत्ययास येतें.

हिंदुस्थानच्या भूभागावर हिंदु समाज बहुसंख्य आहे. त्याच्या परंपरेचा, वाङ्मयाचा, शिल्पाचा नि तत्त्वज्ञानाचा, तसेंच त्याच्या भिन्न भिन्न सांप्रदायांचा—थोडक्यांत म्हणजे त्या हिंदु समाजाच्या हजारों वर्षांच्या ऐहिक आणि पारमार्थिक जीवनाचा ठसा ह्या भूमीवर उमटलेला आहे. प्रत्येक हिंदु अंत:करण जन्मतःच ह्या ठशानें अंकित झालेलें असतें; आणि त्यामुळें आसेतु हिमाचल पसरलेला हा हिंदु समाज एका सूक्ष्म परंतु अनुभाव्य अशा ऐक्य-बंधानें संबद्ध झालेला आढळतो. सूक्ष्म असूनही अनुभाव्य असणारा असा हा ऐक्य-बंध म्हणजेच हिंदुत्व होय.

हिंदू समाजांतील एकत्व-दर्शक असें हें हिंदुत्व आज एकाएकीं शापित कां व्हावें तें समजत नाहीं. हिंदुत्वाच्या बहिष्कृतीचा हा खटाटोप ज्या हिंदीराष्ट्रवादासाठीं—अर्थात् त्यानें मूळ धरून वाढीस लागावें यासाठीं—आहे, त्या हिंदी राष्ट्रवादाचा परामर्ष आपण मागें घेतलाच असून त्याचें वैयर्थ्यही पाहिलें आहे. 'आधुनिक अर्थानें खरा राष्ट्रवाद' असें ज्याचें वर्णन नेहरू करितात त्या राष्ट्रवादाचा प्रभाव केवळ एक विशिष्ट गट नि पुस्तकें यांपलीकडे कधींच पडलेला नाहीं, ही सत्य घटना आहे. कारण तत्वज्ञान, इतिहास नी परंपरा यांचा वारसा हिंदीराष्ट्रवादास नाहीं. भारतीय विद्वान लेखक नि वक्ते जेव्हां जेव्हां इंडियन फिलॉसॉफि, इंडियन हिस्टरी, इंडियन लिटरेचर, असे शब्द-प्रयोग करितात, तेव्हां तेव्हां त्यांच्या मनांत 'इंडियन' याचा अभिप्रेत अर्थ 'हिंदु' हाच असतो, हें आपण विसरून चालणार नाहीं. इंग्रजींतून शिक्षण झाल्यानें, नि इंग्रजींतूनच विचार करण्याची संवय जडल्यानें हिन्दुस्थान या अर्थी 'इंडिया' हा शब्द त्याच्याकडून यदृच्छेनें वापरला जातो. ज्याप्रमाणें 'फिरंगी' शब्द कानीं पडतांच हिंदूंच्या डोळ्यापुढें 'युरोपीय' व्यक्तीची मूर्ति उभी राहते, किंवा 'यवन' हा शब्द ऐकतांच मुसलमान आठवतो, तद्वतच 'इंडिया' हा शब्द उच्चारतांना युरोपीय माणसापुढें हिन्दुस्थानच असतो. असें नसतें तर, मॅक्सम्युलरसाहेब, दासगुप्ता, राधाकृष्णन् इत्यादींच्या 'इंडियन फिलॉसॉफी'वरील ग्रंथांत हिंदूंच्या षट्दर्शनांसमवेत कोणत्या तरी अहिन्दु तत्वज्ञानाचाही विचार आढळला असता. परंतु तो कुठेंच आढळत नाहीं. 'इंडियन लिटरेचर'वरील आपल्या ग्रंथांत विंटरनिटझ्‌नें ज्या वाङ्मयाचा आठावा घेतला आहे तें केवळ हिंदूंनींच निर्माण केलेलें वाङ्मय आहे. 'इंडियन हिस्टरी' ह्या नांवानें संबोधिल्या जाणाऱ्या इतिहासग्रंथांमध्येंही वैदिक कालापासून तें चंद्रगुप्त, पुलकेशी, अशोक, विक्रमादित्य, यशोवर्मा, पृथ्वीराज, प्रताप, शिवाजी, बाजीराव इथपर्यंत जी हजारों वर्षांची ऐतिहासिक परंपरा आढळते ती तर हिंदूंचीच आहे.

ह्या हजारों वर्षांच्या ऐतिहासिक कालखंडांत अनेक अ-हिंदू जमातींचा हिंदूंशीं संघर्ष झाला होता. परंतु त्यांपैकीं अवघी एक वगळल्यास बाकीच्या कोणत्या जमातीचे वारसदार भिन्न अहंकारानें प्रेरित होऊन या भूमीवर पृथक् निवास मागत आहेत? मुसलमानांव्यतिरिक्त कोणीही तो अधिकार सांगत नाहींत. आतांपावेतों मुसलमान आपला भिन्न अहंकार जिवंत ठेवून हिंदू समाजास आपला शत्रू म्हणूनच लेखत आले. ह्याचें प्रायश्चित्त हिंदूंना कां? मुसलमान समाजाविषयीं आदर वाटावा असें त्या समाजांत विशेष तें काय आहे? बरें, आजच्या मुसलमानांना हिंदुस्थानच्या हजारों वर्षांच्या दिव्य नि वैभवशाली परंपरेविषयीं ममत्व वाटलें काय? आणि पुढें या ममत्वांतून एकरसी अशा हिंदी समाजाची निर्मिति झालेली दिसते कां?—असे कितीतरी प्रश्न मनापुढें उभे रहातात. या प्रश्नांच्या उत्तरासाठीं ऐतिहासिक कालांत जाण्याची आवश्यकताच नाहीं. शेजारीं शेजारीं शेंकडों वर्षे निवास करणाऱ्यांनीं एकमेकांचें गळे कापतांना दाखविलेली मनोवृत्तीच या प्रश्नांचें उत्तर देण्यास पुरेशी आहे. सहिष्णुतेचा आदर्श म्हणून ज्या अभिनव हिन्दी संस्कृतीकडे आमचे नेते बोट दाखवत होते तिच्याच वारसदारांनीं एकमेकांचें गळे कापावे हें दृश्य विदारक नाहीं असें कोण म्हणेल? आपण आपलें राष्ट्रीयत्व निश्चित करितांना, निरूपायानें झालें तरी, हें अवश्य मान्य केलें पाहिजे कीं, हिंदी-राष्ट्रवादाचा प्रचार एकरसी हिन्दी समाज निर्माण करण्याइतका कधींच झाला नाहीं. त्यास एक मोठें कारणही आहे. आणि तें म्हणजे हिंदु समाजाच्या मनावर असलेला हजारों वर्षांच्या परंपरेचा भार!

१९२० च्या आसपासचे कालासंबंधीं लिहितांना पं. नेहरू[1] म्हणतात, "ह्याच्या उलट हिंदूंची राष्ट्रवादाची कल्पना मात्र हिंदू-राष्ट्रवादाचीच होती. हिंदू राष्ट्रवाद आणि खरा राष्ट्रवाद ह्यांत भेद करणें, हें कांहीं तितकें सोपें नव्हतें. हिंदुस्थान हा हिंदूंचें निवासस्थान असल्यानें

१ नेहरू : ग्लिम्प्सिस् फ्रॉम् वर्ल्ड् हिस्टरी; पृ. ७२०

आणि तेथें हिंदू बहुसंख्य असल्यानें जवळ जवळ ते दोन्ही एकमेकांत मिसळून गेलें होते."

हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व निश्चित करितांना राष्ट्र या संज्ञेच्या इतिहासाचें परिशीलन जसें सहसा होत नाहीं, तसेंच भारताच्या इतिहासाचेंही परिशीलन होत नाहीं. उलट[1] " हिंदू राष्ट्रवाद आणि मुस्लिम राष्ट्रवाद ह्या दोन धार्मिक नी जातीय राष्ट्रवादांहून निराळा असा एक तिसरा राष्ट्रवाद होता; आणि तो म्हणजे हिंदी राष्ट्रवाद हा होय. आधुनिक अर्थानें राष्ट्रवाद म्हणतां येईल असा राष्ट्रवाद काय तो हाच होता." हें पं. नेहरूंचें मत आणि तत्सदृश इतर विधानेंच प्रमाणभूत मानिलीं जातात. नेहरूंनीं या ठिकाणीं ' आधुनिक अर्थानें खरा राष्ट्रवाद ' कोणता ह्याचें दिग्दर्शन केलें आहे. म्हणून सर्वप्रथम हा ' आधुनिक अर्थ ' नीट समजावा एतदर्थ पहिल्या प्रकरणांत पाश्चिमात्य लेखकांच्या आधारें आधुनिक समजल्या जाणाऱ्या पाश्चिमात्य राष्ट्रवादाचें समालोचन केलें.

दुसरें; शुद्ध मार्क्सवादी तत्वज्ञानाप्रमाणें राष्ट्रवाद ही कल्पनाच मुळीं प्रतिगामी विचारसरणीची निदर्शक आहे, आणि हिंदी मार्क्सवाद्यांच्या विचारानुसार हिंदुराष्ट्रवाद हा तर इतर राष्ट्रवादांहून अधिकच प्रतिगामी आहे. ह्या आक्षेपाचा परामर्ष घेण्याकरितां मार्क्सवादी दृष्टिकोनांतून बोल्शेव्हिक रशियांतील परिस्थितीचें अवलोकन करणेंहि तितकेंच आवश्यक होतें.

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ श्री. धनंजयराव गाडगीळ[2] यांनीं हिंदूराज्यावर एक पत्रक प्रसिद्ध केलें आहे. त्यांत ते म्हणतात, " नवीन संघराज्याचें यथार्थ वर्णन करावयाचें झाल्यास संक्षेपानें ' हिंदू राज्य ' अथवा पूर्णतया ' हिंदूराष्ट्रांचा किंवा राज्यांचा संघ ' असेंच केलें पाहिजे. हिंदू ही संज्ञा

१ नेहरू : ग्लिम्प्सिस् फ्रॉम् वर्ल्ड हिस्टरी; पृ. ७२०

२ केसरी : २४ ऑक्टोबर १९४७

कोणतीही विशिष्ट दैवतें अगर उपासना यांशीं किंवा कोणत्याही एका पद्धतीच्या पारलौकिक कल्पनांशीं निगडित नाहीं. नास्तिकापासून अघोरपंथीयांपावेतों विभिन्न पंथांचा समावेश हिंदूंत होतो, आणि जडवादापासून आध्यात्मिक गूढवादापर्यंत निरनिराळ्या मतप्रणाली हिंदूतत्त्वज्ञनांत सामावल्या जातात......हिंदी संघराज्याचें 'हिंदूसंघ राज्य' असें वर्णन केल्यानें या संघाचें मुख्य वैशिष्ट्य दिग्दर्शित केलें जातें....... कोणत्याही राज्यास हिन्दू हें उपपद लाविल्यानें असहिष्णुता फैलावेल अगर भेदाभेद करण्यास उत्तेजन मिळेल असें म्हणण्यांत हिंदू जनतेचा व परंपरेचा उघडउघड अपमान केला जातो एवढेंच नव्हे तर, हिन्दी संघराज्यानें हिंदुत्व नाकारलें तर त्या संघराज्यास धारणाशक्तीच उरणार नाहीं. पाकिस्तानाच्या निर्मितीनंतर हिंदी संघराज्यास भौगोलिक ऐक्य उरलें नाहीं. आणि प्रादेशिक ऐक्यभावना किंवा एकभाषीयत्व यांहूनही हिंदुत्वनिष्ठा अधिक प्रभावी आहे हें बंगाल नि पंजाब यांच्या फाळणीनें सिद्ध झालें आहे. आसामी नि गुजराथी, पंजाबी नि तामीळ अशा संघराज्यांतील विभिन्न व दूरस्थ लोकसमूहांस एकत्र आणण्यास हिंदू परंपरेचा वारसा हेंच एकमेव साधन आहे. मोठमोठ्या लोकसंघांस सतत संबंध, अथवा केवळ शेजार असलीं कारणें पुरत नाहींत. आपल्या विस्तीर्ण देशांतील हजारों वर्षांच्या इतिहासांत हिंदुत्वनिष्ठा ही कांहीं काळीं नि स्थळीं जरी लुप्तप्राय झालेली दिसली तरी, एकंदरींत, ती फार प्रभावी ठरली असून तिची धारणाशक्ति निर्विवाद आहे. नवीन संघराज्यानें हिंदुत्व नाकारणें म्हणजे गतेतिहासाचा दाखला धिक्कारणें एवढेंच नव्हे तर, भविष्यासही धोक्यांत घालण्यासारखें आहे."

श्री. गाडगीळ यांचें हिंदुत्वाविषयींचें वरील विवेचन हिंदुत्वाची महत्ता नि शुद्धता स्पष्टपणें दर्शवितें. 'हिंदुत्वाचा त्याग करणें' हें भारताच्या भविष्याला धोक्यांत घालण्यासारखें आहे' हें श्री गाडगीळ यांचे विधान मननीय नाहीं असें कोण म्हणेल? असो.

हिंदुत्वावर जातीयतेचा आणि धर्माधिष्ठिततेचा आरोप केला जाण्याचें एक सूक्ष्म कारण असें : राज्यशास्त्रांतील राष्ट्र (Nation) आणि शासन-संस्था (State) तसेंच राष्ट्रिक (national) आणि नागरिक (citizen) या शब्दांचे अर्थ नीट समजावून न घेतां त्यांचा घोटाळा केला जातो. राष्ट्र नि शासनसंस्था ह्या दोन भिन्नार्थवाचक संज्ञा आहेत हें एकदां नीट समजावून घेतलें तर मग विचाराचा गोंधळ होणार नाहीं. या दोन संज्ञांसंबंधीं सिडने हर्बर्ट[१] म्हणतो, "प्रस्थापित सरकारशीं एकनिष्ठा हा किती प्रमाणांत राष्ट्र निर्माण करणारा घटक असतो याविषयीं याच ठिकाणीं पूर्वनिर्णय न करितांही आपणांस जी. के. बीर यांच्या मताशीं सहमत होण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. त्यांच्या मतें शासन-संस्था आणि राष्ट्र या मूलतः भिन्न कल्पना आहेत. यांपैकीं शासनसंस्था ही पूर्णांशानें राज्यनैर्बंधिक (Politico-legal) कल्पना आहे; आणि स्थूलमानानें सांगावयाचें तर शासनसंस्था म्हणजे एका अधिराज्याखालीं असलेला विशिष्ट मानवी गट होय परंतु याच्या उलट, 'राष्ट्र' ही कल्पना मूळ अर्थानें वांशिक आहे. आणि अधिक शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें तर ती कल्पना सांस्कृतिक आहे. शासनसंस्थेच्या बंधनांव्यतिरिक्त इतर अनेक रज्जूंनीं निबद्ध झालेला मानवी गट म्हणजे राष्ट्र होय"

याप्रमाणेंच राष्ट्रिक आणि नागरिक ह्याही भिन्नार्थवाचक संज्ञा आहेत. यांतील नागरिकत्वाची कल्पना प्रायः शासनसंस्थेशींच निगडित असते; तर राष्ट्रिकाची कल्पना ही मूलतः राष्ट्राशीं निगडित आहे. आजही आपणांस राष्ट्र आणि शासनसंस्था यांच्या सीमा कांहीं ठिकाणीं भिन्न तर कांहीं ठिकाणी अभिन्न असलेल्या आढळतात. ह्या विधेयाच्या स्पष्टीकरणार्थ पुढील उदाहरणें पहा : सोव्हिएट युनिअन आणि ग्रेटब्रिटन ह्या दोन्ही शासनसंस्थांच्या सीमेंत एकापेक्षां अधिक राष्ट्रें अंतर्भूत आहेत. पोलंड आणि झेकोस्लोव्हाकिया या देशांच्या शासनसंस्थेंत तेथील

१ नॅशनॅलिटी अँड इटस् प्रॉब्लेमस्. पृ. १६

मूळ राष्ट्रिकांसह अल्पसंख्य जमाती आहेत. ऑस्ट्रेलिया, जपान, अमेरिका, आणि आयर्लंड ह्या देशांतील शासनसंस्था आणि राष्ट्र यांच्या सीमा एकच आहेत.

सोव्हिएट रशियांतील रशिया आणि जॉर्जिया हे दोन देश घेऊन पाहूं. या दोन्ही देशांतून प्रत्येकीं एक एक माणूस घ्या. आतां जॉर्जियामधील मनुष्य हा रशियन राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें रशियन नसून जॉर्जियन असतो. तसेंच उलट रशियन मनुष्य हा कांहीं जॉर्जियन होऊं शकत नाहीं. तरीही दोघे सोव्हिएट युनिअन या शासनसंस्थेंचे नागरिक मात्र असतातच. सोव्हिएट युनिअनचे नागरिक होण्यास त्यांना त्यांच्या राष्ट्रीयत्वाची बाधा येत नाहीं. तीच गोष्ट झेकोस्लोव्हाकियांतील जर्मन अल्पसंख्यीयांची. झेकोस्लोव्हाकियांतील अल्पसंख्य जर्मन जमातीस झेकोस्लोव्हाकियाच्या शासनसंस्थेचें नागरिकत्व प्राप्त होण्यास त्यांचें स्वतःचें भिन्न राष्ट्रीयत्व आड येत नाहीं.

आतां जेथें राष्ट्र आणि शासनसंस्था यांच्या सीमा एकच आहेत तेथें राष्ट्रिक आणि नागरिक असा भेद संभवतच नाहीं. परंतु जेथें एखाद्या शासनसंस्थेंत वर पाहिल्याप्रमाणें एकाहून अधिक राष्ट्रांचा अथवा अल्पसंख्य जमातींचा अंतर्भाव होतो तेथें मात्र नागरिक आणि राष्ट्रिक यांतील सूक्ष्म भेद लक्षपूर्वक समजावून घेणें आवश्यक ठरतें. राष्ट्र ही कल्पना सांस्कृतिक असून शासनसंस्था ही कल्पना राज्य-नैर्बंधिक (Politico-Legal) आहे हें वर म्हटलेंच आहे. आतां नागरिकत्वाची कल्पना प्रायः शासनसंस्थेशीं निगडित असल्यानें, ज्या ठिकाणीं एका शासनसंस्थेच्या सीमेमध्यें एकाहून अधिक राष्ट्रें अंतर्भूत होतात तेथें प्रत्येक जण आपापल्या राष्ट्राचा राष्ट्रिक राहूनही त्या सर्वांना समान अशा एका शासनसंस्थेचा नागरिक असूं शकतो.

वरील विवेचनाचें तात्पर्य हें कीं, एखादा मनुष्य एखाद्या विशिष्ट शासनसंस्थेचा नागरिक झाला कीं, तत्क्षणीं, तो त्या शासनसंस्थेच्या

सीमेंतील मूळ राष्ट्राचा राष्ट्रिक झालाच पाहिजे असें नाहीं. दृष्टांत देऊन बोलावयाचें तर, हिंदू राष्ट्राचा राष्ट्रिक नसलेला अहिंदु हा हिंदुस्थानच्या शासनसंस्थेचा नागरिक होऊं शकतो. हिंदुराष्ट्र ही कल्पना सांस्कृतिक असल्यानें त्यांतील भागिदारी आज हिंदूसमाजापुरती मर्यादित आहे. पण याचा अर्थ असा जराही नाहीं कीं इतर अहिंदु जमातींस हिंदुस्थानांत स्थान नाहीं. नागरिकांच्या कर्तव्यांचें दायित्व त्यांनीं नीट सांभाळलें तर, अहिंदूंना हिंदुस्थानच्या शासनसंस्थेच्या नागरिकत्वाचे अधिकार हिंदूइतकेच मिळणार. त्याच्या आड 'हिंदुत्व' म्हणजे हिंदुस्थानचें राष्ट्रीयत्व मुळींच येत नाहीं. हिंदुस्थानच्या शासनसंस्थेचे नागरिक होण्याचे नियम, आणि नागरिक झाल्यावर प्राप्त होणारे अधिकार नि येणारें दायित्व हे निर्बंध (कायदा) आणि राज्यघटना यांच्या कक्षेंतील विषय आहेत.

अशाप्रकारें हिंदुराष्ट्र आणि हिंदुशासनसंस्था या दोन कल्पना निश्चित भिन्न अर्थाच्या आहेत हें ध्यानांत घेतलें म्हणजे हिंदुराष्ट्र ही कल्पना जातीय भासणार नाहीं. तसेंच सांप्रदायिक शासनसंस्थेची कल्पना हिंदु मनास अपरिचित आहे हें ध्यानांत ठेविलें म्हणजे आजची निधर्मी शासनाची कल्पना कांहीं नवीन नाहीं हेंही स्पष्ट होतें. पूर्वी जर शासनसंस्था निधर्मी होती तर आज त्या दृष्टीनें प्रगति ती काय झाली? ती कल्पना जशी पूर्वी होती तशीच पुढें चालू असल्यानें हिंदुराष्ट्रवादाच्या पुरस्कारानें त्यास अपाय निश्चित होणार नाहीं, कारण हिंदुराष्ट्रवादाचा निधर्मी शासनाशीं कांहीं विरोध नाहीं.

माझ्या मानवतेवरील प्रेमाचा उगम माझ्या हिंदुस्थानावरील प्रेमांत आहे. जागतिक शासन-संस्थेचें नि मानवतेचें ध्येय गाठण्यासाठीं राष्ट्-वादाची पायरी अटळ आहे. नि म्हणूनच माझ्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यार्थ मी झगडतो.

—वीर सावरकर

राष्ट्रीयतेचें महत्त्व माझ्या दृष्टीनें स्वातंत्र्या-पेक्षांहि अधिक आहे. राष्ट्रपदाची प्राप्ति झाल्या-वांचून कोणत्याहि लोकसमुदायास स्वातंत्र्याचा उपयोग करितां येत नाहीं. छिनावलेलें स्वातंत्र्य परत मिळवितां येतें; परंतु राष्ट्रीयतेचें तसें नाहीं. म्हणूनच देशाच्या विद्यमान परिस्थितींत आपदेंत सांपडलेल्या आपल्या राष्ट्रीयतेस जिवंत ठेवणें हें, माझ्या मतें, आपलें पहिलें ध्येय असावें. आणि नंतरच राष्ट्रीयतेच्या विकासास आवश्यय तेवढ्याच स्वातंत्र्यासाठीं प्रयत्न करावा.

—निकोलाय बालेस्क्यु
(एक रुमानियन देशभक्त)

E
२७१